# दिनानाथ मनोहर

# हायवेवरील कुरूप सुंदरी



**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# हायवेवरील कुरूप सुंदरी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# हायवेवरील कुरुप सुंदरी

लेखक

## दिनानाथ मनोहर

# हायवेवरील कुरुप सुंदरी

## लेखक... दिनानाथ मनोहर

पत्ता- अवकाश, ३२ वागेश्वरीनगर, नंदुरबार-४२५४१२
फोन नम्बर : ९४०३४२२६२७
ई मेल : dinamanohar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ६ फेब्रुवारी २०२१**



©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी  साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे-

# दिनानाथ मनोहर



दिनानाथ मनोहर वयाची ऐंशी वर्षं ओलांडलेले एक तरूण लेखक आहेत. त्यांना पाहून वा त्यांच्या लेखनाचा, समाजकार्याचा व इतर कामाचा झपाटा बघून त्यांच्या वयाचा पत्ता लागत नाही.

यात जसा त्यांच्या चष्मा न लावण्याचा भाग आहे (चष्मामुक्तीसाठी त्यांनी केले प्रयोग प्रसिद्ध आहेत), तेवढाच त्यांनी आदिवासींबरोबर जगलेल्या मुक्त पर्यावरणाचा आणि त्यांच्या कायम नाविन्याचा शोध घेणाऱ्या उत्साही, तंत्रस्नेही, प्रागतिक विचारांचाही आहे.

तसे ते पन्नासहून अधिक वर्षे लिहीत आहेत. १९७५ साली ग्रंथाली प्रकाशनावर रोबो ही कादंबरी प्रकाशित करून ते साहित्य

क्षेत्रात उभे राहिले. ते पन्नास वर्षे लिहीतच आहेत. अनेक नियतकालिके व सामाजिक चळवळींसाठी त्यांचे साहित्यिक योगदान फ़ार मोठे आहे. वयाची आठ दशके उलटल्यावरही ते तरूणांच्या विविध उपक्रमांत भाग घेत असतात.

कबीरा खडा बाजार में(लोकवाङ्मय गृह), मन्वंतर(राजहंस प्रकाशन), प्रदेश साकल्याचा (मुद्रा), आंदोलन, सीमांत(ग्रंथाली). रोबो(शब्द प्रकाशन), फत्ते तोरणमाळ या कादंबऱ्यांसह त्यांची डझनाहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मराठीतील लेखकांसाठीचा जीवनगौरव मानला जाणारा “भाऊ पाध्ये पुरस्कार” त्यांना लाभला आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांना मोठमोठ्या पुरस्कारांनी गौरवले गेले आहे.

त्यांचा " डायनासोरचे वंशज " हा विज्ञानकथा संग्रह नुकताच समकालीन प्रकाशनातर्फे प्रकाशित झाला आहे. सुमारे पन्नास वर्षांची त्यांची लेखणी आताही सातत्यपुर्ण नवनिर्मिती करत असते.

सदर पुस्तकातील कथा या पूर्णपणे काल्पनिक आहेत. त्यांचा वास्तविक व्यक्ती, स्थळे व घटना यांच्याशी काहीही संबंध नाही. असा संबंध कोठेही आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.


"Nothing in life is to be feared, it is only to be understood. Now is the time to understand more, so that we may fear less."
—Marie Curie

कार नगर पुणा रोडवरील मुंबई फाट्याला पोचली, घडयाळावर नजर टाकून कारची गती कमी करत राकेश म्हणाला, “क्षमा, कसं जायचं? पुण्यातून जायचं की बाहेरून?”

क्षमानेही आपल्या मनगटी घड्याळावर एक नजर टाकली, “तसं पाहिलं तर आपण ढाब्यावर खाणार आहोत ना एक्स्प्रेस हायवे फाट्यावर! बाहेरूनच जायला हरकत नाही. पण तरीही कार पुण्यातूनच घे. जरा भोवतालचा सीन तरी बदलेल. गेल्या कित्येक मैलांपासून दिसताहेत, दोन्ही बाजूला शिरकाण केलेल्या झाडांची मढी. सरळ मुळापासून तोडून टाकली असती तरी ठीक होतं, पण मुळातून उपटून दुसरीकडे उभी करण्याचा हा फार्स कशाला? नुसते हाडांचे सापळे उभे केलेत असं वाटतंय. अगदी बघवत नाही रे.”

“खरं आहे. माणसं असोत वा झाडं, विस्थापित करणं सोपं असतं, पुनर्वसन अवघडच. हा काही केवळ तंत्राचा प्रश्न नसतो. पुनर्वसन करणारे संवेदनशील हवेत आणि दुसऱ्या समाजातील व्यक्तीबद्दल संवेदनशील असणारी माणसं आपल्याकडे अल्पसंख्यच आणि दुसऱ्या समाजगटाबद्दल संवेदनशिलतेचा अभावालाच आपण अस्मिता म्हणतो.”राकेश म्हणाला.

क्षमाने त्याच्या विधानावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही. राकेशची बोलण्याची पद्धतच अशी आहे, जराशी आडवळणाची, गुंतागुंतीची. बिट्वीन द वर्डस, अंडर द वर्डस्. प्रत्येक वाक्य म्हणजे द्विअर्थी, अनेकाअर्थी. चांगलं-वाईट, पसंत-नापसंत, होय-नाही असे दोनच धृव त्याच्या विचारात कधी दिसत नाहीत. काही काही वेळा असा वैताग येतो, वाटतं, सरळ स्पष्ट अर्थ असलेलं ह्याला बोलताच येत नाही का?

तिने त्याच्याकडे पाहिलं, आता शहराच्या प्रकाशित रस्त्याने गाडी चालली होती. त्या प्रकाशात तिला राकेशचा चेहरा स्पष्ट दिसत होता. चेहऱ्यावर सततचा एक विस्मयाचा भाव. जणू काय आताच त्यानं आयुष्यात प्रथम डोळे उघडले आहेत, लकलकणारे डोळे, आणि भोवतालचे जग पाहून स्वत:शीच म्हणतोय, 'अरेच्च्या, भोवती हे जग अस्तित्वात आहे की, आणि आहे ही इंटरेस्टींग!' डोळे आणि कपाळ पाहिलं तर, चिंता करतो विश्वाची. आणि जिव्हणी पाहिलीं तर असं वाटतं, हा प्राणी स्वत:वर तर खुष आहेच, पण जगावरही खुष आहे. त्याच्याजवळ सरकत त्याच्या दंडाला एका अंगुलीने स्पर्श करीत क्षमा त्याला म्हणाली, “आता तरी सांग ना. काय पाहणार आहोत आपण आज?”

“आपण काय पाहणार आहोत हे आपल्याला काय दिसणार आहे ह्यावर अवलंलबून आहे. आणि काही दिसणार आहे की नाही हेही मला माहीत नाही.” राकेश स्मितहास्य करीत म्हणाला.

“पण मग आपण कशाला निघालोत आज?” क्षमाने जरा चिडक्या आवाजात विचारले.

“आपण दोघेही आपल्या व्यवसायाकरता चाललोय मुंबईला. तुला तुझ्या कस्टमरला भेटायचेय. मला माझ्या प्रकाशकाला. हं, आपण अशा रात्रीच्या वेळेला का चाललोत, ह्याचं उत्तर कदाचित आपण आता ढाब्यावर जाऊना, तो सरदारजी देईल.”

“निघाल्यापासून त्या सरदारजीचा घोष चाललाय. निदान त्यानं काहीतरी चविष्ट खायला घातलं तरी खुप झालं. तस पाहिलं तर तुझ्या खाण्यापिण्याच्या रेकमेडेशन्स भरवश्याच्या असतात म्हणा.” परत एकदा त्याच्या दंडाला बोटाने स्पर्श करीत ती म्हणाली.

“एकूणच माझ्यावर, पुर्ण माझ्यावर तु केव्हा भरवसा ठेवायला लागणार आहेस कुणास ठाऊक?” तो ओठातल्या ओठात पण तिला ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाला.

ती काही बोलली नाही, तिच्या मनात आलं, हाच तर अनुत्तरीत प्रश्न आहे अजून. राकेश आणि मी बरोबर जाणार आहोत

आणि परतताना संजयकडे जाणार आहोत, असं आईला सांगितल्यावर आई जरा हंसतच म्हणाली होती, 'क्षमा, स्वत:च्या पायावर उभी आहेस तू, तुझ्याकरता काय भलंबुरं हे कळतं तुला चांगलं. म्हणूनच तुझे पपा ह्याबाबत काही बोलत नाहीत तुला. पण पोरी, लवकर काहीतरी निर्णय घे. अखेर कुणाची तरी एकाचीच निवड तुला करावी लागणार आहे. तु लाख द्रौपदीच्या पावलांवर पावलं टाकायला तयार असशील, पण त्यासाठी पांडव मिळायला पाहिजेत ना?''

''आईच्या आज्ञेत असलेले पाडंव? अशक्य! पण ते सोड. वैयक्तिक पातळीवर तसं काहीतरी अफाट करण्याचा माझा विचार नाही. तू काही चिंता करू नकोस आई, लवकरात लवकर निर्णय घेते मी. पण मीच केवळ निर्णय घेऊन काही उपयोग नाहीये ना? लग्न करायला दोन व्यक्ती लागतात, सज्ञान आणि विषमलिंगी.'' किचिंत हसून ती काही वेळ थांबली मग म्हणाली होती, ''पण तुम्हाला फार दिवस वाट पाहावी लागणार नाही. सांग तु तसं पप्पाना.''

क्षमानं आईला तर सांगितलं होतं, पण तिचं मनच अजून हिंदोले घेत होतं. मानेला झटका देऊन तिने मनातील विचार झटकून टाकले. अधिकच त्याच्याजवळ सरकत ती म्हणाली, ''पण राकेश,

हे अन्यायकारक आहे हं. तुझ्यावर भरवसा नसता तर अशा भलत्यावेळेला तुझ्याबरोबर आले असते का? त्या तुझ्या धूसर आश्वासनाच्या आधारावर. पण आता तरी असं दिसतंय की तुझाच भरवसा नाहीये माझ्यावर. थोडी तरी हींट दे की काय दिसणार आपल्याला? प्लीज राकेश, प्लीज"

राकेशने तिच्याकडे वळून पाहिलं, कपाळावर आठ्या चढवल्या, "क्षमा, ते बघ, समोर बघ. ते लाईट दिसताहेत ना. तिथे तो सरदारजीचा ढाबा आहे. चविष्ट जेवणासोबत चविष्ट बातम्याही देतो तो. '

" ठीक आहे, बघूया, तो तुझा सरदारजी काय खायला घालतो ते. पण राकेश, आपण असा खेळ खेळूया का? मी अंदाज करेन. जर मी जवळपास असेन तर तु हो म्हणायचं."

"चुप गं. क्षमा, एन्ट्राप्युनर आहेस तु आता. असा अधीरपणा शोभत नाही तुला. '

" ठीकाय, ठीकाय. माझ्या यशावर जळतोस तू, असं वाटतं मला कधी कधी' ती तक्रारीच्या सूरात म्हणाली.

"क्षमा, आपलं काय ठरलंय! ड्रायव्हींग करताना ड्रायव्हरला स्पर्श करणं तर सोडाच, त्याच्या नजीकही यायचं नाही फार. '

‘‘हो, तो नियम मीच सांगितला होता. पण त्याचं खरं कारण सांगू का? तुझ्या अंगाला स्पर्श केला ना, की बोटांना बोंबलासारखा वास यायला लागतो. असह्य होणारा वास. ’

रस्त्याच्या उजव्या बाजूला दिव्यांचा झगझगाट असलेल्या प्रचंड लांबरुंद ढाब्याला मागे टाकून त्यांची कार पुढे आली आणि लागलीच, राकेशने उजव्या बाजूला गाडी आत घेतली. काहीशा आतल्या बाजूस एक छोटासाच ढाबा दिसत होता, समोर झोका, बाजूला काही खाटा, आणि काही टेबलं. प्रकाशाचा झगझगाट नव्हता इथं, पण ट्यूबलाईट्स अशा रितीने लावले होते की प्रकाश निश्चितच पुरेसा होता, आणि त्या प्रकाशात प्रत्येक चीज स्वच्छ असल्याचे स्पष्ट जाणवत होते. हेडलाईट्सच्या प्रकाशात सामोरं आलेल्या सरदारजीचे कपडे तर शुभ्रधवल होतेच, पण मागे तंदुरी भट्टीजवळ उभ्या असलेल्या कारागीराच्या अंगातील बनियानही साफ होता. कार थांबल्या थांबल्या राकेश दार उघडून बाहेर पडला, आणि सरदारजीच्या 'ससरीगाल’ ला प्रत्यत्तुर देत तो पुढे झाला. सरदारजीचा हात हातात घेत त्यानं जरा अनुनासिक स्वरात विचारलं, ‘‘दस्सो पाइंजी, धंदापानी कैसा चल रहा है?’’

‘‘आपकी दुआ है साब. वैसे आपके दोस्त अब हमारे परमनंट कस्टमर बन गये है! जादा बात करना शायद पसंद नही करते वो.

लेकिन आदमी उमदा है. दोस्तोंको लेकर आते रहते है, और पहिले संदेशा देते है हंडी लगानेका.”

“ऐक क्षमा, ऐक. तुला बरं वाटेल हे ऐकून. हे संजीव पुराण चाललंय. ’

“ठीकाय, ठीकाय. पण तू कधी आला होतास त्याला घेऊन इथं. आणि बोललाही नाहीस कधी ते तू?”

“तुझी काही मोनापोली नाहीये त्याच्यावर. माझाही मित्र आहे तो क्षमा. सात आठ महिन्यांपूर्वी असाच संध्याकाळी डोकावलो त्याच्या क्वार्टरला. तर नुकताच सर्व दिवस फिल्डवर टेस्टस् करून परतत होता. घामाघूम, त्रस्त आणि थकानग्रस्त. मग बाथ घेईपर्यंत थांबलो, म्हटलं, ह्या अशा ग्रस्त-त्रस्त माणसाला जगण्याचा उत्साह देणे आपलं कर्तव्यच की. त्यातून तो तुझा मित्र. मग घेऊन आलो त्याला इथं.” त्याच्या हसण्यात क्षमाबरोबर सरदारजीही सामील झाला, “पाइंजी, मेमसाब पहिलेही आयी है आपके ढाबेपर.”

“बहोत खुषीकी बात है साब. बोलो बेटी, क्या बनाऊं तुम्हारे लिये?” मग बाजुच्या टेबलावर ग्लासेस व पाण्याचा जग ठेवत तो म्हणाला, “कुर्बानसिंगा, मुंडे, मॅडमको जरा गरम पानी दे हाथ, मुंह धोनेके लिये”

“पाइंजी, मेरे लिये बढिंया बैंगन भरता बनाना, तेज, मसाला कम, और तंदुर. लेकिन मैदेकी नही आटेकी. मुझे चावल नही चाहिये, दाल फ्रायभी तेज, और टमाटोके साथ. आचार हो निंबूका तो वो दे दो. और साबको आधा किलो गुड दे दो.”

सरदारजी जोरजोरात हसत सुटला.

“अजी, इधर आनेके बाद आप साबकी फिकर मत किजिये. उनकी पसंद मेन्नु अच्छी तरहा मालूम है”

क्षमाने टेबलावर ठेवलेला कोमट पाण्याचा जग उचलला, ती बाजूला असलेल्या झुडपाकडे गेली.

“क्यौ साब, इतनी रात कर दी. “

“प्लॅन करके जा रहे है आधी रातको. आपने मुझे वो खतरनाक स्पॉटके बारेमे बताया था ना, मेमसाबको भी इन्फॉर्मेशन बता देना आज.” राकेशने हळू आवाजात सांगितलं.

“नहीं साब. नही. मै तो उनको बताऊंगाही नही. लेकिन आपभी कुछ मत कहीये. औरतोंका दिल बहोत कमजोर होता है भाईसाब. कुछ दिखा भी नही तो भी कल्पनाका भूत सवार हो जायेगा, डर पैदा हो जायेगा, फीर औरही कुछ हो जायेगा.”

“अरे पाइंजी. आज कुछ देखनेका मौका मिले इसलिये तो निकला हूं ऐसे वक्त. और मै कहता हूं, मॅडम बिलकूल विश्वास नही

करती इन चिजोपे. कुछ नही होगा उनको. आप, जो दो तीन हादसे हुवे है ना, बताही दिजिये. मै तो बता सकता था, लेकीन आप बुजूर्ग है और आपका बयान भी बढिया स्टाईलिश है" राकेशने हलक्या आवाजात सरदारजीला पटवण्याचा प्रयत्न केला.

"नहीं साब. मै तो कुछ कहूंगा नही. लेकीन कलही एक कार बीचके डिव्हाईडरपे टकरा गयी. वैसे ड्रायव्हर बच गया. मामूली चोट लगी ड्रायव्हरको. अकेला था इस लिये ठीक था. कहते है वो औरत बिलकूल रस्तेके बीच, असके गाडीके तरफ बढ रही थी. गाडी बडी तेजीसे चल रही थी. औरतको देखकर स्पीड जरा कम करही रहा था की देखा, जैसे वो एकएक कदम आगे ले रही है, बडी होते जा रही है. और वो खूनसे लपथप चेहरा. गाडी कंट्रोलसे छुट गयी, लेकिन डिव्हाईडरको जाकर टकराई. बंदा जिंदा रहा. लेकिन वो छोड दिजीये. मॅडमको कुछ ना कहीये. वैसे भी किसीके भी, अपने भी दिल और मन पर बिलकूल भरोसा मत किजिये साब. कभी भी धोखा दे सकते है. और औरतोकी कुछ कहियेही ना. मै तो कहता हूं, कर्नाटककी दो तीन बसेस जाती है, इस वक्त. आप उनके साथही जाओ, अगले वीस एक किलोमिटरतक. बाजूकेही ढाबेपर रुकते है वे गाडींयां. मै आदमी भेज कर..." क्षमाला टेबलाकडे येताना पाहून तो मध्येच गप्प झाला.

“पाईंजी, यहा कुछ फुलोके पौधे लगाओ ना बढिया खुशबूदार”

“बेटी, मैने लाये थे कुछ पौधे, लेकिन शायद यहॉं की मट्टी ठीक नही है, सभी मर गये.” सरदारजी म्हणाला.

“हां. मैने देखा. लेकिन दो पौधे है अभीभी जिंदा. मै ऐसा करती हूं, बंबईसे वापस आते वक्त आपको कुछ प्लॅन्टस लेके आती हूं, उनको लगाने के लिये कैसे गड्डे बनाना बताऊंगी मै आपको.”

“सरदारजी, मेमसाब गार्डनस्केपींग करती है. देखो, कहीं आपको कन्सल्टींगका बील दे देगी. “

“आप बीलकी फिकीर मत किजिये पाइंजी,”क्षमा खुर्चीवर बसत म्हणाली,”मै आपके दोस्तसे, इनसे बील ले लुंगी.”

“देखा सरदारजी, एकदम बिझीनेसमन, नाही... नाही बिजीनेसवुमन है, बील लिये बगैर तो छोडेगी नही. आपसे नहीं तो मुझसे.”

सरदारजी खदखदा हसू लागला. कुर्बानसिंगने टेबलावर ठेवलेल्या डिशेसमधील बैंगण भरताची डीश उचलून तिच्याकडे निरखून पाहून, तिचा स्वाद हुंगून तो म्हणाला, “कुर्बानसिंगा, थोडा हरा सांबार बारीक काटकर डालना इसपर. और तंदुर गरम लाना.” मग राकेशकडे वळत तो म्हणाला, “और साब, मेमसाबके बीलकी

आप फिकर मत किजिये, बील की क्या बात, हम कस्टमरके दिल तक पहुंचते है, पेटके रास्तेसे. एक किस्सा बताता हूं. एक राजपूत्र थे, उनकी मॉ महारानी चाहती थी की अपने पुत्रकी शादी उनके सखीके लडकीके साथ हो जाये. वैसे लडकी खुबसुरत थी, लेकिन क्या करे राजकुमार के सपनोकी परीकी छबी शायद कुछ अलग थी. वो माननेकोही राजी नही था. लडकी जैसी सुंदर थी वैसे ही चालाक थी. उसने कहां, “मांसीसाब, उन्होने मेरे तरफ नजर उठाके भी नही देखा है. आप ऐसा किजीये, मुझे अनुमती दिजिये मै कुछ दिनोके लिये आपके रसोईघरमे खाना बनाने आते जाऊंगी.” रानीसाहबाने कहां, “ठीक है बेटी, उस बहाने तुम्हारे हाथ का खाना मिलेगा हमेभी. ’ दुसरे दिनही खाना खाते वक्त राजकूमारने कहा, “मॉसायबा, आज खाना बहोतही बढियां बना है. ’ रानीसायबाने कुछ ध्यान नही दिया अपने सुपुत्रके टिप्पणीपे. दो हप्तोके लडकीने कहा राजमााताको, “मै नही आऊंगी कलसे. ’ रानीने सोचा शायद पुत्री आशा हार चुकी है. चुप रही, वैसे कर भी क्या सकती थी? दुसरे दिन खानेकी टेस्ट लेतेही राजकुमार बोला, “आज खानेमे कुछ मजा नही आ रहा है.” महारानीने चुप्पी बांध ली. तीन चार दिनोके बाद उनकी सखीके पुत्रीने घरसे टिफीन भेज दी, राजपुत्रके लिये. बढिया बैंगन भरता, एकदम टेस्टी मिक्स्ड साग, लच्छेदार दही, आचार... भरतेका टेस्ट लेतेही राजकुमारने कहां, “ये खाना किसने

बनाया है. ' राजमाता बोली, "किसीने यहां नही बनाया पुत्तर, मेरे सखीके घरसे टिफीन आयी है" राजकुमारने बडे मजेसे खाना खाया, फीर छतकी तरफ देखते हुवे महारानीको धीमीसी आवाजमे पुछा, "मॉं, कुछ दिनो पहिले आप आपके सहेलीके लडकीके बारेमे कुछ बोल रही थी?"

"समझ गये पाइजी, समझ गये" राकेश मध्येच म्हणाला," दिलकी मंझील व्हाया पेट" तिघेही हंसत सुटले जोरजोरात. मग हसू आवरत क्षमाने विचारले, "पाइजी, इस कहानीके राजकुमार कही आपही तो नही है ना? अगर वैसी बात है, तो भाभीजीके हाथका खाना खानेके लिये आना पडेगा एक बार." मग त्यांच्या हसण्यात कुर्बानसिंगही सामील झाला.

कार टोलनाक्याच्या पुढे निघाली, तेव्हा बारा वाजून गेले होते. नजरेसमोर एक्स्प्रेस हायवे अगदी मोकळा दिसत होता. खुप दूरपर्यन्त पिवळ्या बल्बजच्या प्रकाशात रस्त्याच्या चमकदार पट्टया दिसत होत्या. जेवण मस्त झाले होते, एका मस्त सुस्तीने क्षमाचे डोळे मिटू लागले होते, पण तिला आठवण आली, राकेशकडे वळत तिने त्याच्या दंडाला बोटांनी स्पर्श केला, पण लागलीच हात मागे घेत म्हणाली, "ओ.. चुकून तुझ्या अंगाला

स्पर्श करत होते, बोटांना छान भरताचा सुवास येतोय, तो गेला असता.” असं म्हणत ती त्याच्याकडे सरकलीच. त्याला बिलगत म्हणाली, “राकेश, जेवण चविष्ट होतं, किस्सेही चविष्ट होते, पण सरदारजीने मुख्य गोष्ट तर सांगितलीच नाही. आता तरी तुला सांगावं लागेल, आपण काय पाहणार आहोत ते.”

समोर आणि भोवती पाहात राकेश म्हणाला, “आपल्याला काही दिसणारच असेल तर तो स्पट जवळ येत आहे. तू डाव्या बाजूला बघत राहा, एक टेकडी गेली, की डबर, खडीसाठी खोदलेला एक डोंगर दिसेल बघ. एक उंच रॅम्पही दिसेल. इथेच कुठेतरी तो हादस्याचा स्पॉट आहे.”

“हादसा?” क्षमाने जरा सावध होत विचारले, “म्हणजे आपल्याला काही भयावह दिसणार आहे का राकेश? काय दिसणार आहे आपल्याला?”

“क्षमे, पहिली गोष्ट तू जरा बाजूला सरक. आणि काही मैलातच आपण तो स्पॉट पार करणार आहोत. जर समजा आपल्याला काहीच दिसलं नाही तर मग मी तुला सांगेन आपल्याला काय दिसण्याची अपेक्षा होती ते.”

काहीशा घुश्शातच क्षमा दुसऱ्या बाजूच्या खिडकीजवळ सरकली, राकेशपासून दूर. तिने मागे वळून पाहिलं, दूरपर्यंत रस्ता

अगदी रिकामा होता आणि पुढे निदान चार पाच किलोमिटर्स अंतरापर्यन्त कुठल्याही वहानाचे टेललॅम्पस् दिसत नव्हते.

क्षमाने डाव्या बाजूला नजर टाकली, पिवळ्या प्रकाशाने प्रकाशित रस्त्याच्या पलिकडे थूसर अंधाराचे साम्रज्य होते. पण तरीही निरखून पाहिले की चांदण्याच्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर भूभागावरील सावल्यांचा पट दिसत होता, टेकडीच्या अंगावरील व कुशीतील झाडांच्या बाह्यरेषा जाणवत होत्या. परंतु ह्या रेषा तुटक, पुसट आणि एकमेकात मिसळलेल्या होत्या. तिच्या नजरेसमोरून एका टेकडीची बाह्यरेषा मागे सरकत गेली. सपाट भाताच्या खाचराचा भाग सुरू झाला, पण मागे काही अंतरावर सुरूंग लावून खडकाचा थर खोदून काढलेल्या, विद्रुप केलेल्या टेकड्या अस्पष्ट दिसत होत्या. त्यांच्यापुढे खडी क्रशरची यंत्रणा चालवण्यासाठी केलेला उंच रॅम्प दिसत होता. क्षमाची नजर रॅम्पवरून सरकत खाली सरकली आणि रस्त्याच्या कडेने समोर आली. रस्त्याच्या कडेला एक धूसर आकृती उभी होती, ती स्त्रीच होती, एक हात पुढे केलेला, पंजाबी ड्रेस, पाठीवर लांब मोकळे केस. क्षमाची नजर पटकन् रस्त्यावरून पुढे सरकून परत आली. कुठे गाडी दिसत नव्हती, अपघाताच्या खाणाखुणा दिसत नव्हत्या. झर्रकन तिची नजर त्या स्त्रीच्या आकृतीकडे परत वळली. त्या अंधारातही ती आकृती स्पष्ट दिसत होती, तिचा चेहरा कारच्या

दिशेने वळला होता, एक हात किचिंत उभारून, दुसरा पोटाशी धरून ती ऐटीत उभी होती, क्षमाच्या लक्षात आलं, तिच्या चेहऱ्यावर वा उभे राहण्यात किंचितही भीती, अस्वस्थता दिसत नव्हती. आपल्या मानेवरील केस ताठरत आहेत, आणि कपाळाच्या वरच्या भागात एक चमत्कारीक बधीर जाणीव पसरतेय असं वाटलं तिला. ती राकेशकडे वळतच होती, पण त्याचवेळी, कारचा वेग कमी होत कार किंचित थबकली, आणि परत झटक्याने पुढे सरकली. तिने राकेशकडे पाहिलं, राकेश त्या स्त्रीच्या आकृतीकडेच पहात होता, डोळे विस्फारून. हादसा! त्याला हेच दृश्य अपेक्षित होत का? राकेश आपली कार डाव्या बाजूला घेत होता, पण त्यानं अजून गती मात्र कमी केली नव्हती. हा कार का थांबवत नाहीये? ती त्याला विचारणारच होती, पण तिला एकाएकी राकेशच्या चेहऱ्यावर भीतीचं दाट सावट आल्याचं जाणवलं, आश्चर्याने आणि भीतीने त्याचे तोंड उघडे झाले होते, डोळे जणू बाहेर पडत होते, तिनं झटकन् आपली नजर त्या स्त्रीच्या दिशेने वळवली, आणि तिच्या तोंडातून नकळत बाहेर पडणारी किंचाळी दाबण्याकरता तिचा हात तोंडाकडे गेला, गाडी एकाएकी उडी घेऊन वेगाने पुढे धावली. तिला जाणवलं, तिचं सर्व शरीर थरथर कापत आहे, कपाळ घामाने थबथबलं आहे, उर धपापतो आहे, श्वास अडकल्यासारखा झाला आहे. राकेशकडे वळत तिने

राकेशला आवाज देण्याचा प्रयत्न केला, पण तिच्या तोंडून केवळ घुसमटलेले शब्दहीन आवाज बाहेर पडला. पण त्या आवाजाने राकेश भानावर आला होता, त्यानं आपलं डोकं जोरजोरात घुसळले आणि गाडीला ब्रेक लावला. कर्कश चिरका आवाज करीत काही फुटांतच कार उभी राहिली. राकेशने मागे वळून पाहिलं, क्षमालाही मागे वळून पहावं असं वाटलं, पण तिचा आपल्या शरीरावरील ताबाच नाहीसा झाला होता, तिचं डोकं मागे वळायला तयार नव्हतं, नजरही समोरच्या अंधारातल्या एका बिंदुवर अटकून गेली होती. तिला दाराचा आवाज ऐकू आला, डोळयाच्या उजव्या कोपऱ्यातून राकेशने आपले पाऊल बाहेर टाकलेलेही तिला दिसले. ती भानावर आली. झटकन् तिने मागे नजर टाकली, ती जागा रिकामी होती. कुणीही नव्हतं तिथं, काहीही नव्हतं. तिनं झटक्यात दार उघडलं, किंचिंतही विचार न करता ती बाहेर आली, आणि गाडीच्या इंजीनला वळसा घालून राकेशकडे धावली. राकेश कारच्या दारावर हात ठेवून पाठीमागच्या अंधारात नजर रोखून पहात होता, स्तब्ध, निश्चल. ती त्याच्याजवळ पोचली, तिचा हात पुढे सरकला, तिच्या बोटांचा त्याच्या खांद्याला स्पर्श झाल्यावर दचकून तो गर्रकन मागे वळला, पण तिच्या चेहऱ्याकडे पाहताच त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत गेले. त्यानं स्वत:ला सावरले, तिच्या खांद्यावर हात ठेवत त्यानं बोलण्याकरता तोंड

उघडले, पण मग त्यानं केवळ आपला घसा साफ केला प्रथम. “ घाबरू नकोस क्षमा. घाबरल्याने सारासारबुद्धीच भ्रष्ट होईल आपली.” तिच्या खांद्याभोवती उजव्या हाताची मिठी घालून मागच्या दिशेकडे वळत तो म्हणाला, “आता तेथे कुणीही नाही. नाहीशी झालीय ती स्त्री तेथून.” तो जणू स्वत:लाच सांगत होता हे. मग त्यानं दीर्घ श्वास घेतला एक, परत एक. काही वेळ दीर्घ श्वसन केल्यावर तो बराच सावरला. तिच्या खांद्यावरील आपल्या बोटांची पकड ढिली करत म्हणाला, “क्षमा, आपण कार परत मागे घेणार आहोत, बघणार आहोत आपल्याला काय दिसतं ते. पण त्या अगोदर मला खात्री करून घ्यायची. आपण दोघांनी एकच दृश्य पाहिलंय ना? मला सांग क्षमा, काय दिसलं तुला?”

आपल्या कापणाऱ्या शरीरावर कब्जा मिळवण्याचा प्रयत्न केला तिनं. मनाला शांत करण्याचा प्रयत्न केला तिनं. “प्रथम ती स्त्री दिसली मला. उंच, सडपातळ, निळ्या रंगाचा ड्रेस घातलेली, गोरीपान, गळ्यात मोत्यांची माळ. चेहऱ्यावर सौम्य स्मित.” ह्या अशा अंधारात खरंच मला हे सर्व दिसलं का? तिच्या मनानं तिला प्रश्न केला.

तिच्या पुढे बोलण्याची प्रतिक्षा काही क्षण केल्यावर राकेशने आपल्या पंजानं तिच्या खांद्यावर थोपटल्यासारखं करून विचारलं, "पुढे बोल क्षमा. नंतर काय पाहिलंस तू?"

"क्षणभर माझं तुझ्याकडे लक्ष गेलं, बघण्याकरता की तुझं तिच्याकडे लक्ष आहे का? आणि मी परत तिच्याकडे वळले... नाही. नाही.. राकेश मी नाही सांगू शकणार.. नाही सांगू शकणा.." तिला जाणवलं तिचं सर्व शरीर त्या दृश्याच्या नुसत्या आठवणीनंही थरारलं, खालपासून वरपर्यंत. तिच्या मनात एकच तीव्र इच्छा उसळून आली, तिचं मन आंक्रंदन करून सांगत होतं, इथून निघ क्षमा. ह्या क्षणी.. पळ.. पळ दूर... दूर.

पण तिच्या ओठातून शब्द बाहेर निघण्यापूर्वीच तिच्या कानावर राकेशचे शांत शब्द पडले, "त्या तरुण स्त्रीच्या चेहऱ्याकडे मी पहात होतो, कारची गती मी कमी केली होती का नाही, मला आठवत नाही. पण कार तिच्याजवळ सरकत होती. आणि एकाएकी तिचा चेहरा बदलत गेला, केस बदलत गेले, कपडे बदलत गेले, ती तरुण स्त्री नाहिशी झाली, त्याजागी एक वाकलेली, वयस्क स्त्री उभी होती, केसांच्या झिंजांनी तिचं कपाळ झाकलं गेलं होतं, पण तरीही स्पष्ट दिसत होता तिचा चेहरां, डोळयाच्या जागी एक खड्डा होता, त्यातून रक्त बाहेर पडत होतं, थांबून थांबून,

ओघोळ खाली घसरत होते.. आणि तिचा जबड्यावरील चामडी बाजूला सरकली होती, जबड्याचं हाड उघडं पडलं होतं तिच्या.''

तो काहीवेळ पुढे बोलला नाही. क्षमाला त्याचा वेगाने धावणारा श्वासोच्छ्वास ऐकू येत होता. ''पण.. पण क्षमा, एवढी .. जखमी असूनही, ती ताठ उभी होती, आपल्याकडे बघत होती, आणि.. आणि तिच्या चेहऱ्यावर एक भेसूर हास्य होते.... '

तो बोलायचा थांबला, बऱ्याच वेळानं त्यानं तिला विचारलं, ''मी ही हेच पाहिलं, पण छे, भयानकच. मी तिचा चेहरा बदलताना पाहिलाय, चमकदार लकाकणारे डोळ्याच्या जागी खोबणी आल्या. गालाची कातडी जाऊन हाडाची कवटी.. तू हेच पाहिलंस ना?'' तिनं केवळ होकारार्थी मान डोलावली. त्यानं परत एकदा मागं वळून टक लावून, डोळे ताणून पाहिलं त्या स्पॉटकडे.

मग तिच्या खांद्यांना धरून गाडीच्या दिशेनं वळवत म्हणाला,'' चल क्षमा, गाडीत बैस. मी परत गाडी मागे घेतोय, नीट बघ तू. काही दिसलं की ताबडतोब मला सूचना दे.'' त्याला सोडून ती झपाट्यानं पलिकडे गेली, घाईघाईनं तिनं दरवाजा उघडला, आणि ती आत घुसली. दार घट्ट लावून घेतलं तिनं. काचही बंद करून घेतली पूर्ण. राकेशने कार चालू केली, त्यानं गेयर बदलला, गाडी मागे घ्यायला सुरुवात केली. ती बाहेर पाहात होती. तो स्पॉट

आता मागून सरकत येऊन पुढे गेला. डोळे विस्फारून ती पाहात होती. समोर सारं कसं शांत होतं. कुणीच नव्हतं आता तिथे.

कार थांबवून काही क्षण राकेश त्या रिकाम्या जागेकडे पाहात राहिला. मग गाडी चालू करून तो पुढे सरकला, त्याच्या गाडीनं गती पकडली. तो स्पॉट झपाटयाने मागे सरकत दृष्टिआड झाला. त्यानं गाडीची गती कमी केली. "ह्या हादश्याचा आपण जरा शांतपणे विचार करूया. काय? कसं? आणि का? तीन प्रश्न विचारूया आपण स्वत:ला पण तुर्तास फक्त 'काय'चाच विचार करूया." राकेश क्षमाला म्हणाला.

"मला वाटतं, असं काहीतरी आपल्याला दिसेल अशी तुझी अपेक्षा असावी. पण मला हा प्रकार सर्वच अनपेक्षित होता. मला जो धक्का बसलाय, मला वाटतं, त्यातून मला बाहेर पडायला वेळ लागेल. आता तरी मला प्रचंड थकवा आल्यासारखं वाटतंय राकेश." क्षमा म्हणाली.

"हे नैसर्गिकच आहे. एक अनपेक्षित धक्का, आणि एका संकटातून सहीसलामत सुटल्याची भावना. खरं आहे तू जरा आरामच कर. विचारसुद्धा करू नकोस आता काय झालं त्याचा. डोळे मिटून नुसती रिलॅक्स झालीस तरी बरं वाटेल."

त्यानं गाडीची गती वाढवली, टेप चालू करून त्यानं कुठलं तरी वाद्य संगीत सुरू केलं. गाडी संथ परंतु एका निश्चित गतीनं सुरू होती. तिनं डोळे मिटले. काय? कसं? आणि का? त्या प्रश्नांना सामोरं जायची आताच काही गरज नाहीये. किंबहुना त्या प्रश्नांशी आपल्याला काही देणंघेणं असायचं कारण नाही. एक पथ्य पाळायला हवं, ह्या स्पॉटपासून दूर राह्यचं. पण तरीही हा प्रकार काय आहे हे शोधायलाच हवं. का हे भूत, पिशाच्च आहे, असं मानणार आहोत आपण? नाही.. नाही.. पण मग..

धक्का बसून गाडीची गती एकदम कमी झाली, आणि गाडीनं शार्प टर्न घेतला तशी क्षमाला जाग आली. तिनं समोर पाहिलं, प्रकाशाच्या थारोळ्यात ट्रॅफिक पोलीस साह्यकेंद्राची लहानशीच पण टुमदार इमारत उंचवट्यावर उभी होती. ती जागी झालीय असं बघून राकेश म्हणाला, "जरा भेट देऊया इथं. काही माहिती मिळते का बघूया. नाहीतर निदान रिपोर्ट तरी नोंदवू या. तुला यायचं तर ये, नाहीतर झोप येत असेल तर राहू दे"

"नाही. झोप कुठली? जरा डुलकी झाली तर आता खूप फ्रेश वाटतंय. ' तिनं दरवाजा उघडला, ती बाहेर आली, उंचवट्यावर असलेल्या ह्या सेंटरपर्यंत पोचण्यासाठी सुबक सात आठ पायऱ्या होत्या. राकेश पायऱ्यांशी पोचलाही होता.

“वेलकम” काहीसा राकट आणि सुस्त आवाज ऐकून तिनं वर बघितले. वर एक तरुण इन्स्पेक्टर लोखंडी कठडयांवर हात ठेवून ओणवून त्यांच्याकडे बघत उभा होता. गाडीचा आवाज ऐकून बहुधा तो बाहेर आला होता. आवाजात स्वागत नाहीये, पण पोलीस स्टेशनमध्ये वेलकमने स्वागत होते हे ही काही कमी नाही. ती स्वत:शीच हसली. ती वर पोचली, तिच्या लक्षात आलं, इन्स्पेक्टर तिच्याकडे पाहात होता आणि राकेश त्याला निरखित होता. ती वर पोचल्यावर व्हरांड्यातील खुर्च्यांकडे बोट दाखवत तो अधिकारी म्हणाला, “बसा, आरामात बसा. मी आलो दोन मिनिटात. मला माहीत आहे तुम्हाला कॉफीची गरज आहे. माझं नाव पी. आय. रमेश दिघे.”

आत जाणाऱ्या पाठमोऱ्या पोलीस इन्स्पेक्टरकडे पाहात राकेश हलक्या आवाजात म्हणाला, “आज आश्चर्याचे धक्के बसण्याचा दिवस दिसतोय. निर्जन जागी विनाकारणच दर्शन देणारं सुंदर युवतीचे भूत आणि आता इथं वेलकम म्हणून कॉफी पाजणारा.. ’ दारातून बाहेर येणाऱ्या इन्स्पेक्टरची चाहूल लागल्याने राकेशने पुढचे शब्द परत आत ढकलले.

“कॉफी पाजणारा लांब कानांचा पोलीस अधिकारी” कॉफीचे ग्लासेस त्या दोघांसमोर ठेवत किंचित हसत इन्स्पेक्टर दिघे म्हणाले.

राकेश किंचित गांगरला, पण मग खांदे उडवून हसत म्हणाला, “शंकाच नाही, तुमचे कान खरोखरच लांब आहेत, पण मला वाटतं, ते तुमच्या व्यवसायाला साजेसेच आहेत.”

इन्स्पेक्टर रमेश दिघे गडगडाट करून हसू लागले आणि बराच वेळ हसत राहिले. राकेशनेही त्यांना साथ दिली. त्यांचे गडगडाट हसणं ऐकून क्षमाही हसण्यात सामील झाली.

काही वेळानं कॉफीचा ग्लास खाली ठेवत इन्स्पेक्टर दिघे म्हणाले, “आता बोला किंवा असं करूया, मीच बोलतो.”

“नाही. प्रथम आम्हाला जे दिसलं पण इतर कुणी पाहिलं नसेल. ते मीच तुम्हाला सांगतो. ती तरुणी आणि ती भयावह म्हातारी दिसल्यावर काही अंतरावर जाऊन आम्ही थांबलो, आणि गाडी परत रिव्हर्समध्ये घेतली आम्ही. आणि अगदी त्या स्पॉटच्या जवळ जाऊनही आम्हाला काही दिसलं नाही. त्या दोघीही तेथून नाहीशा झाल्या होत्या.”

“तुम्ही परत मागे वळून तेथे गेलात?” दिघ्यांनी अविश्वासाने विचारले.

“मागे वळून नाही. त्या दिसल्यानंतर पण खरं म्हणजे रूप बदलणारी ती दिसल्यानंतर म्हणायला पाहिजे, दोन तीनशे फूट पुढे जाऊन आम्ही थांबलो. पाठीमागे पाहिले तर सर्व सूनसान होते.

कुणीच नव्हतं तिथं. मग मी हळुहळू गाडी रिव्हर्स घेतली, पण त्या स्पॉटवर आम्हाला काहीही दिसलं नाही.''

इन्स्पेक्टर दिघे काही वेळ आपल्याच विचारात राहिले, त्यांचं डोकं मात्र होकारार्थी हलत राहिले बराच वेळ. मग स्वत:शीच चालू असलेला संवाद त्यांनी थांबवला आणि त्या दोघांकडे वळत ते म्हणाले, ''माझी थिअरीच बरोबर आहे असं दिसतंय. माझं म्हणणं आहे की, ही भुतं तशी सज्जन दिसत आहेत. त्याचं म्हणणं केवळ असं दिसतंय की आमच्या वहीवाटीच्या हक्कावर गदा आणू नका. थोडक्यात आम्हाला डिस्टर्ब करू नका. तुमच्या ह्या अनुभवामुळे माझ्या म्हणण्याला पुष्टीच मिळाली आहे.''

''म्हणजे इन्स्पेक्टर दिघे ही भुतांची लीला आहे असं तुमचं म्हणणं आहे?'' राकेशने विचारले.

इन्स्पेक्टरनी काही उत्तर देण्याआधीच क्षमाने पुढचा प्रश्न विचारला, ''म्हणजे दिघे, भूतं, पिशाच्चं ह्यांवर तुमचा विश्वास आहे?''

''माझा विश्वास आहे का नाही हा काही प्रश्न नाही मॅडम. ह्या योनी जर अस्तित्वात असतील, मी विश्वास ठेवला नाही तरी त्या असतील तर नाहिशा होणार नाहीत. आणि विश्वास ठेवला तरी त्यामुळे फारसा फरक पडणार नाही. आता विज्ञानाने एवढी प्रगती

केलीय, पण अजूनही आपल्याला अज्ञात अशा अनेक सजीवांच्या जाती अस्तित्वात आहेत का नाही? हिममानव अस्तित्वात आहे असं अजून अनेक लोक क्लेम करतात की नाही?”

क्षमा काहीतरी बोलणार होती, ताडकन्. पण राकेशने तिला गप्प राहण्याची खूण केली आणि त्यानं विचारलं, “ती भूतं असोत की आणखी काही. पण त्यांच्यामुळे माझ्या माहितीप्रमाणे तीन चार अपघात झाले आहेत. त्यामुळे लोकांच्या सुरक्षेकरता तुम्हाला काहीतरी करावेच लागेल.”

“तुमचं म्हणणं शंभर टक्के खरं आहे. काहीतरी करावंच लागेल. आम्ही काय केलं, वा करणार आहोत, ते सांगतो मी तुम्हाला. पण आधी चुकीची माहिती दुरुस्त करतो. त्या स्पॉटवर अजून खऱ्या अर्थानं एकही अपघात झालेला नाही. तेथे कुणीही मेलेला नाही. हां, एक तरुणाचा गाडीवरील कंट्रोल गेला, आणि पुढे जाऊन तो बाजूच्या डिव्हाईडरवर आदळला. त्याच्या गुडघ्याला दुखापत झाली, आणि त्याचा खांदा निखळला. आणखी एक प्रौढ माणूस पुढे जाऊन झाडावर आदळला. त्याचं डोकं समोर आदळलं, फुटलेल्या काचेमुळे त्याच्या गालाला जखम झाली. बाकी काही फारसं झालं नाही. हा माणूस दारू पिऊन ड्रायव्हींग करत होता. एक खरं आहे की, त्या विशिष्ट स्पॉटवर काही

जणांना काहीतरी भयावह दिसल्याचे गाडीवरील ताबा सुटल्यामुळे किरकोळ अपघात झाले आहेत. त्या प्रकारचे ३७ एफआयआर नोंदवले गेले आहेत. पण बहुतेकांनी आम्हाला फोन करून सांगितले आहे किंवा मुंबईला, पुण्याला जाऊन तेथे केस नोंदवली आहे. प्रत्यक्ष येथे येऊन माहिती देणारे विरळेच. आणि जे आले ते इतके भेदरलेले होते की, बोलणं तर सोडाच, पण श्वासोच्छ्वासही करायचे विसरले होते. पण तरीही ह्या घटनांकडे आमच्या खात्याने दुर्लक्ष केलेले नाही. माझ्या वरिष्ठाच्या सल्ल्यानूसार मी ह्या प्रकारातील तज्ज्ञाना येथे आणले, त्यांच्या सल्ल्याप्रमाणे कारवाईही केली.”

“तज्ज्ञ म्हणजे?” क्षमाने विचारले

“तज्ज्ञ म्हणजे मांत्रिक. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे त्या पिशाच्चांना शांती देण्यासाठी विधीही केले, एक बकरा बळीही दिला.”

“काय? बकरा बळी दिला? आणि हे तुम्ही डिपार्टमेंटतर्फे केले?” क्षमाने उच्च स्वरात विचारले.

“डिपार्टमेंटतर्फे नाही, पण वरच्या अधिकाऱ्यांची अनुमती घेऊन मी स्वखर्चाने केले सर्व विधी. काहीतरी करायलाच हवे होते ना मॅडम?”

“पण तरीही हे हादसे होतच राहिले ना?”

इन्स्पेक्टर रमेश दिघे काही वेळ काहीच बोलले नाहीत, मग म्हणाले, “तुम्ही म्हणता ते खरं आहे. म्हणून आम्ही तातडीची कारवाई म्हणून तेथे अपघातस्थळ म्हणून बोर्ड लावून टाकला. पण आता आम्ही निर्णय घेतला आहे. त्या स्पॉटपाशी आम्ही एक लहानसं गार्डन करणार आहोत. रस्ता त्यामुळे तेथे जरा अरुंद होईल, पण त्यामुळे वाहने त्या स्पॉटपासून दुरून जातील. ’

“मग ती भुतं रस्त्यावर आडवी येऊन दर्शन देतील!” राकेश म्हणाला.

“नाही. मला तसं वाटत नाही. म्हणूनच मी म्हणालो ना की ती भूतं सज्जन दिसताहेत. आतापर्यंत ती आपली विशिष्ट जागा सोडून भटकल्याचा रिपोर्ट नाही.” काही क्षण ते त्या दोघांकडे केवळ स्मितहास्य करीत पाहात राहिले, मग म्हणाले, “ही आपली गंमत झाली. सत्य तर हे आहे की त्या मांत्रिकानं त्या एका वर्तुळात अडकवून ठेवलंय. त्याच्याबाहेर ते येऊच शकत नाहीत.”

“इन्स्पेक्टर, तुम्ही हे खरंच सांगताहात की आमची फिरकी घेताहात?’ क्षमाने साशंक स्वरात विचारलं.

“मॅडम, अहो जबाबदार पोलीस अधिकारी आहे मी, तुमची फिरकी कशी घेणार मी. अनुभवाच्या जोरावर बोलतो मी. पूर्वी ती

म्हातारी आणि ती बाई इकडे तिकडे भटकायच्या, परंतु मांत्रिकानं ते विधी केल्यापासून त्यांना तिथेच बांधले गेले आहे.''

राकेश आणि क्षमा काहीच न बोलता गप्प राहिले बराच वेळ. मग अखेर राकेशने विचारलं, ''आम्ही काही लेखी देण्याची गरज आहे का?''

''तुमचा दोघांचा पत्ता, फोन नंबर देऊन ठेवा. इतर सर्व ते दृश्य दिसताच गाडी भरधाव सोडून पळून आले होते. त्यांनी काय पाहिलं ते त्यांना नीट सांगताही आलेलं नाही. पण तुम्ही हिमंतीचे दिसता, तुम्ही आणि मॅडमही. नाहीतर काय करणार बरोबर स्त्री होती म्हणून, अशी सबब सांगून अनेकदा पुरुष स्त्रियांच्या मागे लपतात. पण आता तुमचा वेळ खर्च करायची काही गरज नाही. तुम्हाला काय दिसलं ते नीट सविस्तर लिहून येथे पाठवता आले तर बघा.''

''कॉफीबद्दल थॅंक्स.'' खिशातून कार्ड काढून दिघ्यांच्या हातात देऊन राकेश मागे वळलाही. क्षमानेही आपलं कार्ड समोर ठेवलं आणि ती खाली उतरली.

ती त्याच्या शेजारी बसताच त्यानं गाडी चालू केली, हायवेवर आल्यावर मुंबईकडे जाण्यासाठी रस्त्याच्या पलिकडे जाण्याऐवजी त्यानं परत पुण्याच्या दिशेनं गाडी वळवली. क्षमाला वाटलं, पलिकडच्या मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर जायला खाली कुठेतरी

सोय असणार म्हणूनच राकेश तिकडे चालला आहे. पण बराच वेळ कार धावतच राहिल्यावर तिने त्याला विचारलं, “आपलं आता मुंबईला जायचं पोस्टपोन केले आहे का राकेश? तुला ते शक्य असेल, पण मला सकाळी नऊ वाजता क्लायंटला भेटायलाच हवं.”

“डोन्ट वरी. आपण फक्त त्या स्पॉटला परत एकदा व्हिजीट देणार आहोत. जरा संशोधन करणार आहोत. ह्या पोलीसांनी पूर्वग्रह न राखता तपास कसा करायला हवा ते दाखवणार आहे मी त्यांना.” त्यानं दाबून टाकलेला संताप आणि उद्वेग आता उसळून आला होता.

क्षमा काहीच बोलली नाही. पोलीसांनी ह्या प्रकरणाच्या मूळाशी जाण्याऐवजी केलेली ही उपाययोजना तिलाही आवडली नव्हती. पण त्याचबरोबर राकेशने काहीही संबंध नसताना ह्या प्रकरणात लक्ष घालावं वा नाही ह्याबद्दल ती साशंक होती. शिवाय असा तातडीचा निर्णय घेऊन मागे जाणं कितपत बरोबर होतं ह्याबद्दलही ती साशंक होती.

काहीच प्रतिक्रिया न देता ती विचार करत्येय हे पाहून राकेश म्हणाला, “सॉरी क्षमा, तुझं मत न घेता परत त्या स्पॉटला जायचा निर्णय घेतला. तुझी इच्छा नसेल तर अजूनही आपण मागे वळूया.”

"नाही. माझी काही तशी हरकत नाही, अर्धा तास आपण उशिरा मुंबईला पोचू एवढेच होईल. पण मला वाटतं काहीतरी एक्स्प्लेनेशन असावं तुझ्या मनात. '

"तेथे गार्डन बनवण्याचा जो निर्णय घेतलाय ना पोलीसांनी. त्यात एक गृहितक आहे, ते भूत केवळ एका विशिष्ट स्पॉटवरच दिसतं आणि ते तेथेच राहील. जर गार्डन तयार केलं तर पिशाच्च आपल्या लीला दाखवण्यासाठी पुढे का येणार नाही?"

त्यानं उजव्या हाताला नजर टाकली. पलिकडच्या बाजूला तो खडीसेंटरचा रॅम्प दिसत होता. त्यानं गाडीची गती कमी केली. "इथंच कुठतरी आपल्याला पलिकडे जाण्यासाठी वाट आहे असं मला आठवतंय. मला असं वाटतंय क्षमा. त्या दोन्ही आकृती म्हणजे प्रतिमा आहेत, त्या कशाप्रकारे तेथे प्रोजेक्ट केल्या जातात? त्यामागे तंत्र काय आहे? कोण करतो? त्यामागील उद्देश काय? ह्या प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे नाहीत. पण आता आपण लकी असलो तर ती भुतं प्रतिमा आहेत वा नाहीत ह्याची आपल्याला खात्री करता येईल."

त्यानं कार काठाला घेऊन थांबवली. अप-डाऊन लेन्सना विभागणारी मधली पट्टी येथे भंग झाल्याचे दिसत होते. सेंटरला नवीन फोन बूथ बसवल्याचे दिसत होते, आणि त्यासाठी काही

झुडपे तोडून, अडथळा बाजूला करून रस्ता केलेला दिसत होता. रस्ता क्रॉस करून राकेश पलीकडच्या लेनला जाता येईल की नाही ते बघून आला. मग गाडीत बसून त्यानं दोन्ही दिशांना बघून घेतलं आणि गर्रकन् गाडी वळवून मधली पट्टी क्रॉस करून पलीकडच्या रस्त्यावर येऊन काठाला जाऊन त्यानं कार थांबवली. खाली उतरत तो म्हणाला, "क्षमा तू आता ड्रायव्हींग करायचंस. तुला तो स्पॉट माहीत आहे, त्या बाईनं जर परत दर्शन दिलं, तर अगदी जवळ पोचल्यावर गाडीचा वेग अगदी कमी कर. मला खाली उतरता आलं पाहिजे. मग काही अंतर सावकाश पुढे सरकत राहा. जर भलतंच काही घडलं, मला काही धोका झाला, तर गाडी पळवत घेऊन जा, रमेश दिघ्यांकडे. पण माझी खात्री आहे, तशी वेळ येणारच नाही."

पुढून वळसा घालून तो तिच्या साईडला येईपर्यंत ती दार उघडून बाहेर आली होती. ते समोरासमोर आले तेव्हा राकेशने तिच्या खांद्यावर हात ठेवून तिला विचारलं, "आर यु रेडी मॅडम? कदाचित काहीच होणार नाही, त्या प्रतिमा आपल्याला दिसणारही नाहीत. पण बघूया चान्स तर घेऊया."

हसतच तो तिच्या बाजूनं दाराकडे वळला. क्षमा दुसऱ्या बाजूला पोचली, दरवाजा उघडाच होता, आत शिरण्यापूर्वी तिनं

रोडवर दोन्ही दिशांना दूरवर नजर टाकली. दोन्ही बाजूच्या लेन्स रिकाम्या होत्या. ड्रायव्हींग सीटवर बसण्याआधी तिनं ओढणीने समोरची काच पुसून घेतली. ती आत बसली, इंजीन चालू करून तिनं डाव्या बाजूला पुढे बघितलं. काही अंतरावरच ती ओळखीची टेकडी दिसत होती. तिनं गाडी चालू केली. आपल्या बाजूची काच लावून घेत राकेश तिला म्हणाला, “क्षमा, तुझ्या बाजूचीही काच लावून घे.”

क्षमाने काच वर सरकवली, तिनं गाडीची गती जरा वाढवली. तिनं आपल्या मनात डोकावून पाहिलं, तिला आश्चर्यच वाटलं, तिच्या मनात किचिंतही भीती नव्हती. तिचं मन सांगत होतं, आता तेथे काहीही नसणार. ना पिशाच्च, ना भूत, ना प्रतिमा. का राकेशच्या बुद्धीबद्दल आणि तो आपल्याला कुठल्याही प्रकारच्या धोक्यात घालणार नाही हा विश्वास आपल्या मनात आहे? तिने डाव्या बाजूला नजर टाकली. राकेशही बाहेरच बघत होता, दाराच्या हॅन्डलवर हात ठेवून तयारीत. मघापेक्षा धुकं किंचित वाढलं होतं. ती रस्त्यालगतची टेकडी पार करून गाडी पुढे आली, पण आता दगडाच्या खाणीनी कुरूप केलेली ती टेकडी अगदीच अस्पष्ट दिसत होती, आणि तिच्यापुढील खडीसेंटरचा तो रॅम्पही धूसर दिसत होता. तिनं उजव्या बाजूला रस्त्यावर नजर टाकली, आरशामधून मागे बघितलं, सर्व रस्ता सुनसान होता. दूर डाव्या

बाजूला रस्ता जरा वळत होता, तेथे मुंबईकडे जाणाऱ्या दोन कार्सचे टेललॅम्प लुकलुकत होते. तिची नजर डाव्या बाजूनं घसरत खाली आली आणि स्टिअरिंग व्हीलवरील तिच्या हातांची पकड घट्ट झाली. ती तरूणी तेथेच उभी होती, तशीच, त्याच पोजमध्ये. राकेशचा अंदाज खरा असावा, क्षमाने गती जरा कमी केली, राकेशने हॅन्डल फिरवल्याचा आवाज तिच्या कानावर आला, त्यानं दार उघडलं असावं, ह्यावेळी त्या स्त्रीवरची आपली नजर ढळू द्यायची नाही असं ठरवलं होतं तिनं. थंड हवेचा झोत तिच्या चेहऱ्याला जाणवला. गाडीची गती अधिकच कमी झाली, आता गाडी त्या स्त्रीपासून काही मिटर्सवर येऊन पोचली होती. त्या स्त्रीचा चेहरा आता कारच्या दिशेने वळला होता, दार लावल्याचा आवाज आला, तसं क्षमाने राकेशकडे नजर टाकली. राकेश खाली उतरून झपाट्याने पुढे गेला होता. काही अंतरावर जाऊन तो थबकला होता. तो त्या स्त्रीकडे निरखून पाहात होता. क्षमाने गाडी अगदी मंद गतीने पुढे सरकवायला सुरुवात केली. त्या स्त्रीने आपला हात हलवल्यासारखं भासलं तिला. राकेश आता थबकला होता. काहीसे गुडघे वाकवून, कमरेत वाकून त्यानं आपलं डोकं खाली घेतलं, मग तो परत सरळ झाला, काहीसं उजव्या बाजूला सरकून त्यानं आपलं डोकं उजवीकडे झुकवलं. तिच्या लक्षात आलं, तो त्या स्त्रीकडे वेगवेगळ्या कोनांतून पाहाण्याचा प्रयत्न करत होता.

त्याचं सर्व लक्ष त्या स्त्रीकडे केंद्रित झालं होतं. त्यानं आणखी एक पाऊल पुढे घेतलं. क्षमानें गाडी थोडीशी पुढे घेतली, आणि ती एकदम दचकली, त्या स्त्रीचा चेहऱ्यात बदल झाला होता, स्त्रीचा चेहरा धूसर झाला होता, आणि त्या धूसर चेहऱ्याच्या जागी तो म्हातारा भेसूर चेहरा आकारात येत होता. तिनं गाडी थांबवली. राकेश आता अगदी त्या थेरडीजवळ पोचला होता, त्याला सावध करावं म्हणून ती ओरडणारच होती, पण तिच्या गळयातून आवाजच बाहेर फुटत नव्हता. आपला एक हात पुढे करून राकेश अगदी तिच्याजवळ पोचला होता.

धडपडत क्षमा दार उघडून बाहेर आली, गाडीचा आधार घेऊन ती दोन पावलं पुढे सरकली. क्षमाची नजर त्या भेसूर चेहऱ्यावर खिळली होती, राकेशच्या पुढे सरकणाऱ्या हातावर खिळली होती. तो भयावह चेहरा, ते भेसूर हास्य, डोळयाच्या खोबणीतून गालावर सरकणारे रक्ताचे काळे ओघोळ, फाटलेला गाल, उघडं पडलेलं जबड्याचं हाड, केसांच्या झिंजा. तिनं किंचाळी मारण्याकरता तोंड उघडले. राकेशचा एक हात त्या भयावह चेहऱ्याजवळ पोचला होता, त्याची बोट उघड्यापडलेल्या जबड्याच्या हाडांना स्पर्श करणार होती, त्याच्या बोटांवरून ते अभद्र रक्त वाहणार होतं, तिचं सर्व अंग जोरात थरथरलं, आणि.. इतका वेळ घशात अडकलेली ती कर्कश किंचाळी तिच्या तोंडून

बाहेर पडली, राकेशची दोन बोट त्या जखमेपाशी पोचली होती, आणि त्या उघड्या जखमेतून आत आत...

कर्कश किंचाळी ऐकून राकेश दचकून तिच्याकडे वळला, डोळे विस्फारून क्षमाकडे पाहात राहिला क्षणभर. तिचं थरथरणारं शरीर, तिचं उघडं तोंड, विस्फारलेले डोळे. तो तिच्याकडे धाव घेणार होता, पण मग त्याच्या लक्षात आलं, तिच्या चेहऱ्यावरील भीतीचे भाव नाहीसे झाले, किंचाळी मारण्यासाठी उघडलेलं तोंड तिनं मिटून घेतले पण विस्फारलेल्या डोळयांनी ती तशीच त्याच्याकडे पाहात होती.

क्षमाच्या नजरेसमोरून ती म्हातारी दिसेनाशी झाली होती. हात पुढे केलेला राकेश जागीच थिजल्यासारखा उभा होता.

राकेशने मागे वळून ती म्हातारी होती तेथे बघितलं. ती थेरडी नाहिशी झाली होती. तो गोंधळल्यासारखा भोवताली पाहात राहिला. आणि मग तो एकाएकी खाली बसला. क्षमा राकेशकडे धावली. तिच्या पावलांची चाहूल लागून तो उभा राहिला आणि तिच्याकडे वळून पुढे झाला. त्याच्या चेहऱ्यावर हास्य होतं.

तिच्या कोपराला धरून गाडीकडे वळत तो म्हणाला, "चल, लवकर येथून सटकूया. आपण येथे आल्याचे त्यांच्या लक्षात आलं

असावं किंवा कुणी प्रतिमेच्या जवळ आलं तर प्रोजेक्शन बंद व्हावं अशी काहीतरी व्यवस्था असावी.''

गाडीपाशी आल्यावर तो तिला म्हणाला, ''आता तुच ड्रायव्हींग कर क्षमा. मला काय समजलंय किंवा अंदाज आला आहे ते सांगतो मी तुला. काय, कसं आणि का मधील कायचं उत्तर पन्नास टक्केतरी मला समजलंय असं वाटतंय मला. पण तू बाहेर का आलीस?''

ती त्याच्याकडे काही क्षण पाहात राहिली, मग म्हणाली, ''शी.. नुसती आठवण झाली तरी शहारे येतात अंगावर. आणि तू सरळ त्या रक्ताळलेल्या चेहऱ्याला स्पर्श करायला निघाला होतास.''

''म्हणजे तुला त्या तरुणीचं बदललेलं रुप दिसत होतं? मला तर ती तरुणीच दिसत होती. मला हे सांग क्षमा, माझा हात त्या तरूणीच्या गालाशी पोचला तेव्हा काय झालं?''

ती काही क्षण त्याच्याकडे पाहात राहिली, तिच्या फिक्या पडलेल्या चेहऱ्यावर लाली परतत होती, पण ओठ अजूनही थरथरत होते. खालचा ओठ दाताखाली दाबून ती क्षणभर तशीच उभी राहिली, मग तिच्या जिव्हणीवर अस्पष्ट स्मित उमटलं. ''तुझा हात तरुणीच्या गालाकडे नव्हता गेला राकेश. तुझी दोन बोटं चक्क

त्या थेरडीच्या जखमेशी पोचली होती, नाही, चक्क जखमेत घुसली होती.”

मग क्षमा पुढे झाली, तिनं त्याचा हात हातात घेतला, त्याच्या बोटांकडे निरखून पाहिलं तिनं. मग हळूच आपल्या हाताची बोटं तिनं त्याच्या बोटांवरून फिरवली, जणू तो अमंगल स्पर्श ती पुसून टाकत होती.

मी तर त्या तरुणीच्या गालाला स्पर्श करणार होतो. आता माझी खात्री झालीय क्षमा, ती होलोग्राफीक प्रतिमा आहे.”आणि तो मोठ्यानं हसू लागला.

हंसतच दार उघडून आत घुसताना तिच्या खांद्यावर थोपटत तो म्हणाला,”चला, निघूया आता. तुर्तास ड्रायव्हींग तुच कर.”

मग गाडीने गती घेतल्यावर तिच्याकडे वळत तो म्हणाला, “माझी खात्री झालीय क्षमा. त्यांनी दोन प्रतिमा प्रोजेक्ट केल्यात, एक त्या तरुण स्त्रीची आणि दुसरी त्या हिडीस म्हातारीची. नाही... नाही प्रतिमा एकच आहे, पण वेगवेगळ्या ऍंगल्स मधून पाहिलं की वेगवेगळी दिसते ती. तू माझ्यापासून दूर होतीस, तुझ्या बघण्याचा कोन वेगळा होता, म्हणून तुला तरुणीच्या जागी ती थेरडी दिसत होती. नक्कीच ती प्रतिमा होलोग्राफीक इमेज असावी. रिमोटने

कंट्रोल केला जाणारा जाणारा कॅमेरा जवळपास लपवलेला असला पाहिजे.

समोर दूर ट्रॅफिक पोलीस एड सेंटरची बिल्डींग दिसायला लागलेली पाहून क्षमाने विचारलं, ‘‘मग आपण काय करणार आहोत? पोलीस इन्स्पेक्टर दिघ्यांना सर्व सविस्तर सांगणार आहोत का?’’

‘‘बिलकूल नाही. आपल्या फक्त हे काय आहे, ह्याचा अंदाज आला आहे. कसं आणि का हे कुठं आपल्याला माहीत आहे? आणि माझा अंदाज आहे क्षमा. हे साधं प्रकरण नसावं. कुणीतरी उगाचच एवढा प्रचंड उपदव्याप केवळ जोक किंवा प्रयोग म्हणून करणार नाही. ’

काही वेळ ती काहीच प्रतिक्रिया व्यक्त न करता गाडी पळवत राहिली. मग त्याच्याकडे वळून म्हणाली, ‘‘इथं जवळपास असं काहीतरी चाललंय राकेश की, तेथे कुणीही जवळपास फिरकू नये असं कुणाला तरी वाटतंय.’’

‘‘तुझं म्हणणं योग्य वाटतंय मला. ही जागा म्हणजे बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथेतील स्थानासारखीच आहे. पण तसं असेल तर ते जे कुणी आहेत, ते येणारे कुणी जवळपास फिरकू नयेत म्हणून आणखीही काही उपाययोजना करायला तयार असतील.

आणि तसं असलं तरी हे येणारे कुणी, आपण असलो तर मला वाटतं काही दिवस जरा वेगळी मजा येईल अनुभवाला.”

“पण हे रिकामे धंदे करत बसले तर माझ्या व्यवसायाचं काय? तुझं ठीक आहे, तू काय आतापर्यंत रिकामे धंदे करतच जगला आहेस.” क्षमाने आवाजात सिरियसनेस आणत विचारले.

“आपण असं म्हणूया की तुझा एक भावी कस्टमर तुला भरपूर मोठं काम द्यायला तयार आहे. त्याला ह्या टोलनाक्याच्या आसपास, एक्स्प्रेसवेच्या जवळ जागा विकत घ्यायचीय. त्यानं तुझ्याकडे मदत मागितली आहे. तू काय करशील?”

“हे अवलंबून आहे, तो कस्टमर किती मायाळू आहे ह्यावर” ती म्हणाली आणि मग दोघंही हसत सुटले. काही वेळानं क्षमानं घड्याळाकडे नजर टाकली आणि राकेशकडे वळत ती म्हणाली, “एनीवे आता मायानगरी येईपर्यंत, नवी मुंबई येईपर्यंत मी केवळ ड्रायव्हींगकडे लक्ष देणार आहे. आणि ह्या काळात माझ्या कानाला तुझ्या तोंडच्या शब्दाचाही स्पर्श व्हायला नको. ’

“ठीकाय, ठिकाय” तो तिच्या स्टाईलमध्ये म्हणाला.

दादर टी. टी. ला ते जेव्हा तिच्या वडलांच्या जुन्या प्लॉटवर पोचले तेव्हा चार वाजत आले होते. वाटेत दोघांनी घरी पोचल्याबरोबर ताबडतोब झोपून सकाळी नऊ वाजता उठल्यावर

सर्व दिवस काय करायचे ते ठरवून घेतले होते. शिवाय आता गप्पा मारायला सुरूवात केली तर गप्पातच पहाट होण्याची शक्यताही होती. गेल्या दोन महिन्यांपासून बंद असलेला फ्लॅट उघडून सगळे फॅन्स ऑन करून ते दोघं जागा मिळेल तेथे आडवे झाले.

“मॅडम, चाय लाया हूं।” आवाज ऐकून क्षमाने डोळे उघडले. काही क्षण तिच्या आपण कुठे आहोत हेच ध्यानात आले नाही. मग राकेशचा टवटवीत, हंसरा चेहरा पाहून ती खडबडून जागी झाली, घाईघाईने बसती होत तिने त्याच्या हातातील कप घेतला आणि ओठाला लावत विचारले, “बापरे, रात्री गाढ झोपच लागली नाही रे, स्वप्नात त्या थेरडीचा चेहरा येत होता सारखा. खूप जास्त झोपले का रे राकेश?”

राकेश कॉटवर बसत म्हणाला, “नाही मॅडम, तुम्ही वेळेवरच उठताहात. मी मात्र लवकर उठलोय, खाली जाऊन दूध घेऊन आलो. एका प्रकाशकाला आणि दोन मित्रांना फोन केला. मला वाटतं, क्षमा, तू आता पटापट आटप, दोघंही बरोबरच बाहेर पडू, खाली उडप्याकडे नास्ता घेऊ आणि आपापल्या कामाला लागूया.’

क्षमाने चेहरा वाकडातिकडा केला, “शी.. काय रे हे! बेड टीचा सगळा मजा किरकिरा केलास. जरा चहा तरी आरामात घेऊ द्यायचा होतास की, ताज्या बातम्या सांगत. ’

“ताजी बातमी हीच आहे क्षमा, ह्या चार पाच तासांच्या झोपेतून उठता उठता मला साक्षात्कार झालाय की, ती भूतावळ म्हणजे होलोग्राफीक इमेजेसच असतील तर त्यांचं दर्शन केवळ रात्रीच होत असावं. आणि ह्या असल्या प्रकारांमुळे लोकांना दूर ठेवण्याऐवजी आपल्यासारखे लोक आकर्षितच होणार. लोकांना घाबरवण्यासाठी हा प्रकार करणं म्हणजे मूर्खपणा आहे. आणि एनी वे क्षमा, त्या जागेबद्दल कोणाला आकर्षण वाटणार आहे?’

“मला वाटतं, खास लोकांना पाहूणचार द्यायला फार्म हाऊस तयार करायला ती जागा फारच आयडीयल आहे. त्या लोकांना दूर ठेवण्याचाच उद्देश असावा. असो. तुझा कार्यक्रम काय आहे मला माहीत नाही. मला भरपूर कामं आहेत, पण त्यातही मी एक करते, त्या क्षेत्रातल्या रिअल इस्टेटचा व्यवहार करणाऱ्या एजंटचं नाव मी मिळवते, जमलं तर त्याच्याशी बोलतेही.”

“दॅटस अ गुड आयडीया. मी असं करतो क्षमा, माझा एक वैज्ञानिक दोस्त आहे. त्याला मी गाठतो, आणि अशा प्रतिमा

प्रोजेक्ट करणं शक्य आहे का? भारतात कुणी ह्यात उत्पादक किंवा तज्ज्ञ आहे का? ह्याची माहिती काढतो.”

उडप्याकडे मद्रास कॉफीचा घोट काहीवेळ जीभेवर ठेवून त्याची कडू चव अनुभवताना क्षमाने समोर बसलेल्या राकेशकडे पाहिलं. तो अगदी एकाग्र होऊन कांदा उत्तप्प्याची चव घेत होता. कधीही सरळ न बोलणारा, सरळ न चालणारा हा माणूस लग्नानंतर माणसाळेल अशी अपेक्षा चुकच ठरेल. पण आपली तशी अपेक्षा आहे का? ती अपेक्षा असेल तर ह्याच्यापेक्षा संजय किती तरी योग्य आहे नवरा म्हणून. पण मग आपल्याला योग्य गृहिणी होण्याकरता बरेच बदल करावे लागतील स्वत:त. छे.. छे. राकेश म्हणजे रस्त्याने चालणाऱ्या लहान पोरासारखा आहे. मन आलं तर कुठंही थबकेल, कशीही दिशा बदलेल, धावेल, उड्या मारेल, स्वत:भोवतीच गर्रारा फिरेल. नाहीतर कुठेही मातीत बैठक मारून जमीनीवरून चालणाऱ्या किड्याच्या हालचाली निरखत बसेल. पिकनिकला जंगलात भटकंती केल्यासारखं हा आयुष्यात जगतो आहे. लग्नानंतर कदाचित हा लग्नाळेलही, जबाबदार संसारी होईलही. पण तसा बदल झालेला राकेश आपल्याला चालेल का? मला वाटतं, क्षमा, तुझी गोची इथंच आहे. तुला आपला नवरा कसा हवाय हेच स्पष्ट नाहीये.

"काय गं बाई, उत्तप्पा नाही पण उत्तप्पा खाणारा माणूस बघायला तुला आवडतं की काय?" समोरची रिकामी डीश बाजूला सरकवत त्यानं विचारलं, तेव्हा तिच्या लक्षात आलं, बराच वेळापासून आपण त्याच्याकडे पाहात विचार करत होतो.

ती केवळ हंसली, मग घड्याळाकडे कटाक्ष टाकून म्हणाली, "तू काय चहा घेणार आहेस?"

"नको. माझ्या मित्राची अपॉइंटमेंट अंधेरी स्टेशनजवळील रेस्तॉरॉला आहे. तेथेच चहा घेईन. चल निघूया."

एशियाटीक लायब्ररीजवळील कॉफीहाऊस जवळ टॅक्सी थांबताच टॅक्सी ड्रायव्हरच्या हातात पन्नासची नोट कोंबून राकेश जवळ जवळ धावतच आत शिरला. अजून क्षमा येथे पोचलेली नाही हे पाहून त्यानं सुस्कारा सोडला. बहुतेक टेबलं रिकामीच होती. पण त्याला माहीत होतं, काही वेळातच ही सर्व टेबल भरतील, सकाळपासून दिवसभर हे हाऊस कधी रिकामे नसतं. आता संध्याकाळचा काही वेळ असा गेला की, परत गर्दी होईल. पण दिवसाचा आणि आता संध्याकाळचा मॉब वेगळाच. त्यानं कोपऱ्यातल्या त्याच्या आवडत्या टेबलाकडे मोर्चा वळवला.

टेबल कोपऱ्यात असलं तरी जवळच्या काचेच्या खिडकीतून रस्त्यावरून येणारी जाणारी माणसं सहज दिसतात.

कॉफीची ऑर्डर देताना तो काहीसा घोटाळला होता, क्षमा आल्यावरच ऑर्डर द्यावी अस वाटलं त्याला. पण मग त्याच्या मनात आलं, तसं पाहिलं तर भेटण्याची निश्चित वेळ तर आपण ठरवलीच नव्हती. जर फारच उशीर लागणार असेल तर मोबाईल करेलच की ती.

आपल्या लेखक कम प्रकाशक दोस्ताला निपटवून त्यानं जिमीला गाठायचे ठरवले होते. त्याच्या अपेक्षेपेक्षा जिमीशी त्याची ही भेट फारच यशस्वी झाली होती. त्याला माहीत होतं, जिमी मोकळ्या स्वभावाचा असला तरी तो फार मूडी आहे. परंतु आज जिमी बोलण्याच्या मूडमध्ये होता, त्यानं राकेशला इन्स्टीट्यूटमध्येच भेटायचे आणि आपल्याबरोबरच लंच घ्यायचे आमंत्रण दिले होते. राकेश जिमीला जवळ जवळ तीन वर्षांच्या गॅपनंतर भेटणार होता. एक काळ होता की ज्या काळात ते सातत्याने एकमेकांच्या संपर्कात असायचे. राकेश नाट्यक्षेत्रातील एका वेगळ्याच वेडानं पछाडलेल्या अभिनेत्याने आदिवासी क्षेत्रातील मुलांचे घेतलेले नाट्यशिबीर कव्हर करायला गेला होता. तेथे जिमीची आणि त्याची भेट झाली होती. अगदी दुर्गम अशा

क्षेत्रातील आणि जेमतेम माध्यमिक शाळेपर्यंत पोचलेले आदिवासी तरुण ह्या निवासी शिबीराला आले होते. दिवसभर त्यांना आधुनिक नाट्यशास्त्रातील, नाट्यतंत्रातील वेगवेगळ्या अंगांची ओळख हा अभिनेता-दिग्दर्शक करून देत होता. पण त्याचबरोबर नाटकं न पाहिलेले, नाट्यतंत्राचा अभ्यास न केलेले हे तरुण आपल्या भावभावना नाट्यमयरित्या व्यक्त करण्याकरता कुठले उपजत तंत्र वापरतात हे अनुभवणे हाच त्याचा खरा उद्देश होता. जिमी तेथे आला होता कारण अगदी सामान्य माणूस देखील वैज्ञानिक पद्धतीने विचार करतो का? ह्या प्रश्नाचा त्याला शोध घ्यायचा होता. रोज संध्याकाळी जेवणं झाल्यावर तो तास, दीड तास आदिवासी पोरांशी विज्ञान म्हणजे काय? वैज्ञानिक प्रगतीचा इतिहास, वैज्ञानिक आणि त्यांना लागलेले शोध ह्याबद्दल गप्पा मारायचा. आणि गंमत म्हणजे नाट्यक्षेत्रातील त्या अभिनेत्यापेक्षाही हा वैज्ञानिक त्या आदिवासी तरुणांशी सहजतेने संवाद साधू शकत होता. जिमीची आणि राकेशशी तेथे दोस्ती जमली आणि पुढे बराच काळ ते एकमेकाच्या संपर्कात होते. परंतु मधल्या काळात जिमीची मतं बदलत गेली होती. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान हे सामान्य माणसाच्या विकासासाठी, समाजातील असमानता दूर करण्यासाठी वापरता येईल ही एक भ्रमक संकल्पना आहे असं त्याचं मत होत गेलं होतं, त्याच्यातील सिनिसीझम् वाढत गेला

होताच, पण वाईट म्हणजे त्याचा एकूण जीवनातील रसही कमी होत गेला होता. हा बदल होण्यामागे त्याच्या कौटुंबिक जीवनात झालेले बदल असावेत असा राकेशचा अंदाज होता. पण स्वतः होऊन दुसऱ्याच्या खासगी जीवनात डोकावून पाह्यचं नाही, अशी राकेशची नैतिक भूमिका होती. आणि कदाचित आपलं वैवाहिक वा कौटुंबिक जीवन म्हणजे आपली वैयक्तिक बाब आहे, अशी जिमीची नैतिक भूमिका असावी. पण एक वास्तव होतं की, गेल्या तीन वर्षापासून त्यांच्यात दूरावा निर्माण झाला होता, मानसिक आणि शारीरिकही, राकेश औरंगाबादला राहायला गेल्यामुळे.

पण त्या दिवशी कोणत्या तरी अगम्य कारणांमुळे जिमी त्याच्या ह्या अभद्र मूडमधून बाहेर आलेला होता. राकेशने आदल्या दिवशी झालेली एक्स्प्रेसवे वरील कहाणी त्याला सांगितली आणि जिमी एकदम खुर्चीवर पुढे सरसावूनच बसला, “अरे परवाच इंटरनेटवरील काही युरोपियन सायन्टीस्टस् बरोबर नेटवर बोलत होतो. नेमका हाच विषय चर्चेला होता. होलोग्राफीचं हे तंत्र सहज गंमत म्हणून सुरु झालंय, पण त्याचा उपयोग कसा केला जातो किंवा केला जाईल, आपल्या डोक्यातही येणार नाही. आजच्या जगात असं झालंय, विशेषत: स्टेटस् आणि युरोपमध्ये विज्ञानातील कुठल्याही शाखेत होणाऱ्या संशोधनातून काही नवीन निघतंय, असा संशय जरी आला तरी ते संशोधन लुप्त होऊन जातं, आणि

मग केवळ डिफेन्सच्या नावाने जे विनाशतंत्र विकसित होतंय त्यासाठीच सगळं ज्ञान कब्जात घेतलं जातं. होलोग्राफीचंही तेच होतंय. तुम्ही एकदा शत्रू आणि मित्र, आपला आणि परका अशा दृष्टीने जगाकडे बघत असाल ना, तर मग प्रत्येक तंत्र शत्रूला खच्ची करण्यासाठी किंवा स्वत:ला जास्त बलवान करण्याकरता कसं वापरता येईल ह्याच दृष्टीने विचार केला जातो. आता बघ ना. आपली लढाऊ जहाजे किंवा विमानं शत्रूपासून लपवून ठेवण्याकरता, म्हणजे केमोफ्लाज करण्यासाठी होलोग्राफीक इमेजेसचा उपयोग करायचे तंत्र विकसित करताहेत. '

बोलता बोलता त्याचा आवाज तर तीव्र झाला होताच, पण त्याच्या चेहऱ्यावरूनही तो उत्तेजित झाल्याचं दिसत होतं. राकेशला त्याला बीपी असल्याचं माहीत होतं, त्यामुळे त्याला न दुखावता एक्साईट न होण्याबद्दल कसं सांगायचं ह्याचाच तो विचार करत होता. पण जिमीच बोलता बोलता अडखळला होता, त्यानं भोवताली बघितलं होतं, मग तोच म्हणाला होता, "आपण असं करूया, मला काही अर्जंट पत्र वाचून त्यावर रिमार्क द्यायचेत. तू जरा वेटींग रुममध्ये बसून तेथील मासिकं बघत बस. तुला तर माहीत आहे, तुला कुठेही पाह्यला मिळणार नाहीत अशी मासिकं मी सबस्क्राईब केली आहेत. पण ती येथे कुणीही वाचत नाहीत साले. इडियटस्. ह्यांचा फिजिक्सशी संबंध केवळ नोकरी

मिळेपर्यंत. एकदा नोकरी मिळाली ना की हे इतर नोकरशहांसारखेच. '

राकेश घाईघाईत उठून बाहेर आला होता. वास्तविक त्याला केवळ काही निश्चित प्रश्नांची उत्तरं पाहिजे होती. पण आता त्याची इच्छा असो वा नसो जिमी त्याला आपल्या बरोबर फरफटत नेणार होता. अर्थात राकेशची असं फरफटत जायला काहीच हरकत नव्हती. फक्त जिमीनं आपल्या कार्यालयातील पर्यावरणावर बोलू नये अशी तो मनोमन प्रार्थना करत होता. पंचवीस तीस मिनिटांतच जिमी वेटींगरूममध्ये आला, म्हणाला, "चला, लवकर सुटका झाली. तुला फार वेळ वाट नाही पाहावी लागली. पण चांगल्यासोबत नेहमी वाईटही असतंच. ह्या जगात काहीही निर्भेळ, विशुद्ध मिळत नाही. मतितार्थ आणि भावार्थ असां की आज माझा गप्पांचा मूड असूनही मी लंचपुरताच तुला ऍव्हेलेबल असेन. आपल्याला ह्या विषयावर मनसोक्त व विविध अंगांनी बोलायला परत कधीतरी वेळ शोधावी लागेल.

मी म्हटलं ना प्रत्येक वैज्ञानिक तंत्र लढाईकरता, जिंकण्याकरता म्हणजेच हरवण्याकरताच वापरले जाते. जगातल्या प्रत्येक देशात हे होत आहे. एक सत्य आहे की, विज्ञानामध्ये नवीन संशोधन करणं ही गोष्ट हौशी कलावंताची राहिलेली नाही. तेथे

प्रचंड गुंतवणूकीची गरज असते. आणि अशी प्रचंड गुंतवणूक कुठल्याही देशात फक्त संरक्षण खातेच करू शकते. म्हणून कुठलंही ओरिजिनल संशोधन झालं की हे संशोधन आणि तंत्र ताबडतोब डिफेन्सच्या तिजोऱ्यात जमा होते. नशिब एवढेच की ह्या तिजोऱ्याना उघडण्याच्या क्लृप्त्या उद्योगपतींना प्राप्य असतात."

जिमी काही क्षण थांबला, ती संधी साधून राकेशने दीर्घ श्वास घेऊन आणखी ऐकण्याची तयारी केली. जिमीने केवळ गेअर बदलला, आणि त्याची वाक्-कार पुढे धावत निघाली, "आता बघ, होलोग्राफी म्हणजे मयाची मायावी विश्व. सुंदर विश्व तयार करण्याची शक्तीच उपलब्ध झालीय माणसाला. आता तू म्हणशील की सुंदर असले तरी अखेर मायावीच ना? सत्यम् बरोबर असुंदरमच येणार असेल तर त्यापेक्षा असत्यम् बरोबर येणाऱ्या सुंदरमचा अनुभव घेण्यात गैर काय? सौंदर्याचा आनंद देणारं मायावी विश्व काय वाईट?" खुर्चीवर बैठक मारल्याबरोबर त्यानं जणू आपल्या संभाषणात अर्ध्या तासाचा खंड आलाच नव्हता, अशा प्रकारे सुरुवात केली होती "आता बघ होलोग्राफीचं तंत्र वापरून एक नवीन अफलातून कलाक्षेत्र विकसित होऊ शकतंय. होईलही म्हणा. सुंदर स्त्रिया, सुंदर वास्तू, सुंदर निसर्गदृश्य, सुंदर जीवंत विश्व आपल्या नजरेसमोर मायारूपात निर्माण करता आलं आणि त्याचा आनंद आपल्याला हवा तेव्हा लुटता आला तर अशी होलोशिल्प

तयार करून माणसाला किती अन्योन्य अनुभव मिळू शकतो. अरे व्हर्च्युअल रिॲलिटीचा उपयोग किती अनंत प्रकारे केला जाऊ शकतो. आपले कलावंत हे करण्याचा सतत प्रयत्न करत आले आहेत, जे जे सुंदर दिसतं, पण ज्याचं अस्तित्व क्षणैक असतं, ते ते शब्दांच्या, रंगांच्या, आकारांच्या माध्यमातून पकडून त्या सौंदर्याचा पुनर्प्रत्यय द्यायची धडपड माणसं मानव जन्माला आला तेव्हापासून करत आहेत की नाही? तीस हजार वर्षांपूर्वीच्या माणसाने गुहांच्या भिंतीवर पळणाऱ्या प्राण्यांच्या गतीला अलौकिक सौंदर्य रेषांमध्ये पकडण्याचा प्रयत्न केला. अर्थात हे समाजशास्त्रज्ञ ते मान्य करत नाहीत, ते म्हणतात, तो त्यांचा धार्मिक विधी होता. कारे बाबांने कलासर्जनाचा आनंद त्यांना नको होता का? पण हे ते नाकारतील, कारण मग त्यावेळचे आमचे पुर्वज मागासलेले होते, आणि आधुनिक काळातील आम्ही सुधारलेलो आहोत असं कसं म्हणता येईल ह्यांना? अरे, प्राण्यांबद्दल हे असंच म्हणणार. प्राणी इन्स्टींक्टने निर्मिती करतात. अरे सुंदर घरटी निर्माण करणारे पक्षी हे म्हणे इन्स्टीक्टने करतात. आणि कुरूप कॉंक्रीटची धूडं उभारणारे तुम्ही सौंदर्यासाठी करता सर्व.

तुला सांगतो राकेश, होलाग्राफीच्या तंत्राने प्रत्येक क्षण प्रतिमेच्या रुपात पकडता येईल आणि प्रतिमाही त्रिमितीतील. समज, माझ्या सारख्या वैज्ञानिक कलावंताने तुझ्या चेहऱ्यावरील

हा विस्मय, तुझी एकाग्रता, तुझं हे बोलकं शरीर ह्याची होलोग्राफीक इमेज तयार केली, आणि प्रोजेक्ट केली, तर जगात कुठेही आणि केव्हाही ही इमेज प्रॉजेक्ट करून बघणाऱ्याला त्या इमेजच्या चोहोबाजूंनं फिरून तुला निरखता येईल. अर्थात ह्या प्रतिमेला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तर, मय राक्षसाने तयार केलेल्या राजप्रासादामध्ये दार समजून भिंतीवर जाऊन आदळलेल्या दुर्योधनासारखी परिस्थिती व्हायची. '

राकेश मनातून खुपच आनंदी झाला होता, त्याला जी माहिती पाहिजे होती, ती आता त्याला मिळत होती. ती रस्त्याच्या कडेला असलेली प्रतिमा अशीच मायावी असणार. पण त्याला माहिती पाहिजे होती, आपले दोन्ही हात जिमीच्या तोंडापुढे जोरजोरात हलवून, त्याच्या मुखातून निघणारा प्रवाह खंडीत करण्याची इच्छा धरून राकेशने प्रश्न विचारला, ‘‘ह्या तंत्राचा उपयोग करू शकेल असे भारतात कुणी आहेत का? ह्या तंत्राचा वापर करण्यात माणूस कितपत यशस्वी झाला आहे?'

जिमी बोलता बोलता गप्प झाला, स्वत:च्याच विचारात काही क्षण गप राहिला, मग म्हणाला, ‘‘पण आज शास्त्रज्ञांना कलावंत नाही बनायचंय, त्यांना सैनिक व्हायचंय, त्यांना शत्रूचा विनाश करायचाय. आपली लढाऊ अस्त्रे, अशी अस्त्रे बनवणारे कारखाने,

प्रचंड विनाशक शक्ती असलेली अणुशस्त्रे लपवण्याचं केमोफ्लॅग करण्याचं नवं तंत्र होलोग्राफीतून विकसित होतंय. आकाशातून ही अण्वस्त्र म्हणजे सुंदर वनश्रीनं वेढलेली तळीच भासतील शत्रुला. लढाऊ विमानं शत्रुच्या भूभागावर जातील, पण ती असतील, पर्जन्य घेऊन येणाऱ्या काळया सावळया ढगाच्या पोटात लपलेली. आज शास्त्रज्ञ प्रत्येक नवीन तंत्राचा उपयोग विनाशाकरता कसा वापरता येईल ह्याचाच विचार करत आहेत, त्यासाठीच संशोधन होत आहे, त्यासाठी पैसे पुरवले जात आहेत. मानव स्वतःच्याच नाही राकेश, सर्व सजीवांच्या अस्तित्वाला नष्ट करण्याकरता धडपडत आहे.''

राकेश अस्वस्थ झाला होता, जिमी परत एक्साईट झाला होता. मानव आपली कबर खोदत आहे, हे पुर्ण सत्य आहे. पण ह्या माणसानं आपला हा सात्विक संताप आवरला नाही तर हा सात्विक संताप त्याचाच बळी घेईल. त्याला कसं थांबवावं ह्याचा राकेश विचारच करत होता. पण राकेशचं नशीब आज चांगलं असावं, कारण त्याचवेळी जिमीच्या कार्यालयातील बरेच सहकारी लंचला तेथे घुसले. आणि जिमीला पुढे काही बोलणं शक्यच झालं नव्हतं.

राकेशने आपल्या पुढ्यात पाहिलं. त्याच्या लक्षात आलं, त्यानं कॉफीचा कप केव्हांच संपवला होता, आणि रिकामा कप वेटर घेऊनही गेला होता. त्यानं घड्याळाकडे पाहिलं. घड्याळात पाहिलं, क्षमा उशिरात उशिरा किती वाजता येईल ह्याबद्दल बांधलेला त्याचा अंदाज ढासळला होता. त्याच्याभोवती आता गर्दी वाढली होती, वाढत होती. वेटरने तीन चार वेळा त्याच्यासमोरील साफच असलेलं टेबल परत परत साफ केलं होतं. मग राकेशने त्याला परत एकदा कॉफी आणायला सांगितली आणि आपल्या बॅगेतून जिमीनं होलोग्राफीचं तंत्र विषद करणारं, विशेषत: त्यात नवीन संशोधन काय होतंय हे सांगणारं झेरॉक्स केलेले लेख, आणि मासिकं बॅगेतून काढून समोर टेबलावर पसरली आणि तातडीने काय वाचायला पाहिजे ह्याचा शोध घ्यायला त्यानं सुरुवात केली.

क्षमा रेस्तॉरॉमध्ये शिरली तेव्हा राकेशलाच नव्हे तर तेथील सर्वांनाच ते जाणवले. ती धावतच आत घुसली, आजुबाजूच्या आश्चर्यचकीत झालेल्या नजरांची तमा न करता ती त्याच गतीनं राकेशच्या टेबलाकडे आली. तिचा चेहरा, आणि धपापणारी छाती सांगत होती, ती उत्तेजित झाली आहे आणि बरंच अंतर थावत आली आहे.

राकेशने उठून तिला प्रथम खुर्चीवर बसवलं, पाण्याचा ग्लास तिच्यापुढे केला. काही न बोलता त्यानं तिचा डावा हात आपल्या दोन्ही पंजांमध्ये घेऊन, तिला शांत होण्याचा संकेत दिला. पाण्याचे दोन घोट पिऊन तिनंही भोवती नजर टाकली आणि प्रयत्नपूर्वक तिनं स्वत:ला रिलॅक्स केलं. बऱ्याच लोकांच्या नजरा त्यांच्या टेबलाकडे लागल्या होत्या. काही नजरांत कुतूहल होतं, तर काही नजरात असूयाही. राकेश पुढे झुकला आणि हलक्या आवाजात म्हणाला, “भोवतालचे अनेक पुरुषांना माझा हेवा वाटतोय बघ. कारण काहीही असो, पण त्यांना भेटायला आलेली कुठलीही स्त्री अशी धावत आलेली त्यांनी पाहिलंही नसेल कधी. थॅंक्यू क्षमा. ’

काही क्षण ती त्याच्याकडे केवळ पाहात राहिली, तो काय म्हणतोय ते बहुधा तिला समजलंच नव्हतं. मग मात्र ती हसली, हसली आणि तिचं शरीर रिलॅक्स झालं. तिनं आणखी एक दोन घोट पाणी घशात ढकललं. मग म्हणाली, “अर्धा तासापुर्वी रमेश दिघ्यांचा फोन आला, मोबाईलवर. त्या आपल्या मैत्रिणीनं आपली नेहमीची जागा सोडलीय आणि नेहमीच्या जागेपासून ती दोनशे चाळीस फूट मुंबईकडे सरकलीय, शिवाय बारा वाजेपर्यंतं थांबण्याचा धीरही नव्हता तिला. ’

राकेशने घड्याळाकडे नजर टाकली परत. रमेश दिघ्यांचं म्हणणं खरं होतं. आता साडेअकरा वाजत होते. म्हणजे तिनं हजेरी लावून निदान पाऊण तास तरी झाला असणार.

“आणखी काय म्हणाले इन्स्पेक्टर दिघे?” त्यानं तिला विचारलं.

ती मोकळेपणी हसली, आणि म्हणाली, “दिघे चांगलेच वैतागलेले वाटत होते. आता त्यांची गार्डन करण्याची आयडीया त्यांना सोडून द्यावी लागेल म्हणून असेल कदाचित. ’

मग काहीवेळ थांबून ती म्हणाली, “आणि आपल्यावर जरा संतापलेलेही वाटत होतं. म्हणाले, तुम्ही लोकांनी गाडी परत रिव्हर्समध्ये घेऊन त्या बाईला आपली जागा बदलणं भाग पाडलं, हे काही चांगलं केलं नाही. तरी मला वाटतं, त्यांच्याकडून बाहेर पडल्यावर आपण परत बाईची भेट घ्यायला गेलो होतो, आणि त्या म्हातारीच्या गालावर ओघळणारा रक्ताचा ओघळ पुसायचा तू प्रयत्न केलास हे त्यांना माहीत नाहीये.”

“ठीक आहे. त्यांचा अंदाज खोटा ठरतोय आणि माझा अंदाज खरा ठरतोय असं दिसतंय. मी आज जिमी डिसोझांना भेटलो होतो, आता ती होलोग्राफीकच प्रतिमा असावी अशी माझी खात्री झालीय. पण क्षमा, मला वाटतं, आता आपल्याला इतर सर्व कामं

बाजूला टाकून ह्या प्रकरणामागे लागलं पाहिजे. त्या परिसरात कुणी फिरकू नये असं कुणालातरी सिरियसली वाटतंय हे निश्चित आहे.'' त्यानं मनगटावरील घड्याळाकडे नजर टाकली, भोवतालीही एक धावता नजरेचा फटकारा मारला, मग खुर्चीवर मागे रेलत म्हणाला,''बरं, आतापर्यंत मी कॉफी पिऊन वेळ काढला आहे. वाट पाहाणं किती थकवा आणू शकतं हे कळलंय मला. आता मी जरा उत्तेजक पेय घेणार आहे. मला वाटतं तुझीही काही हरकत नसावी.''

''बियर घ्यायला'' क्षमानं तातडीनं उत्तर दिलं. ''पण आता केवळ एक बातमी सांगते, आणि मग हा विषय इथंच थांबवूया, बाकी सगळं उद्या सकाळी बोलायचं. सर्व दिवसभर पापण्यांवर झोपेचं ओझं घेऊन हिंडतेय.''

''पापण्यांवर झोपेचं ओझं! व्वा, व्वा. क्या बात है.'' राकेश तिच्या चेहऱ्याकडे पाहात म्हणाला.

''मी पनवेलच्या एका इस्टेट एजंटशी बोलले दुपारी. त्या खाणीचं क्षेत्र विकण्याकरता मालकानं त्याच्याकडे सोपवलं होतं, पण काही काळानंतर त्यानं त्याची सर्व फी देऊ केली आणि आपल्याला ती जमीन विकायची नसल्याचं सांगितलं. पण ह्याबद्दल त्याला आणखीही काही माहिती द्यायची आहे असं वाटतं मला. त्याला प्रत्यक्ष भेटलं तर निश्चितच काही विशेष कळेल.''

ती काही क्षण थांबली, मग म्हणाली, "आणि आता बियर, बरोबर मस्तपैकी फ्राय मच्छी. ऑर्डर तू द्यायचीस. पैसे मी द्यायचे. माझ्या क्लायंटने मला मोठ्या रकमेचा चेक दिलाय अडव्हान्स म्हणून. चलो, आगे बढो."

आपण जरा उच्च आवाजातच बोलत आहोत, आणि पलिकडील टेबलावरील सज्जन माणूस भुंवया उंचावून आपल्या-कडे बघत आहे हे तिच्या लक्षात आलं. मग आवाजाची पट्टी एकदम खाली आणत ती म्हणाली, "ग्रामीण भागात राह्यला गेलं की आपोआपच मोठ्यांनं बोलायची सवंय लागते की कुणास ठाऊक?"

"चूक. उलट मुंबईसारख्या शहरात, ट्रेनमध्ये, बसमध्ये, बारमध्ये, चौपाटीवर आपल्या मिठीतल्या माणसाशीही बोलायचं तर ओरडून बोलावं लागतं. आक्युपेशनल हॅझार्ड्स्" राकेश चेहरा गंभीर ठेवत म्हणाला.

ह्यावर क्षमा बऱ्याचशा उच्च स्वरात हसत सुटली. पण ह्यावेळी पलिकडच्या टेबलावरील गृहस्थाने भुंवया उंचावण्याऐवजी ओठांवर स्मित झळकू दिले. बहुधा राकेशचे वक्तव्य त्याच्या कानापर्यंत पोचले असावे.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठण्याची पाळी क्षमाची होती. बेडवर आडवं झाल्याबरोबर तिला गाढ झोप लागली होती. पण तिला आठवत होतं, राकेश बराच वेळ वाचत बसला होता. दोन तीन वेळा तिला जाग आली होती, एकदा तर तिनं त्याला आता झोप अशी सूचनाही केली होती. सकाळी जाग आल्यावर तिनं त्याला जागं करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तो उठत नाही असं पाहून तिनं आपली आवराआवर करायला सुरुवात केली होती. आईला फोन करून तिने आपण एक, दोन दिवस उशिरा येत असल्याचं कळवलं होतं, आणि आपण अजून मुंबईतच असल्याचंही कळवलं. आईनं तिला निघाल्यावर फोन करायला न विसरण्याची तंबी दिली. कॉफीचा ग्लास आणि बरोबर इराण्याकडून आणलेले काही केकस् सोबत घेऊन ती राकेशच्या बेडकडे आली, राकेश उठून खिडकीशी उभा राहून बाहेर बघत होता. तिची चाहूल लागताच तिच्याकडे वळत म्हणाला, “गुड मॉर्निंग मॅडम. आहा... केकस् ! व्हेरी गुड मॉर्निंग डियर मॅडम. “

“वा, कॉफीबरोबर केक आला म्हणून गुड मॉर्निंग बरोबर व्हेरी आला आणि मॅडमला डियर येऊन चिकटलं. “ती रोषयुक्त स्वरात म्हणाली.

“नाही गं बाई. तशीही तु डियर मॅडम आहेसच. विशेषत: सकाळी बाथ घेऊन फ्रेश दिसत असताना तरी. ’ तो मिस्किल हसत म्हणाला.

“ राकेश, मला खरोखरच तुझा कधीकधी भयंकर राग येतो. कधी कुठलं निर्भेळ विधान करतोस का तू? तशीही तू डियर मॅडम आहेसच हे ऐकून मी किती उल्हसित झाले होते, तर ताबडतोब तुझा हिसका दिलासच.” क्षमा जवळची खुर्ची कॉटजवळ खेचून त्यावर बसत म्हणाली.

“काय आहे क्षमा. ही वाईट सवंय वाईट आहे हे मान्य. माझा बाप डाव्या चळवळीतील, त्यामुळे सरळ, स्पष्ट अर्थ निघेल असं विधान करायचं नाही ही बाळगुटीच मिळालीय मला. पण ते सोड, आपल्याला काय काय करायचं आहे ह्याची जंत्री करूया, म्हणजे मुंबईतील कामं आटोपून लवकरात लवकर कधी निघता येईल ते ठरवता येईल.”

“केव्हा हा प्रश्न आहे, डीयर राकेश. कधी हा प्रश्न नाही. म्हणजे आजच आपण निघणार आहोत. एक अडचण आहे, आपण दुपारी निघून लोणावळयाच्या इस्टेट एजंटला वेळेवर गाठू शकू वा नाही? “

“बरोबर आहे, कारण मला रात्री आठवलं, त्या स्पॉटच्या जवळच्याच खेड्यात माझा एक मित्र आहे, त्याला भेटावं म्हणतो.”

“हा मित्र कुठून काढलास आणखीन? आपल्याला संध्याकाळपर्यंत संजीवकडे पोचायला हवं हे लक्षात घे. एक तर ही जाखिण आणि चेटकी मध्येच कडमडले आहेत आधीच. आणि त्यात हा मित्र?”ती तक्रारीच्या सूरात म्हणाली.

“तू ऐकून तर घे गं बाई. हा माझा मित्र एक्स्प्रेसवेमुळे जे आदिवासी, ग्रामीण विस्थापित झाले आहेत, ज्या गावांना ह्या एक्स्प्रेसवेचा त्रास सहन करावा लागला आहे, त्यांच्यात संघटना बांधून त्यांना न्याय देण्याचं काम करत होता. माझ्या माहितीप्रमाणे तो अजून त्याच भागात आहे. त्याच्याकडून आपल्याला अशी पुष्कळ माहिती मिळू शकेल जी दिघ्यांनादेखील माहीत नसेल.” तो म्हणाला.

“ ठिकाय, ठिकाय. पण तरीही आपण तीनच्या आत येथून निघू शकू असं वाटत नाही मला.” काही क्षण कपाळावर आठ्या पाडून ती त्याला निरखित राहिली. मग त्या आठ्या पुसल्या गेल्या आणि तिच्या ओठावर स्मित उमटले “आपण असं करूया राकेश. आपण त्या एजंटला भेटूया लोणावळयाला आणि मग सरळ जाऊया देहूला संजीवकडे. दुसऱ्या दिवशी तुझ्या मित्राला भेटायला

निघूया सकाळी. ओके? म्हणजे मग त्या एजंटने काही स्पॉट सांगितले तर तेही नजरेखालून घालता येतील.”

“अरेच्या, म्हणजे तू खरंच कोणी कस्टमर बघितलायसं की काय? क्षमा, तू पक्की बिझीनेसवुमन बनत चालली आहेस हं?”

“एनी ऑब्जेक्शन? डीयर राकेश.” तिने विचारलं.

“नो.. नो. नॉट ऍट ऑल. पण दुपारी तू येथे केव्हा परतशील? मी म्हणतोय, की दुपारी एक वाजता येऊन एक दीड तास निवांत झोप घ्यायची इथं. “

“व्वा, गूड आयडीया. मी तीनच्या सुमारास येथे येईन, तू इथं असशील तर त्या सरदारजीकरता आणलेले प्लॅन्टस कारमध्ये लोड करता येतील. तुझ्या लक्षात आलं नसेल राकेश, पण मी कालचं दुपारी काही प्लॅन्टस आणून ठेवलेत खाली, जिन्यापाशी. “

“य.. श.. स्वी.... बि.. झी.. ने.. स.. वु.. म.. न. “ राकेश म्हणाला. त्याच्या उच्चारावर काहीतरी जहाल टिप्पणी करायचा क्षमा विचार करत होती, तोच तिच्या मोबाईलचं संगीत बाहेरच्या खोलीतून ऐकू आलं.

ती घाईघाईत उठून बाहेर गेली आणि राकेशही कॉफीचा रिकामा कप व ट्रे उचलून बाहेर गेला. ग्लास विसळून, ट्रे जागेवर ठेवून तो बाहेर आला, तर ती स्वयंपाकघरातच येत होती.

“राकेश, इन्स्पेक्टर दिघ्यांचा फोन होता. त्यांनी विनंती केलीय की साहेबांनी परतताना त्यांना भेटावं. रात्रीतून आणखी दोन जणांना आपली मैत्रिण भेटली होती आणि तीही वेगवेगळ्या ठिकाणी. म्हणजे त्याच परिसरात पण जागा मात्र जरा बदललेली. म्हणत होते, साहेब, ते प्रतिमेबद्दल काय म्हणत होते त्याबद्दल बोलायचं आहे.”

“हां, एकूण अगदीच यडझवा नाही तर हा दिघे. पण तू त्याला आपण आज निघणार आहोत हे सांगितलं नाहीस ना?”

“अरे नाही रे बाबा. तू काय मला एवढी यडझवी समजतोस की काय?”

“ए.. क्षमा. कृपा करून अशी भाषा नकोस वापरू गं. म्हणजे आम्ही पुरुष एक अशा लैंगिक शिव्या देतो म्हणून तुम्ही स्त्रियानी द्यायलाच पाहिजेत असं आहे का?”

त्याच्या चेहऱ्यावरील भाव बघून ती हंसू लागली, आणि तोही त्या हसण्यात सामील झाला.

लोणावळ्याला दुसऱ्या दिवशी जायचं ठरवून त्यांनी राकेशच्या मित्राला राजूला भेटून मग संजीवकडे जायचं ठरवलं होतं. संजीवला हे कळवायला हवं म्हणून राजू आणि राकेश ह्यांच्या

जुन्या आठवणी आणि कॉमन मित्रांच्या चौकशा सुरू झाल्यावर क्षमा राजूच्या खोलीबाहेर आली होती आणि तिथून तिने संजीवला फोन करण्याचा प्रयत्न केला.

संजीवला घरच्या फोनवर गाठणं कठीणचं. ड्यूटीवरही बराच काळ तो टेस्टींग ग्राऊंडवर किंवा लॅबोरेटरीमध्ये असल्यामुळे फोनच्या जवळपास गाठणंही कठीणच. त्यामुळे एक तर सकाळी लवकर आणि संध्याकाळी उशिरा प्रयत्न करणं हाच एकमेव पर्याय होता. पण ह्यावेळी त्यानं ताबडतोब उत्तर दिल्यामुळे ती चकितच झाली. खुष होऊन तिने जरा थट्टेच्या सुरात विचारलं, “कारे, मी फोन करणार आहे हे कसं समजलं तुला?”

“नही भाई, मला कसं समजणार तुझा फोन येणार आहे आता म्हणून.” जरा गोंधळलेल्या आवाजात तो म्हणाला, पण मग स्वत:ला सावरत म्हणाला, “नाही म्हणजे तसं म्हटलं तर तुम्ही दोघं दोन दिवसांपासून ड्यू आहातच ना? शिवाय काल रात्री तुझ्या मम्मीचा फोन आला होता, पोचलीस का विचारायला. आणि आज तसा मी लवकरच आलो कदाचित तुम्ही याल म्हणून, आणि मुख्य म्हणजे आमचा कमांडर मिटींगला गेलाय एच. क्यू. ला. त्यामुळे दुपारचा सेशन बंक केलं.”

“हे बघ, आम्ही अगदी जवळ आहोत. पाथरीला राकेशच्या एका दोस्ताकडे आहोत, निघूच अर्धा-पाऊण तासात आम्ही. उद्याच्या दिवस आम्ही राहाणार आहोत तुझ्याकडे”

उद्याच्या दिवस? पण क्षमा, मला उद्या कामावर जावेच लागेल हं. आधीच सांगतो, नाहीतर तू चिल्लाएगी” संजीव म्हणाला.

“नाही रे बाबा. आम्ही राहाणार आहोत म्हणजे सर्व दिवस काही तुझ्या घरीच नाही राहाणार. सकाळी आम्हाला चांगला नास्ता खायला घाल, तू कामाला जा, आम्हालाही लोणावळ्याला एकाला भेटायचंय, जरा भोवती भटकायचंय. संध्याकाळी तू कामावरून परतलास, की आम्ही येऊ.”

“अरे पण, तुम्ही ह्या भागात करताय तरी काय? मला सांग तरी काही. आज सर्व दिवस भटकतच आहात, परत उद्याही जाणार म्हणताहात?”

“जरा लंबी कहानी है”

“कहानी?”

त्याचा विचारण्याचा रोख ऐकून ती घाईघाईने म्हणाली, “कहानी म्हणजे तसं काही नाही रे बाबा. पण आमची ॲडव्हेचर कहाणी ऐकायला निश्चितच मजा येईल तुला. एनी वे, आता तू काय करतोयस?”

“अगं दुपारचा सेशन बंक केला तरी आताच परत येतोय क्वार्टरला. जरा प्रवेश होतो, तोपर्यंत तुम्ही यालच ना? मग फाट्यावर जाऊन सरदारजीकडे खाना घेऊया. काय?”

“तेच सांगण्यासाठी फोन केला. आज तुझ्या घरीच जेवूया आपण. आम्हाला जरा उशीर होईल, मग कुठे जाण्यापेक्षा तुझ्या व्हरांड्यातच बसू गप्पा मारीत. तुझी इच्छा असेल तर पिठलं भात करून घालते तुला.”

“सच कह रही हो? बहोत खुब. बाबर्जीका और होटलका खाना खाकर तंग आ जाता हूं. शिवाय सरदारजीकडे जायचं तर आधी ऑर्डर देऊन ठेवायची अशी पद्धत आहे माझी. “

“हो माहीत आहे मला ते. पाइंजीनी सांगितलं मला. पण जरा उशीर होईल हं. अरे हा राजू फार इंटरेस्टींग माणूस आहे. टाटा इन्स्टीट्यूटचा पोरगा पण गेले आठ महिने एक्स्प्रेस हायवे मध्ये ज्यांची शेती गेली, घरं गेली, त्यांचं पुनर्वसन करण्यासाठी येथे येऊन राह्यलाय. राकेशची आणि त्याची जुनी दोस्ती आहे, त्यामुळे गप्पा किती वेळ चालतील, सांगता येत नाही. पण डोन्ट वरी. शक्यतोवर लवकर येतो आम्ही. भेटूया. नाहीतर असं करूया का? उद्या सकाळचा नास्ता मी करते. आज तुझ्या बाबर्जीलाच सांग. बाय.”

मोबाईल पर्समध्ये टाकून ती आत आली, तेव्हा राजूच्या आदिवासी सहकाऱ्याने केलेल्या डिकॉक्शन चहाचे लाल पाण्याने शिगोशिग भरलेले दोन ग्लासेस राजू आणि राकेशच्या हातात होते आणि एक ग्लास तिची प्रतिक्षा करत होता.

"काय सांगितलंस ना संजीवला? आम्ही मधल्या काळातील इन्फार्मेशन आदानप्रदानाचा बॅक लॉग भरून काढलाय. आता आपल्या विषयाकडेच वळता येईल."

राजूची ती खोली म्हणजे कुडाच्या भिंती असलेली झोपडीच होती, परंतु चांगली लांबरूंद होती. छान सारवलेली जमीन, सारवलेल्या भिंती. भिंतीवर पांढऱ्या रंगाने काढलेली वारली चित्रे. ते दोघं बसले होते त्यांच्याजवळच असलेल्या मजबूत खांबाला टेकून ती खाली जमिनीवर विसावली, आणि आरामात तिने पाय पसरले समोर. नाही म्हटलं तरी बऱ्यापैकी चालणं झालं होतं. चहाचा पहिला घोट घेतानाच तिच्या लक्षात आलं, चहाला एक वेगळाच स्वाद येत होता, बहुधा लिंबांच्या पानांचा वास होता तो.

जवळच घोटाळत असलेल्या लहानखुऱ्या चणीच्या, हनुवटीवर तुरळक केस असलेल्या, आणि चेहऱ्यावर एक आकर्षक सहज हास्य असलेल्या माणसाकडे इशारा करत राजू म्हणाला, "क्षमाबाई, हा माझा इथला सहकारी तुंग्या. पण खरं

सांगायचं तर तो माझा सहकारी नाही, मीच त्याचा सहकारी आहे. हा खरा भूमीपुत्र. पलिकडे ती टेकडी आहे ना, हायवेच्या अलीकडे? तिथेच शेत होतं ह्याचं, घरही तेथेच होतं. ह्याची जमीन रस्त्याखाली नाही गेली, पण टेकडीवरील ह्याच्या घरावर काम सुरू झालं आणि दगडं येऊन पडायला लागली. किती तक्रारी केल्या कुणी दाद देईना, जीवाच्या भीतीने घर सोडून शेवटी गावात येऊन राहिला. मुंबई काही किलोमिटर्सनी जवळ पडावी म्हणून एक्स्प्रेसवे तयार झाला येथे. पण त्यासाठी किती जणांच्या पिढ्यानपिढ्या कसत असलेल्या जमिनी शासनाने हिसकावून घेतल्या चांगलं पुनर्वसन करू असं आश्वासन देऊन. आदिवासींची वस्तीस्थाने असतात बहुधा त्यांच्या शेताच्या आसपास. गावं म्हणजे दहा वीस झोपड्यांचा पाडा. अशा पाड्यांना हलवणं सरकारच्या दृष्टीने मामुली बाब होती. आणि पाच पन्नास आदिवासींची बाजू घेऊन लढायला कुठला पक्ष वा संघटना तयार असणार? बरं ही मंडळी कामासाठी भटकणारी. म्हणजे मतदार म्हणूनही काही भरवशांचे नाहीत. मग कोण ह्यांच्याकडे लक्ष देणार? अनेक प्रकारचे त्रास हे लोक सहन करत आहेत, प्रथमपासून आत्तापर्यंत. जमीनी तर गेल्याच. पण काम सुरु झाल्यावर पाड्यातील झोपड्यांवर सुरूंगाने आकाशात भिरकावलेले दगड येऊन पडायचे. ही माणसं मजूरीला, आणि इकडे झोपड्यांवर दगडांचा पाऊस पडायचा. भांडीकुंडी,

संसार, सर्वनाश. गावातील निम्म्यापेक्षा जास्त लोकांची शेती रोडच्या पलिकडे. ह्या किनाऱ्यावरून दिसणाऱ्या शेतात पोचण्यासाठी तीन चार मैलांचा वळसा. बहुसंख्य कातकरी म्हणजे आदिवासीतील अल्पसंख्य. मग कायदेशीर लढाया करूनच सुरक्षा मिळवण्याचा प्रयत्न केला, जीवन अगदीच देशोधडीला लागलं नाही. निदान काही जणांचं तरी.''

''पण राजूभय्या, तुम्ही इथे कसे पोचलात?''

''व्हाया टी. आय. एस. एस. चेंबुर. पण तो एक अपघातच. नाहीतर तेथील हुशार तरुणांचा रस्ता सरळ पोचतो मोठाल्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या वातानुकूलीत केबीन्समध्ये. पण माझ्या बाबतीत झालेला हा अपघात भाग्यानेच झाला म्हणायचा. अर्थात असे अपघात होतच नाहीत असं नाही. पण ते जाऊ द्या क्षमाबाई आता. राकेशला सर्व लढा माहीत आहे. वेळोवेळी येऊन साह्यही दिलंय त्यानं. किंवा मी गरज पडेल तेव्हा येऊन हक्काने मदत मागितलीय. मुंबईतील सोशल कमिटमेंट असलेल्या एका लॉयरला मदत करण्यासाठी व्हालींटियर म्हणून मुंइथे पोचलो. पण खरं सांगतो, पूर्वीचं मला माहीत नाही, पण आता न्याय्य हक्कांसाठी रडणाऱ्यांचा, लढणाऱ्यांचा, चळवळींचा बंदोबस्त कसा करायचा हे तंत्र शासनाला चांगलेच माहीत झाले आहे. आता तर काय

जनहीताची जबाबदारीच शासनसत्ता अंगावरून झटकून टाकत आहे. आश्वासनांच्या भुलभुलैय्यात लोकांना कसं फिरवायचं हे तंत्र वापरण्यात नोकरशाही निपुण आहे. पण मला वाटतं, क्षमाबाई. तो विषय आपण सोडूया, जे काय करता येण्यासारखं होतं आमच्या तोकड्या हातांनी केलं, आता परत विदर्भात आमच्या गावांकडे जायचं म्हणतोय. पण एक सांगतो तुम्हाला क्षमाबाई. ह्या अशा स्कीममध्ये गरीब मजूरांबरोबर मध्यमवर्गीयांवर, सामान्य नागरीकांवरही अन्याय होत असतो, पण तो त्यांच्या लक्षात येत नाही, किंवा आला तरी त्याविरूद्ध लढण्याची इच्छाच त्यांना नसते. आता पहाना, शासनाला टॅक्स भरणारे टू व्हीलरवाले, थ्री व्हिलरवाले लाखोनी आहेत, पण एक्स्प्रेस वे केवळ अल्पसंख्याक कारधारकांसाठी. पण टू व्हिलरवाले भूमीपुत्रांची बाजू घेणार नाही. कारण त्याचं स्वप्नं असतं, फोर व्हिलर घेण्याचं.”

एकाएकी आवाज थांबला, शब्दांच्या प्रवाहात आणि दुबळेपणाच्या जाणीवेत गुदमरू लागलेल्या क्षमाने चमकून वर पाहिले, राजूचा चेहरा विस्कटला होता, गच्च भरलेल्या डोळ्यातून अखेर अश्रू गालावर ओघळलेच होते, गळा दाटून आला होता. क्षमा काही क्षण बावरून गेली, ह्या रफटफ जीवन जगणाऱ्या, आपल्या मर्जीप्रमाणे जीवन जगण्यासाठी वाटेल ती किंमत देत असलेल्या तरुणाचं मन इतकं मृदू असेल असं तिला किंचिंतही

वाटत नव्हतं. त्याच्या गालावरील अश्रू पाहून तिच्या मनात नकळत विचार आला, पुरुषांसारखा पुरुष आणि रडतोय.. आपल्या मनातील ह्या विचारांने, शरमेने आपला चेहरा लाल होतोय, असं वाटलं तिला. बाहेर उठून जावं काही वेळ असा विचार ती करतच होती, तर राजूच उठून बाहेर निघून गेला. तिची नजर राकेशकडे गेली, आणि राकेशच्या चेहऱ्यावर तिला तीव्र भावना दिसली. ही भावना कशाची? दु:खाची सहवेदना की असहाय्यतेची वेदना? तिनं राजूच्या सहकाऱ्याकडे पाहिलं, त्याचा चेहरा मात्र निर्लेप होता, शांत. स्थितप्रज्ञ.

काहीवेळानं राकेश आणि क्षमा उठून बाहेर आले तेव्हा राजू एका वयस्क माणसाशी बोलत उभा होता. त्या दोघांना पाहिल्याबरोबर म्हणाला, "क्षमाबाई, तुम्हाला त्या दगडाच्या खाणीची माहिती हवी होती ना? हे वनाभाऊ. त्या टेकडीच्या उतारावरच ह्याचं शेत होतं. वनखात्याच्या जमीनीवरील अतिक्रमणाची जमीन. खडी पुरवण्याचं कॉन्ट्रक्ट घेतलेल्या कंपनीने सरळ एके दिवशी ह्याच्या शेतात डोझर घातला, कॉक्ट्रक्टरला संरक्षण द्यायला पोलीस आणि वनखात्याचे कर्मचारी होतेच. गेल्या पंचवीस वर्षांपासून हा वनखात्याची जमीन खेडतोय, दर साल गार्डाला पैसे देऊन. पण रेकॉर्डवर काही नाही. हट्टाने झोपडी सोडली नाही ह्यानं. पण खाणीतील सुरूंगाचा दगड ह्याच्या

बायकोच्या जबड्यावर आणि मानेवर येऊन आदळला. तेथेच मेली ती.”

तो बराच वेळ गप्प राहिला. तो म्हाताराही शांत नजरेने हायवेच्या दिशेनं पाहात राहिला.

“मग काय झालं?” क्षमाने हळूच प्रश्न विचारला, पण हा प्रश्न निरर्थक आहे असं वाटलं तिला विचारल्यावर.

“आमच्या खटपटीमुळे अपघाताचा पंचनामा झाला. अर्थसाह्य मिळालं शासनाकडून. आता कॉन्ट्रॅक्टरकडून नुकसान भरपाई मिळावी म्हणून खटपट चालू आहे. पण अपघाताचा पंचनामा करतानाच पोलीसांनी कॉन्ट्रक्टरला पकडता येणार नाही अशी सोय करून ठेवलीय.”राजू म्हणाला.

“म्हातारी तर गेली. आता पैसे घेऊन काय करणार? गुराखी पोरं सांगतात, म्हातारीचं भूत तिथे दिसतं म्हणे संध्याकाळला.” म्हाताऱ्याने भावनाहीन रूक्ष आवाजात माहिती दिली.

“सर्व गावातील लोकांनी एक सामुदायिक सत्याग्रह केला होता, रोडचं काम चालू नये म्हणून. पण परिणाम एवढाच झाला की गावातील सर्व प्रौढ पुरुषांना पोलीसांनी दहा दिवस तुरुंगात डांबून ठेवलं, आणि कॉन्ट्रक्टरने सर्व तरुण पोरांपोरीना रोडवर

कामावर लावलं मजूरीनं. पुढे ह्या गावच्या लोकांनी त्या शिवारात जाण्याचंच सोडून दिलं.''

''माणसाचं काय धरता, गावची गाय, बकरीही जात नाही त्या बाजूला''राजूच्या सहकाऱ्यानं माहिती पुरवली होती.

गावाकरता हायवेच्या पलिकडे जाण्याकरता एक खास पूल बांधून तयार झाला होता. पण तो गावापासून बराच दूर होता. आजुबाजूच्या आणखी पाच गावांना त्याचा सामाईक उपयोग झाला पाहिजे असा उद्देश होता.

रस्त्याजवळ आल्यावर राजूचा सहकारी व तो म्हातारा मागे वळले, राजू मात्र त्यांना पोचवायला पुलापर्यंत आला होता. येथे येताना राकेशने मुद्दामूनच गाडी एक्स्प्रेस हायवेंने न घेता खोपोलीकडून जुन्या रस्त्यानं घेतली होती आणि पुलापलीकडे गाडी उभी करून ते चालत खेड्यात आले होते. रस्त्याने चालता चालता राजूने दगडाच्या खाणीबद्दलही माहिती दिली होती. टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या जमीनीचा तुकडा एका पारश्याच्या मालकीचा होता. गावातीलच राघू बुढगा बटाईने कसायचा जमीन. रोडचं काम सुरू झालं तेव्हा पारश्याने डबर, खडी पुरवायचा ठेका घेतला, कुणाच्यातरी भागीमध्ये. मग तोही धंदा बंद

केला, भागीदाराने फसवलं म्हणून. आता पारशाची दोन तीन माणसं असतात तेथे.''राजूने सागितले होतं

राजूने क्षमाच्या व्यवसायाबद्दल माहिती घेतली होती, आणि आपण काही महिन्यातच खानदेशातील आपल्या गावी नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू करणार आहोत, तेथे येऊन तिनं आपल्याला सल्ला द्यावा, मदत करावी अशी विनंती केली होती.

''तू खानदेशात परतल्यावर कळव आम्हाला. आम्ही दोघंही तुझ्या प्रॉजेक्टला भेट देऊ'' क्षमा म्हणाली. पुलापाशी पोचल्यावर राजू परत निघाला तशी ती म्हणाली, ''माझ्या गाडीमध्ये काही चांगल्या जातीची सिताफळांची रोपं आहेत, हवी तर तीन एक रोपं घ्यायला काही हरकत नाही'' ती त्याला म्हणाली.

पण त्यानं तिला नकार देऊन सांगितलं, ''अगोदरच या भागातील माती खडकाळ, मूरमाड. पाऊस भरपूर पडूनही पाणी टिकतं नाही जमीनीत. आणि आता तर ह्या हायवेमुळे आजुबाजूच्या गावांची सर्व ड्रेनेज सिस्टीमच बदलून गेलीय. नदीनाल्यांनी आपलं रुप तर बदललं आहेच, पण भूगर्भातील पाण्याच्या प्रवाहातही बदल झाले आहेत. पिण्याच्या पाण्याचीच कमी आहे, झाडं कशी लावणार?''

त्यांचा निरोप घेऊन राजू मागे वळला तेव्हा भोवती चांगलाच अंधार दाटला होता. कारकडे जाता जाता राकेशने तिला सांगितले, “कामगार क्षेत्र काय आणि शेतमजूर काय? चळवळींची स्थिती एकूण वाईटच आहे. पूर्वी निम्नस्तरातील मध्यमवर्ग काहीसा आदर्शवादी होता, त्याची आर्थिक स्थिती साधारणच असल्याने त्यांची एकूण अन्याय-अत्याचार विरोधी संघर्षांना सहानुभूती होती. पण गेल्या काही वर्षात देश झपाट्याने विकसित झाला आहे, होत आहे. तो निम्नस्तरीय मध्यमवर्ग उच्चवर्गाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आणि मुख्य म्हणजे मध्यमवर्गीय सवंयी, भ्रम, आशा, अपेक्षा आणि स्वप्नं ह्यांनी सर्वच स्तरातील लोकांच्या मानसिकतेवर अतिक्रमण केले आहे. मध्यमवर्गीयांच्या इज्जतीच्या कल्पना, श्रमाला हलकं काम समजण्याचं मुल्य आता खालच्या वर्गापर्यंत पोचलंय. मिडीयाने हे एक महान कार्य केलंय क्षमा, प्रत्यक्षात नाही पण मानसिकतेच्या पातळीवर सर्वांना मिडीयाने एकाच पातळीवर आणलंय. सर्वांना समान स्वप्नं.”

तो छद्मी हसला, आणि गप्प झाला. तिनं त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं, पण अंधारात काही दिसणं शक्यच नव्हतं. तिन्हीसांजेच्या त्या अंधारलेल्या आकाशातून झिरपणाऱ्या प्रकाशात चाचपडत ते दोघं कारकडे चालत राहिले होते. काहीच न बोलता, काहीसे

मरगळलेले, काहीसे थकलेले. पण मुख्यत दिवस व रात्र ह्याच्या सीमारेषेवरील वातावरणाने अंतर्मुख झालेले.

देहूरोडला हायवेवरून डाव्या बाजूला वळून ते संजीवच्या बंगल्याशी पोचले तेव्हा रात्रीचे दहा वाजत आले होते. गाडी थांबल्या थांबल्या संजीव आणि त्याचा सैनिकी वेषातील ऑर्डर्ली आणि दोन माणसं पुढे आली. राकेशचा आणि क्षमाचा एकूण अवतार पाहून संजीव पुढे झाला आणि त्यानं दोघांचा कब्जा घेतला, मागे वळून त्यानं भराभर हुकूम सोडायला सुरूवात केली, “रामसिंग, बाथरूममे जाकर गिझरसे गरम पानी निकालो तीन चार बकेटमे. साबून, टुवाल सब है या नही देखो. भगत, तुम साहब और मॅडमका सामान अंदर ले चलो. और गरमागरम चाय लेकर आवो जल्दी. बादमे किचनमे जाकर कुछ मदत चाहिये तो देखो.”

मग त्यानं पुढे होऊन राकेशच्या हातात हात मिळवून त्याला आपलेपणाने मिठी मारली, क्षमालाही तिच्या खांद्याभोवती एक हात गुंडाळून तिला जवळ घेतल्यासारखं केलं. “क्या हालत बना ली आप लोगोंने. क्या पुरा इलाका छान मारा क्या? अच्छा आप ऐसा किजिये, नहा, धोकर फ्रेश हो जाईये, और फ्रेश होनेके लिये पहिले चाय पिजीये.” मग पाठीमागे वळून जवळच उभ्या असलेल्या एका तरुणाकडे वळत तो म्हणाला, “क्षमा, माझ्या

मित्राची ओळख करून देतो, उपेंद्र शर्मा. और ये है क्षमा, राकेश. और तो सब पहिलेसेही कहा है तुम्हे इन लोगोंके बारेमे.''

''हे बरं हं संजीव. अगोदरच माहिती सांगितली म्हणजे मोकळेपणी बरंवाईट सर्व सांगता येतं. तुम्हाला मराठी समजतं ना?'' क्षमाने उपेंद्रकडे वळत विचारले, ''म्हणजे काय आहे, नसेलच समजत तर आमच्या बंबईया हिंदीत ऐकावं लागेल.''

''आपण फिकर मत किजिये क्षमाजी. आप चाहे जो जबान इस्तेमाल किजीये. वैसे हिंदी फिल्लमवालोंने बंबईय्या हिंदीको युनिव्हर्सलायीझ किया ही है'' मग तो राकेशकडे वळत म्हणाला, ''कहो, राकेशभाई, मुझे पहचाना ना? हम पहिले मिले है. याद है ना?''

''याद कैसे न हो भाई? पिछले वक्त आपपर पायलटकी जिम्मेवारी थी, इसलिये आपने हमे कंपनी नही दी थी सरदारजीके ढाबेपे.'' त्याचा पंजा आपल्या दोन्ही पंजांत पकडून हलवत राकेशने त्याला सलामी दिली.

''अरे भाईसाब, इसलिये तो हम पाइंजीका खाना दिलसे एन्जाॅय कर सके.'' उपेन्द्र म्हणाला. ''वैसे मै तबसे मौका ढुंढ रहा था, आपको शुक्रिया अदा करने लिये. आपनेही हम लोगोंको

पाइंजीसे इंट्रोड्यूस करवाया. अब तो हम सभी दोस्त लोग जाते रहते है वहां.”

राकेश त्याला काही उत्तर देणार एवढयात संजीवने व्हरांड्यातून ओरडूनच सांगितले, “अरे भाई उपेन्द्र. पहिले राकेशभाईको जरा फ्रेश तो होने दो, फीर बातेही करनी है.”

उपेंद्रने काही उत्तर दिले नाही, पण आत वळता वळता राकेशच हळू आवाजात म्हणाला, “उपेन्द्रभाई, मराठीमे एक प्रोव्हर्ब है, लेकी बोले, सुने लागे. संजीवकी नोटीस मेरे लिये है. मै चलता हूं.”

सगळ्याचं खाणं पिणं आणि गप्पा करता करता मध्यरात्र उलटून गेली होती. उपेंद्र त्या तिघांचा निरोप घेऊन गेल्यावर क्षमाही उठली, म्हणाली, “मीही जाते रे संजीव झोपायला. आज खुप चालणं झालं, हा काय भटक्या आहे, पण मला सवंय नाही.”

“हं, तू चल क्षमा. ह्या संजीवची तयारी असेल तर मी बसतो जरा गप्पा मारत. आपण दोन दिवसात काय गोंधळ घातलाय सांगतो ना जरा.” राकेश म्हणाला.

“माझी तयारी? अरे मी तर आल्यापासून केवढा संयम बाळगलाय, मी तर एकदम आतूर झालोय तुमची ॲडव्हेंचर स्टोरी ऐकायला. “

राकेशने मग दोन दिवसांची हकिकत छान रंगवून संजीवला सांगितली. कहाणी सांगताना झालेल्या गप्पांच्या ओघात राकेशच्या लक्षात आलं की, संजीवला भुताची कहाणी माहीत होती. पण त्यात काही आश्चर्य नव्हतं. सरदारजीकडून आणि इतरांकडूनही ह्या अफवा त्याच्या कानांपर्यंत पोचणे सहाजिकच होते. परंतु त्या स्पॉटबद्दल संजीवने जरा खोलात चौकशी केली तेव्हा राकेशच्या लक्षात आलं की, संजीवने त्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण केलेले असावे.

“पण संजीव, हा स्पॉट तसा तुमच्या क्षेत्रापासून बराच दूर आहे. तुला अगदी टोपोग्राफीकल डिटेल्सही माहीत दिसताहेत.” राकेशने विचारले.

“देखो दोस्त. ही एक गंमतच असते. आपण रस्त्यांवरून आणि जमीनीवरून जात असल्याने आपल्याला ऍक्च्युअल एअर डिस्टन्स विचारात घेण्याची सवंयच नसते. आपण नेहमी म्हणतो ऍज क्रो फ्लाईज. पक्ष्यांना तो सेन्स असतो. कावळयाच्या नजरेतून पाहिलं तर तू म्हणतोस तो एरिया आमच्या टेस्टींग ग्राऊंडपासून अगदी जवळ आहे. त्यामुळे आम्हाला त्याची माहिती असायलाच हवी.”

“ते बरोबर आहे. पण तुम्हाला टोपोग्राफीकल माहिती घेऊन काय करायचंय?”

“टोपोग्राफीकल तर सोडच. भोवतालच्या परिसरात होणारे बारकेसारके बदलही आम्हाला माहीत करून घ्यावे लागतात, आता बघ इथल्या एमएसईबीच्या इंजिनियरला माहीत नसेल पण मला ह्या भागातील सगळ्या हायटेन्शन पॉवर लाईन्स कशा गेल्यात? कुठे पॉवर स्टेशन्स आहेत, कुठे स्टेप डाऊन ट्रान्स्फार्म्रस आहेत ह्याची डिटेल्ड माहिती आहे.”

राकेश संजीवने सांगितलेल्या माहितीवर काही वेळ विचार करीत राहिला, मग त्यानं अगदी सहज स्वरात विचारले, “संजीव, तुम्हाला ही पॉवर लाईन्सची अद्यावत माहिती असणं आवश्यकच आहे. तुमच्या इथं ई - बॉम्बवर संशोधन चाललंय ना?”

त्याच्या प्रश्न ऐकून संजीवची जी प्रतिक्रिया झाली ती पाहून राकेश चकितच झाला. संजीव खुर्चीतून अर्धवट उठलाच, मग परत खाली बसला, आश्चर्याच्या धक्क्याने त्याचे तोंड उघडे पडले होते आणि तो डोळे विस्फारून राकेशकडे पाहात होता. राकेशच्या काय झाले हे लक्षातच येईना. त्याला वाटलं आपल्या मागे संजीवला काही दिसले असावे, पाठीमागे वळून त्यानं नजर टाकली. पण सर्व काही शांत होतं. त्यानं परत संजीवकडे नजर फिरवली, तेव्हा

संजीवचा चेहरा परत नॉर्मल झाला होता, तो परत व्यवस्थित बसला होता. राकेश प्रश्नार्थक चेहऱ्याने त्याच्याकडे पाहात प्रतिक्षा करत राहिला. बराच वेळ संजीव काहीच बोलला नाही तेव्हा मग राकेशने विचारले, "क्या यार, काय झालं?"

संजीवने ताबडतोब काही उत्तर दिले नाही. आणि त्यानं उत्तरादाखल राकेशला प्रश्न केला तेव्हा त्याच्या आवाजात, स्वरात चांगलाच बदल झाला होता, काहीसा रुक्ष, सावध आवाज होता तो. "राकेश, माझ्या आठवणीनूसार येथे काय संशोधन चालू आहे किंवा माझा कुठल्या प्रकारच्या संशोधनाशी संबंध आहे, अशा स्वरुपाची माहिती मी तुला कधीही दिलेली नाही. आणि माझी खात्री आहे की, क्षमालाही दिलेली नाही. ही माहिती टॉप लेव्हलची कॉन्फिडेन्शिल माहिती आहे. न्युजपेपर्स किवा तशा प्रकारच्या सोअर्सेसमधूनही तुला ही माहिती समजणं अशक्य आहे."

संजीव काहीक्षण एकटक नजरेने राकेशकडे रोखून पाहात राहिला, मग तो जेव्हा तो बोलला तेव्हा त्याच्या आवाजाला करडेपणाची धार होती. "तुला ही माहिती कुठून कळली? आणि उत्तर देण्यापूर्वीच तुला वॉर्निंग देतो, तुला ह्याच सोअर्सेसकडून

माहिती मिळाली आहे हे कदाचित तुला पुराव्यासकट सिद्ध करावं लागेल.''

राकेशचे डोळे जरा बारीक झाले होते, भुंवया किंचित आक्रसल्या होत्या, पण त्याच्या चेहऱ्यावरचे विस्मयाचे भाव मात्र अधिकच गहीरे झाले होते. त्याच्या ओठावर एक पुसट स्मितही लंपडाव खेळत होतं. त्यानं पाहिलं, संजीवच्या चेहऱ्यावर केवळ सावधपणाच दिसत होता, पण त्याचं शरीर वेगळीच भाषा बोलत होते. सावजावर उडी मारण्यासाठी टपलेल्या प्राण्याच्या शरीरा-वरील ताण त्याच्या अंगाखांद्यावर स्पष्ट जाणवत होता. आपल्या पाठीचा कणा पुर्ण उलगडून संजीव ताठ बसला होता, त्याचे दोन्ही हात खुर्चीच्या हातावर अशा प्रकारे ठेवलेले होते, की दुसऱ्याच क्षणाला तो उसळी मारून उभा राहाणार होता.

''रिलॅक्स संजीव, रिलॅक्स. एक तर हा प्रश्न मी विचारला तेव्हा हे संशोधन येथे चाललंय असं मला सुचवायचे नव्हते. आणि त्यात तुझा संबंध आहे असं निश्चितच मला ध्वनित करायचे नव्हते. कारण हे सत्य आहे की, मी जेव्हा तुमच्या इथं संशोधन चाललंय असं म्हटलं तेव्हा मला हे क्षेत्र अभिप्रेत नव्हते. तुमचे संरक्षण खाते अभिप्रेत होते. तुमच्या इथं म्हणजे तुमच्या संरक्षण खात्यात एवढेच मला म्हणायचं होतं. आता तुझा दुसरा प्रश्न ही कॉन्फिडेन्शियल

माहिती मला कुठे मिळाली. ती मिडीयात मिळालेली नाही हे खरं आहे. मला आता तातडीने त्या वेबसाईटचा युआरएल देता येणार नाही. औरंगाबादला पोचल्यावर मी देऊ शकेन. पण ह्या वेबसाईटवर मी एक लेख वाचलेला आहे. ज्या लेखात ह्या वैज्ञानिक विषयावर लिहिणाऱ्या अमेरिकन जर्नालिस्टाने इलेक्ट्रीक बॉम्ब काय असतो, त्याची रचना कशी असते, त्याच्यामुळे प्राणहानी न होताही कसं प्रचंड नुकसान होऊ शकते ह्याची माहिती दिली होती. शिवाय ह्या लेखकाने म्हटलं होतं की, हे बॉम्ब तयार करणं काहीच अवघड नाही. त्याच्याकरता फार पैश्यांची गरज नाही, खास स्किल, नॉलेजची गरज नाही. कुठलाही लहानसा टेररिस्टांचा गट हा बॉम्ब तयार करू शकतो आणि वापरूही शकतो. पण ही माहिती मी तुला द्यायची काही गरज नाही.''

संजीवचे खांदे जरा ढिलावले, त्याच्या चेहऱ्यावरील ताण कमी झालेला जाणवला राकेशला. पण तो बोलला तेव्हा त्याच्या आवाजात तो करडेपणा, सावधपणा होता.

''राकेश, ही माहिती तुला वेबवरून मिळाली असेलही. पण असं संशोधन इथं म्हणजे तुझ्या खुलाशाप्रमाणे भारतीय संरक्षण खात्यात चालू आहे ही माहिती तुला कशी मिळाली?''

आता मात्र राकेश हंसला, त्यामुळे संजीव दुखावला जाईल हे लक्षात येऊनही हंसला. “तो लेख वाचलास म्हणजे तुला सर्व स्पष्ट होईल, पण तुला सांगतो लेखाच्या शेवटी चक्क एक वेगळा परिग्राफ आहे. ज्याचं सबटाईटल आहे इंडियन ऍंगल. ह्या लेखकाने स्पष्ट म्हटलं आहे ह्या बॉम्बवर भारतिय संरक्षण खात्यात संशोधन झालेले आहे. मी तुला म्हणालो की, इथं म्हणजे मला संरक्षण खात्यात असाच अर्थ आभिप्रेत होता. पण आता विचार केल्यावर मला वाटतं, कदाचित मला आपल्या ह्या भौगोलिक क्षेत्रात असेही अभिप्रेत असेल. कारण ह्या आपल्या क्षेत्रात अगदी मागल्या शतकापासून स्फोटक शस्त्रे तयार करण्याचे कारखाने आहेत, वेगवेगळ्या स्फोटकांवर येथे संशोधन होत असते, ही माहितीही त्या प्रश्नाच्या मागे नेणिवेच्या पातळीवर असू शकेल.” परत राकेश थोडावेळ थांबला, मग पुढे झुकून संजीवच्या मांडीवर थाप मारत तो म्हणाला, “अगदी मनापासून देवाशपथ खरं सांगतो, तू जेव्हा पॉवरलाईन्सबद्दल बोललास, तेव्हा माझ्या मनाच्या आतल्या पातळीवर मी टु प्लस टू केले असावे. इलेक्ट्रीक बॉम्बचे गुणधर्म मला माहीत आहेत, आणि”

तो मध्येच वाक्य अर्धवट सोडून संजीवकडे पाहात राहिला. संजीव आता खुर्चीच्या पाठीवर रेलून रिलॅक्स झाला होता. त्याच्या चेहऱ्यावर हास्य होतं, मग खुर्चीवरून उठता उठता तो म्हणाला,

“माझी खात्री आहे राकेश, तू खरंच बोलतो आहेस. आपण असं करूया. तुम्ही उद्या तर ताबडतोब निघणार नाहीचं ना? कारण आपण उद्या तुम्ही आल्यावर पाइंजीकडे जाणार आहोत ना? तेथून आल्यावर मी तुला येथे काय संशोधन चाललंय हे सांगेन. कदाचित तू काही चांगल्या सूचनाही देऊ शकशील, पण ते उद्या बघू. तुझ्यावर संशय व्यक्त केल्याबद्दल माफी मागतो मी. कमॉन, जाऊया झोपायला. खरं तर जेवतानाच तुला डुलकी आली होती झोपेची. “

ते दोघे उठले, एकमेकाच्या खांद्यांवर हात ठेवून व्हरांड्याच्या पायऱ्या चढले.

क्षमाला जाग आली, तिने खिडकीच्या दिशेने नजर टाकली. क्षितिजावर शुक्राची चांदणी बरीच वर आली होती, पण अजूनही बाहेर अंधारलेलेच होते. जरा आणखी झोप घ्यावी की काय, असा विचार तिच्या मनात येत होता, पण तिच्या लक्षात आलं, राकेशच्या बेडरूमच्या बाजूनं हालचालीचा आवाज तर येतच होता, पण बंगल्यात इतर वेगवेगळ्या ठिकाणाहून वेगळेवेगळे आवाज ऐकू येत होते. रस्त्यावर झाडू मारल्याचा आवाज, झाडू मारणाऱ्या बाईची गुणगुण, कोंबड्याची दूरून येणारी बांग, किचनमधून भांड्यांचे आवाज.. तिला वाटलं, हे विविध आवाज ऐकत नुसतं पडून राहावं, डोळे न उघडता, कानांनीच डोळ्याचं काम करावं. कुठूनतरी पाणी उकळण्यासारखा आवाज ऐकू येत होता, तिला वाटलं, संजीवचा ऑर्डली पोचला असणार, सकाळच्या नाश्त्याची तयारी करत असणार. पण पाणी उकळण्याचा हा आवाज वेगळ्याच दिशेने येत होता आणि जरा वेगळाच भासत होता. मग तिच्या लक्षात आलं, गिझर चालू करून बराच वेळ झाल्यामुळे गिझरमधले पाणी उकळत आहे. तिला वाटलं, ओरडून गिझर ऑफ करायला सांगावं. पण आपण संजीवच्या क्वार्टरवर आहोत हे तिच्या लक्षात आले, आणि ह्याच गिझरमधून कदाचित शेजारच्या क्वार्टरलाही गरम पाण्याचा पुरवठा

होता असेल, हे लक्षात येऊन काहीच न करता पडून राहाणं हेच उत्तम असं तिनं स्वत:ला समजावलं. पण तो पाण्याचा आवाज ऐकत तिला शांतपणे पडून राहाणे अशक्य झालं. ती उठली, पुढच्या एन्टरन्स हॉलकडे जाता जाता तिने राकेशच्या खोलीत डोकावून पाहिले. तो खोलीत नव्हता. ती हॉलमध्ये आली आणि तिच्या मागोमाग ऑर्डली ट्रेमध्ये चहा घेऊन आला. “मेमसाब, आप चाय लिजिये, राकेशसाबने कहां है की एकाध घंटेमे वापस आयेंगे.” तिने चहाचे दोनच घोट घेतले होते, आणि बाजूच्या जिन्याने संजीव खाली उतरला. “गुड मॉर्निंग क्षमा. झोप कशी झाली? सॉरी, आमच्या इथे सकाळ फार लवकर सुरू होते. अजून पंधरा मिनिटात पीटी परेड सुरू होईल. पण मी आज दाडीं मारणार आहे. म्हणजे आठ वाजेपर्यंत मी रिकामाच आहे. चलायचं का चक्कर टाकायला.”

“जरूर. पण जरा वेळ इथेच बसूया गप्पा मारत. मग जाण्यापूर्वी मला एक पंधरा मिनिटं दे, जरा चेहरा विसळून घेते, केसावरून कंगवा फिरवून घेते. नाहीतर बाहेर तुझे अधिकारी दिसले तर डोळे भरून पाहात राहतील माझा अवतार.”

त्यानं चहाचा मोठा मग्गा तोंडाला लावला, तोच मग्गा गळयाजवळ टेकवून त्यानं गळयाला शेकणं सुरू केलं. तिनं त्याच्या

ह्या उद्योगाकडे पाहात भुंवया उंचावल्या तेव्हा तो हसून म्हणाला, “ही पंजाबकी जाडेकी आदत. कडाक्याची थंडी, बोटे आखडलेली, शरीर जेथे जेथे उघडे तेथे तेथे गारठून गोठलेले. मग चहा पिण्यापेक्षा मग्गा दोन्ही पंज्यात धरून हात शेकायचे. चहातून वाफेद्वारे वाया जाणाऱ्या उष्णतेचा सदुपयोग.”

“लहानपणी नाशिकला खुप थंडी असायची. शाळेत जाताना गार गार वाऱ्यांनी नुसते गारठून जायचो आम्ही. आपल्या हाताची बोटे आपल्याच बगलेत घालून गरम करायची. मग केव्हा ती सवंय सुटली कुणास ठाऊक. गेल्या किती वर्षात बगलांचा उपयोग तसा नाही केलेला.” ती म्हणाली.

संजीव तिच्याकडे एकटक पाहात होता. त्याच्या चेहऱ्यावर वेगळाच भाव उमटला होता, समाधीस्त झाल्यासारखा तो बघत होता तिच्या दिशेनं. आपला चेहरा लाल होतोय असं वाटलं तिला, आणि तिने विचारलं, “का रे? काय झालं?”

मग आपली नजर बाजूला करत तो हंसला, म्हणाला, “ती काखेत हात घालून गरम राखण्याची सवंय सुटली हे एवढ्या करूण स्वरात सांगत होतीस, की जणू काहीतरी मौल्यवान हरवल्या-सारखं.” तो काही क्षण थांबला, “पण असं होतं कित्येकदा, काही

क्षण असे येतात, जगले जातात, संपतात, आणि मग लक्षात येतं ते क्षण किती मुल्यवान होते?"

आता क्षमाला वाटलं की संजीवचा स्वर ओलावलेला आहे. तिच्या लक्षात आलं, दोन वर्षांपूर्वी ते भंडारदरा धरणावरील गेस्टहाऊसमध्ये दोन दिवस राहिले होते, ते दिवस त्याला आठवत आहेत. तिला वाटलं, किती सहजतेने जवळ आलो होतो आपण? ते तीन चार महिने खरोखरच जादूचे दिवस होते असं वाटतंय आता. पण त्यानंतर बाजूलाच सरकत गेलो आपण. अंतर वाढलं नाही, पण कमीही नाही झालं. तरी एक चांगलं की त्या आठवणीं तशाच शाबूत आहेत अजून. स्फटीकासारख्या चमकदार, निर्मल. ती घाईघाईत उठली, त्याला म्हणाली, "चल, जाऊन येऊया बाहेर. परत राकेश आला की तू काही माझ्या वाटेला येणार नाहीस. रात्री किती वेळ गप्पा मारत बसला होतात रे?" बोलत बोलत त्याच्याकडे पाठ फिरवून ती आपल्या बेडरूमकडे चालू लागली. खोलीच्या दाराशी ती किंचित थबकली, तिची नजर ड्रेसिंग टेबलच्या आरशाकडे गेली. ती आरशााजवळ सरकली, आरशातून तिचे पाणावलेले डोळे तिच्याकडे पाहात होते. आपल्या डोळयाकडे, विस्कटलेल्या चेहऱ्याकडे पाहताना तिने मानेला जोरदार झटका दिला, "यडाबाई, बगलेत हात घालून गरम करण्याचे दिवस गेलेत आता तुमचे." ती बाथरूमकडे वळली,

आणि तिच्या लक्षात आलं, राकेश मुद्दामूनच सकाळी उठून बाहेर निघून गेला होता, दोघांना प्रायव्हसी देण्याकरता. अशा सिच्युएशनमध्ये संजीवने ही संवेदनशिलता दाखवली असती का? मग तिला आठवलं, दोन वर्षांपेक्षा जास्त काळ झालाय, तिघांना एकत्रित ट्रेकिंगला जाणं जमलेले नाही. तिघंही मॅच्युअर झालोत आपण आता. प्रत्येकाला स्वत:च्या जबाबदाऱ्या आहेत, छंद आहेत, ॲम्बीशन्स आहेत. ती बेसिनसमोर उभी होती, नळ उघडून तिने सपासपा चेहऱ्यावर पाणी मारले, थंडगार पाणी.

राकेशला यायला बराच उशीर झाला. तो आत आला तेव्हा सजीव ड्यूटीवर जाण्याकरता कपडे करून तयार होता, आणि नाश्ता घेत होता. क्षमा त्याच्यासमोर बसली होती, पण नुसतीच. क्षमाने पाहिलं, राकेशचे कपडे विस्कटलेले आणि मळलेले तर दिसत होतेच, पण कपड्यावर गवताची कुसळेही दिसत होती, जागोजाग.

"प्लीज कॅरी ऑन संजीव. सॉरी पार भरकटत गेलो, लक्षातच आलं नाही इतका दूर गेलोय म्हणून. पण संजीव, असं व्हर्जीन नैसर्गिक गवताळ कुरण आता कुठं शिल्लक असेल असं नाही वाटतं. कधी कापतच नाही का रे हे गवत." त्यानं संजीवला विचारलं.

"काय आहे? ते आमचं टेस्टींग फिल्ड आहे. बाहेरच्या माणसांना आम्ही त्या भागात जाऊच देत नाही. जरा धोक्याचंच असतं तेथे जाणं. कधी चुकून माकून एक्स्लोजीव्ह राहून गेलेले असेल कुठे तर. तसा अपघात झालेला नाही गेल्या निदान सहा वर्षात. पण ब्रिटीश काळापासून जे नियम चालत आहेत तेच चालले आहेत अजून. चलता है. पण तुला गाईड कोण होतं?"

"उपेंद्र भेटला योगायोगानं. रनींग करायला त्याच बाजूला गेला होता. तो होता म्हणून जाऊ शकलो ना त्या क्षेत्रात, तरीही निदान तीन गार्डसनी हटकलेच." मग संमोरच्या खुर्चीत बसत म्हणाला, "तू केव्हा निघणार आहेस? आणि संध्याकाळी किती वाजेपर्यंत परतशील? म्हणजे तुला उशीर होणार असेल तर आम्ही परस्परच सरदारजीकडे जाऊन पोहचतो."

"नाही. नाही. तुम्हाला जर उशीर होणार नसेल, तर सरळ प्रथम इथे या. संध्याकाळी म्हणजे पाच वाजता आलात तरी भेटेन मी तुम्हाला. मला वाटतं आपण आधी घरीच गप्पा मारत बसूया, पेयपान करीत. मग उशिरा जेवायलाच जाऊया." संजीव म्हणाला.

"ठीकाय. आम्ही तसं सांगतो सरदारजींना. जाताना आम्ही जाणारच आहोत, काही प्लॅन्टस आणली आहेत त्याच्याकरता." क्षमाने अनुमती दर्शवली. त्यानंतर राकेश बाथ घेण्याकरता म्हणून

निघून गेला. क्षमा संजीवबरोबर बसली होती, इकडंचं तिकडचं बोलत. संजीवही बोलण्याच्या मूडमध्ये नव्हता. त्याच्याकडे पाहाता तिच्या मनात आलं, भोवतालच्या माहौलचा ह्याच्यावर लागलीच परिणाम होतो. म्हणजे ह्याला मूडमध्ये आणण्यासाठी नेहमी भंडारदऱ्यासारख्याच ठिकाणी जायला पाहिजे का? .

तिच्या ओठावर स्मित झळकले असावे, कारण संजीवने तिला विचारले, "काय गं काय झालं? हसते आहेस?"

"काही खास नाही रे. मनात काहीतरी चालू असतं."तिने त्याला उत्तर दिले, पण मग तिला वाटले, ह्या अशा उत्तराने संजीवचे समाधान होणार नाही. मग ती म्हणाली, "काही व्यक्ती भोवतालच्या वातावरणाप्रमाणे बदललात. भोवताल बदललं की तेही बदलतात. काही व्यक्ती तर इतक्या बदलतात, की त्यांना मुळचा काही स्व-भाव आहे वा नाही अशी शंका यावी. नवीन सर आले वर्गात की मी त्यांना प्रश्न विचारायचे, सरड्याचा खरा रंग काय असतो हो?"

संजीव हंसला, पण मग जरा विचार करून म्हणाला,"माझ्या नाही लक्षात आलं तू काय म्हणते आहेस ते."

खरं तर त्या विषयावर आणखी चर्चा करण्याची तिची इच्छा नव्हती. पण तरीही ती म्हणाली, "म्हणजे असं बघ, माझ्या

ओळखीची एक बाई होती. वयाने तरुणच पस्तीशीची जेमतेम. चांगली पदवीधर. वाचनही भरपूर आणि विविधप्रकारचे. तिची नणंद माझ्याच बरोबर कॉलेजात होती. मी वरचेवर जायचे तेथे. पण ही आपली नेहमी गंभीर, मितभाषी. हसण्याकरता कधी तिचे ओठ विलग होतात की नाही अशीच शंका होती मला. मी तर माझ्या मैत्रिणीला म्हणायचे देखील, तुझी वहिनी अगदीच घुमी दिसतेय. एकदा मी विरारला स्टेशन बाहेर पडत होते, माझ्या नावाने कोणीतरी हाक मारली, मी चमकून बघितलं, आवाजाच्या दिशेनं. ही तेथे उभी होती, रिलॅक्सड्. चेहऱ्यावर हंसू. कपडे, चेहरा सर्वच उत्साहाने न्हायलेले. मी चकीत होऊन तिच्या प्रसन्नतेकडे, तिच्या बदललेल्या रुपाकडे पाहात राहिले. चक्क मला चहा पाजला तिने रेस्तोरॉमध्ये. मला अगदी राहवलं नाही, म्हणालेच तिला. "किती वेगळ्या दिसताहात तुम्ही आज!" ती हसंली, "अगं माहेरी आलेय ना?" मला हसूच आलं, किती घटापिटा जबाब. पण तिचे ते उत्तर खरं होतं, ह्याची जाणीव मला झाली ती परत गावी आल्यावर तिला पाहिल्यावर, तिच्या नणंदेला भेटायला गेले तेव्हा."

तिच्या अनुभवकथनाचा संजीवने काय अर्थ काढला कुणास ठाऊक? पण तो अधिकच गंभीर झाला. पटापट नाश्ता करून तो कामावर निघून गेला. राकेश काहीवेळातच तयार होऊन बाहेर आला. त्यानं जीन आणि टीशर्ट असा पेहराव केला होता. क्षमाकडे

पाहून म्हणाला, “चल, तुही पटापट आवर. आणि माझ्या कपड्यावरून हींट घे. थोडक्यात साडी बिडी नेसू नकोस.”

“मिनी स्कर्ट चालेल?” तिने काहीशा खवचटपणे प्रश्न केला.

“मला चालेल, आवडेलही.” पण मग परत आल्यावर संजीवला कसे शांत करायचे त्याचा विचार कर. खरंच क्षमा, ह्या मिलीटरी एरीयात तू तशी एक चक्कर मारलीस ना तर संजीवच्या चहात्यांची संख्या एका दिवसात शंभर पटीने वाढेल.”

ते सरदारजीकडे पोचले तेव्हा दहा वाजून गेले होते. आसमंतात स्वच्छ उन्ह पसरलं होतं पण तरीही हवेत अजून बोचणारा गारवा होता. सरदारजीने अगदी दिलखुलास स्वागत केलं दोघांचं. 'जरा थांबा, आणि चना भटोराच खाऊन जा' असा त्याचा आग्रह होता. पण क्षमाने त्याला स्पष्ट सांगितलं, “पाइंजी, हम शामको आ रहे है ना कॅप्टन संजीवके साथ. उस वक्त जो खिलाना है खिलाओ. अब टैम है कामका. ये तुम्हारे साबके लिये एक बढिया कॉफी बनानेके कहो. न्यूज पेपर्स सामने रखो. मेरे गाडीके डिकीसे पौधे उतारनेके लिये कहो किसीको. फीर मै कहती हूं, आपको कौनसी चीज किस जगहा कैसी लगानेकी.”

त्याच्यासमोर उभं राहून भुवया प्रश्नार्थक उंचावून बघणाऱ्या सरदारजीकडे पाहात राकेश हसून म्हणाला, “ठीक है पाइंजी. धंदेके टाईम सिर्फ धंदेकी सोचो. मेमसाव क्या कहती है सुनो.”

तब्बल चाळीस मिनिटांनी ते दोघं जेव्हा परत राकेशच्या टेबलाजवळ पोचले, तेव्हा सरदारजीच्या चेहऱ्यावरील भाव बदललेले होते. आता चेहऱ्यावर आपूलकी आणि जिव्हाळ्याबरोबरच आदराची भावनाही सहज दिसत होती. आल्यावर तीन लस्सी बनवायची ऑर्डर देऊन सरदारजी राकेशसमोरच बसला. क्षमाकडे कौतुक भरल्या नजरने बघत मान हलवत तो म्हणाला, “अरे साब, मेमसाब अपने विषयमे बहोतही माहीर है. मैने तो तय कर लिया है, ढेर सारी कन्सल्टींग फी देने पडी, फिकर नही है.”

लस्सीचा एक घोट घेऊन क्षमाने सहज स्वरात विषयाला सुरुवात केली, “पाइंजी, जाते वक्त हमे उस चुडेलने दर्शन दिया. एक बार नही दो बार.”

सरदारजी गंभीर झाला, “बेटी ऐसी बातोमे मजाक नही करते. दुनियामे कुछ चिजें ऐसी है, हम उन्हे समझ नही पाते, लेकीन उनसे दूरही रहना चाहिये.”

“ मै मजाक नही कर रही हूँ चाचाजी.”ती म्हणाली आणि मग तिने सर्व हकिकत सविस्तर सांगितली सरदारजीना आणि म्हणाली, “हम लोगोंने कार रोककर उस चुडेलको नजदीकसे देखनेकी कोशिश की है, और इन साबको लगता है, वे चुडेल बिडेल कुछ नही है, एक खास प्रकारकी प्रतिमा प्रॉजेक्ट की जा रही है, जो की बिलकूल सच्ची लगती है. अब हम कोशीश कर रहे की, ये किसका काम होगा, और इसका उद्देश क्या होगा? कल इन्स्पेक्टर दिघेका फोन आया था, अब ऊस चुडेलने अपना स्थानभी बदल दिया है. हो सकता है, आज रात हम उसको फीर मिलने जायेंगे.”

सरदारजी बराच वेळ काहीच बोलला नाही. मग गंभीरतेने म्हणाला, “अगर तुम लोग कह रहे हो, वैसा है तो इसके पिछे कौन है ये पता तो लगाना जरूर है मेमसाब. मगर फीरभी मै कहता हूं, ऐसी बातोमें मजाक नही करते. उस पत्थरकी खदानमे चार पाच महिनोसे दो तीन लोग रहने लगे है. कहते है परदेसी है, लेकीन यहॉ कहीं इथर उधर कभी किसीने उनको देखा नही है. शायद उनके खानेपिनेका सामान भी बंबईसे लाया जाता है. कोई नही जानता है की, वे पारशीबाबाके खदानमे क्या कर रहे है?”

“पाइंजी, वे लोग वहॉ रहते है, पोलीसको मालूम है?” राकेशने विचारले.

“मालूम तो होना चाहीये साब. अखिर ये काम तो उनकाही है ना?” सरदारजी काहीवेळ विचार करीत राहिला.”मुझे लगता है, आप लोग इन झंझटोसे दूरही रहो. और आज रात वहॉ जानेका विचारही मत करो.”

“लेकीन पाइंजी, ये परदेसी लोग कभी आपके यहॉ आये नही क्या?”

“नही बेटी. मुझे तो लगता है, वे लोग यहॉ रहते नहीं होंगे, कभी कभी आकर रहते होंगे, वीक एंड को. वैसे यहॉ इर्द गीर्दमे ऐसे बहोत प्लॉटस् है, बंबईवालोंने ले रख्खे है, दो चार महिनोंमे कभी एक दोन दिन आकर रुकते है वहॉ. बाकी खालीही पडे रहते है”

आणखी काही वेळ गप्पा मारून राकेश व क्षमा तेथून निघाले. वाटेत क्षमाने राकेशला विचारले, “राकेश, आज सकाळी तू भटकायला गेला होतास त्या टेस्टींग ग्राऊंडवर. मला वाटतं, संजीवला तुझं जाणं फारसं आवडलेलं दिसत नाही.”

राकेश हसला, म्हणाला, “आपल्या देशातील डिफेन्सवाल्यांचं हे असंच असतं. आपण अत्यंत गुप्त असं काम करतोय असं वाटतं त्यांना. सिव्हिलिअन्सबद्दल त्यांच्या मनात प्रंचड संशय असतो. आणि सिव्हिलियन्स म्हणजे निच लोक अशीही काहीशी कल्पना असते त्यांची. मी काही बोलणार नव्हतो,

कालच्या घटनेबद्दल. पण आता तुचं विषय काढला आहेस तेव्हा सांगतो. काल मी सहज बोलता बोलता, इथं इ-बॉम्बवर संशोधन चालतं ना? असा प्रश्न केला संजीवला. तर मला ही गुप्त माहिती कळली म्हणजे मी कुणी स्पाय आहे की काय असा संशय आल्यासारखीच प्रतिक्रिया दिली होती त्यानं. क्षणभर तर मला वाटलं होतं, हा बहुधा त्यांच्या सिक्युरिटी पोलीसांना बोलवणार. अर्थात हे झालं रॅंक ऍन्ड फाईलच्या अधिकाऱ्यांबाबत. वरच्या अधिकाऱ्यांना माहीत असतं. हे सिक्रेट बिक्रेट फक्त फाइलींपुरतं असतं. एकतर अमेरिका, इंग्लंड सारख्या सधन देशांतील डिफेन्स सिक्रेटसची व्याख्या आपल्या देशांपेक्षा फारच वेगळी आहे. तिथे जे विषय खुल्लेपणाने न्युजपेपर्समध्ये चर्चिले जातात, ते येथे टा◌ॅप सिक्रेट समजले जातात.”

“मला काही समजत नाहीये तू कशाबद्दल बोलतो आहेस? मी उठून झोपायला गेल्यावर तुमची काय चर्चा झाली मला माहीत नाहीये राकेश.” ती म्हणाली.

“अगदी थोडक्यात सांगतो. ब्रिटीशांनी भारताला आपल्या साम्रज्याचा भाग बनवलं तेव्हापासूनच त्यांनी आपलं सैन्यदल मजबूत करायला सुरूवात केली. नवनवीन शस्त्रास्त्रांचा शोध लावून

त्यावर प्रयोग करायला त्यांना आशियातील त्यांच्या वसाहतींचा चांगलाच उपयोग करता येत होता. पुण्याच्या परिसरात दारूगोळा तयार करण्याचे कारखाने त्यांनी एकोणिसाव्या शतकातच सुरु केले आणि अस्त्रांत अधिकाधिक सुधारणा करण्यासाठी प्रयोगही. पुण्याच्या आसपासचा प्रचंड मोठे क्षेत्र त्यांनी ताब्यात घेतले होते. वेगवेगळ्या प्रकारची स्फोटके तयार करणे, त्यांची घातक शक्ती किती आहे हे ठरवण्यासाठी प्रत्यक्ष प्रयोग करणे हे सर्व दोन शतकांपासून येथे आणि नगरच्या भागात होत आहे. आपल्याला आजुबाजूच्या क्षेत्राची बारीकसारीक माहिती आहे हे सांगताना संजीवने खास करून हाय टेन्शन लाईन्स, पॉवर स्टेशन्सचा उल्लेख केला. सहाजिकच मी अंदाज केला, इथे इ-बॉम्बबद्दल अभ्यास होत असणार. आता खरं सांगू का क्षमा, हा अंदाज करायला काही फार बुद्धीमत्तेची गरज नाहीये."

क्षमा ताबडतोब काही बोलली नाही. त्यांची गाडी आता कार्ला लेण्याच्या डोंगराजवळून चालली होती. त्या भागात नव्यानेच अस्तित्वात आलेल्या अलिशान हॉटेल्सकडे तिचे लक्ष वेधले गेले होते. नव्या नव्या सुंदर इमारती, भोवतालची गार्डन्स काही वेळ ती न्याहाळत राहिली. मग कार पुढे आल्यावर त्याच्याकडे वळून म्हणाली, "पण मुळात हे इ-बॉम्ब काय प्रकरण आहे राकेश?"

"मी फार डिटेल्समध्ये जात नाही. आणि मला वाटतं, प्रत्येक देशातील संरक्षण खात्यातच नाही तर टेररिस्ट संघटनांमध्येही ह्यावर जोरात संशोधन चालू असेल. त्यामुळे माझी माहिती मर्यादितच आहे. पण गांधीवादी, अहिंसावादी आणि बॅक टू द नेचर म्हणणारे लोक स्फोटकशक्ती असलेल्या, आणि मोठ्या प्रमाणात विध्वंस व प्राणहानी करणाऱ्या बॉम्ब्सपेक्षा इ-बॉम्बस् चांगले असं म्हणतील. कारण ह्या बॉम्बमुळे केवळ त्यांच्या रेंजमधील सर्व इलेक्ट्रीकल आणि इलेक्ट्रनिक्स इक्वीपमेंट निकामी होतात. घरातील बल्बज् जळतात, रेडीओ, फ्रिज बंद पडतात. पॉवर स्टेशन्समधील डीपीज् शॉर्ट होतील. हाय टेन्शन लाईन्सही कुचकामी होतील. मुंबईसारख्या लोकल्स बंद पडतील. कारखान्यांचे सायनन्सही बंद होतील. ज्या ज्या ठिकाणी जे जे विजेशी संबंधित आहे ते सर्व ठप्प होईल. आणि बॉम्बज् जर शक्तीमान असतील तर ही विद्युत निर्मिती साधने परत सुरु करणे केवळ अशक्य होईल. घरं न पडता, रोड, पूल उध्वस्त न होता, जिवीत हानी न होता, निसर्गाला किंचितही धक्का न लागता, आपलं हे सिव्हिलायशेन तीनशे वर्षे मागे जाईल."

तो थांबला. ते आता लोणावळयाजवळ पोचले होते. एक्स्प्रेस हायवे खालून जाणाऱ्या ह्या रस्त्यावर पुढे कशामुळे तरी ट्रॅफीक जाम झाला होता. एक्स्प्रेस वेने न जाणाऱ्या ट्रक्स, ट्रेलर्स, लाल एस.

टी बसेस आणि मुख्य म्हणजे अनेक प्रकारची टु व्हिलर्स ह्यांची पुढे गर्दी जमली होती. राकेशने गुपचूप गाडी दुसऱ्या गाडीपाठीमागे उभी करून इंजिन बंद करून टाकले. इंचाइंचाने पुढे सरकणाऱ्या ट्रक्सच्या धुरामुळे वातावरण सर्व धूरकट झाले होते. आसमंतात अर्धवट जळलेल्या डिझेलचा, रॉकेलमिश्रीत धूर सांचला होता.

भोवती पाहात राकेश हसला आणि म्हणाला, "हा इ-बॉम्ब जेथे उडेल ना, तेथे असा ट्रॅफीक जाम असेल. आणि तो जाम तसाच राहील. सर्व गाड्या तेथल्या तेथेच बंद पडतील. एक मात्र असेल की कुठल्याही गाडीतून असा विषारी धूर बाहेर पडत नसेल. कारण सर्व इंजिन्स कामातून गेलेली असतील. आणि कुणीही काहीही करू शकणार नाही. कुठून मदतही मिळणार नाही, मदतीकरता संदेशही देता येणार नाहीत कुणाला. कारण टेलिफोन्स, मोबाईल, वायरलेस सर्व संपर्क साधने डेड झालेली असतील."

क्षमाने पर्समधून रुमाल बाहेर काढून नाकावर धरला होता. तिचे डोळे चुरचुरत होते.

"राकेश, तू अतिशयोक्ती करतो आहेस हे समजतंय मला. पण तरीही तुला मुळात काय म्हणायचंय ते लक्षात आलंय माझ्या." क्षमा काहीशा छद्मी स्वरात म्हणाली.

“तुला काहीही समजलेलं नाहीये क्षमा.” असं म्हणून तो काही वेळ भोवती पाहात राहिला, मग म्हणाला, “आता इ-बॉम्ब हा काय प्रकार आहे ह्याविषयी मला अभ्यासवर्ग घ्यावा लागेल असं दिसतंय. ठीक आहे. परत अगदी थोडक्यात सांगतो. जेव्हा वीज वायर्समधून वहाते, तेव्हा विद्युतप्रवाहाभोवती इलेक्ट्रो मॅग्नेटीक फिल्ड आकारात येते. ह्या लाईन्स जर व्हेरी हाय व्होल्टेजच्या असतील तर हे इलेक्ट्रो मॅग्नेटीक फिल्डचे क्षेत्र प्रभावीही असते, आणि हे क्षेत्र मोठेही असते. ह्या क्षेत्रात तुमचा मोबाईल बंद पडतो, तुमचा ट्रान्झीस्टर रेडिओ नुसताच खरखर्रत राहतो. इ-बाम्बमध्ये वेगळ्या प्रकारे स्फोट होऊन प्रचंड शक्तीमान अशा इलेक्ट्रो मॅग्नेटीक लाटा निर्माण होतात. त्सुनामी लाटासांरख्या ह्या लाटा असतात असं म्हणूया आपण. ह्या लाटा ज्या ज्या विद्युत उपकरणांवर, इलेक्ट्रॉनिक साधनांवर आदळतील, त्या साधनांमधील अंतर्गत सर्कीटस शॉर्ट होतील, ही उपकरणे कायमची निकामी होतील. इ-बॉम्ब हे असं उपकरण आहे क्षमा की, ज्यामध्ये ट्रेडिशनल स्फोटकशक्ती वापरून प्रचंड गतीमान व शक्तीमान इलेक्ट्रो मॅग्नेटीक लाटा तयार होतात. आणि हे इ-बॉम्ब बनवायला फार टेकनिकल स्कीलची गरज नसते, त्याचे कच्चे मटेरियल सहज मिळू शकते, तुमच्याकडे थोडीशी संसाधने असतील तर तुम्ही हे

इ-बॉम्ब बनवू शकता. दॅट इज देअर ब्युटी. हे बॉम्बज् बनविण्यात कोणताही देश मोनोपॉली सांगू शकत नाही. पण..”

राकेश बोलता बोलता मध्येच थांबला. त्यानं बोलण्याचा प्रयत्न केला असता तरी त्याचे शब्द क्षमाच्या कानापर्यंत पोचणं शक्य नव्हते. पुढे ट्रफिक जाम मोकळा करण्यात पोलीसांना यश आले होते, आणि त्याच्या भोवती आता सर्व वहानांची इंजिन्स तर घरघरू लागली होतीच, पण सर्व हॉर्नसही चित्कार करू लागले होते. आपली वहाने सोडून पुढे गेलेली माणसंही आरडाओरड करीत आपापल्या वहानांकडे पळत होती.

लोणावळ्याला इस्टेट एजंटचा बंगला शोधायला त्यांना फार कष्ट घ्यावे लागले नाहीत. टेकडीच्या कुशीतला त्याचा लहानसाच बंगला जरी जूना असला तरी सुंदर व टूमदार दिसत होता. आता जवळून जाणाऱ्या एक्स्प्रेसवेमुळे तो जरा खड्यात गेल्यासारखा दिसत होता आणि त्याच्या दर्शनी भागाची शान कमी झाली होती. बाहेर लांब रुंद व्हरांड्यातच पार्टीशन करून ऑफिसरूम बनवली होती. ते दोघं आत शिरल्यावर अहुजा घरातून त्यांचं स्वागत करायला बाहेर आला होता.

"एक्स्प्रेस हायवेमुळे अनेक फायदे झाले असतीलही पण त्यामुळे लोणावळ्याची पूर्वीची जी शान होती ती साफ गेलीय आता. पूर्वीचं लोणावळा म्हणजे निसर्गाच्या कुशीत वसलेलं रम्य स्थान होतं, आता लोणावळ्यातून निसर्ग मायनस झालाय." राकेशने सुरुवात केली.

"यु आर व्हेरी राईट मिस्टर. काय आहे, येथील बहुतेक सर्व बंगले बांधताना आर्किटेक्टसनी बंगल्यांचा भोवताल लक्षात घेतला होता. त्यामुळे जुन्या प्रत्येक बगल्याला आपली एक स्टेटस् होती. एक्स्प्रेस हायवे ने एक झटकेमे सब ब्युटी खत्म कर दी" अहूजा दीर्घ निश्वास सोडत म्हणाला."एनी वे कहिये, व्हाट आय कॅन डू फॉर यू?

क्षमाने सरळ विषयालाच हात घातला होता. "देहूरोडके पास पुराना बॉम्बे पुना रोड जहॉ एक्स्प्रेस वेसे मिलता है, वहॉ मेरे पार्टीको एक जगह चाहिये. कमसेकम तीन एकर. फार्म हाऊस बनानेके लिये. बंबईमे आपका नाम रसिकभाई बागलेचाने नाम बताया था." . पन्नाशी उलटलेला अहुजाच्या वडलांचा मुंबईत धंदा होता, त्याचवेळी त्यांनी येथे हा बंगला तयार केला होता. तरुण अहूजा मुंबईतून येथे येण्याची संधीच शोधत असायचा त्या वयात. महिन्यांतून दोन तीन वेळातरी आपल्या मित्रमैत्रिणींना घेऊन

यायचा इथं. मिलीटरीत काही वर्षे काढल्यानंतर तो सरळ इथे सेटल झाला होता.

त्यानं ताबडतोब, जवळच्या शेल्फवरील अनेक भेंडोळ्यापैकी एक भेंडोळे उलगडले. मॅप बऱ्याच वर्षांत अपडेड केलेला दिसत नव्हता आणि अनेक वर्षे हाताळला गेल्याच्या खाणाखुणा त्यावर स्पष्ट दिसत होत्या.

"मै आजकल सेमी रिटायर्डमेंटमे गया हूं। बेटा बिल्डर बन गया है, उसने मुझे रिटायर्ड कर दिया है" क्षमायाचनेचे हसू हसत अहुजा म्हणाला. मग क्षमाची आणि त्याची चर्चा सुरु झाली. पूर्वीपासून ह्या भागात पैसा गुंतवून जमिनी घेऊन ठेवलेल्या, बंगले बांधलेल्या, हॉटेल्स सुरू केलेल्या लोकांना अहूजा पर्सनली ओळखत होता आणि त्यामुळे आजूबाजूच्या भूभागाचा इतिहासच त्याला पाठ होता असं दिसत होतं.

राकेशच्या नजरेनं ताबडतोब तो टेकडीजवळचा जूना खडी सेंटरचा स्पॉट शोधून काढला आणि त्याच्या लक्षात आलं, संजीव म्हणत होता ते खरं होतं. तो स्पॉट खरोखरच टेस्टींग ग्राऊंडच्या जवळच होता. नकाशावर एक्स्प्रेस हायवे लाल पेन्सिलने मार्क केलेला होता, पण नकाशा जूनाच असल्यामुळे हायवेने त्या भागातील कोणत्या जमीनधारकांच्या जमिनींवर घाला आला होता

हे स्पष्ट दिसत होतं. राजूचं पाथरी गाव शोधून काढायला राकेशला जरा शोधावंच लागलं. वनाभाऊने गेली तीस वर्षे ज्यातून पीक काढलं तो जमिनीचा तुकडा ह्या मॅपवर असणं शक्यच नव्हतं. तो सगळा भाग वनविभागाचाच दाखवलेला होता. खडी सेंटरच्या टेकडीजवळील सपाट भूभाग रोड होण्यापुर्वी बराच लांबरुंद होता. रस्त्यामुळे त्या भूभागाचा बराच भाग रोडखाली गेला होता आणि एक कोपरा पलीकडे गेला होता. राकेशने त्या सर्व भागाचे नीट निरिक्षण केले, विशेषत: डिफेन्सच्या टेस्टींग ग्राऊंडपासून तो भाग किती दूर असावा ह्याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न तो मॅपच्या स्केलवरून करत असताना, अहूजा त्याच्याजवळ आला, राकेश कोणत्या क्षेत्राचा अभ्यास करत आहे हे त्याच्या ताबडतोब लक्षात आलं. त्याचा चेहऱ्यावर संशयाचे भाव उमटले. मग त्यानं विचारलं, “मिस्टर राकेश, तुम्ही पोलीस डिपार्टमेंटशी संबंधित तर नाही ना?” त्याच्या आवाजात मघाचा मृदूपणा नव्हता.

“छे.. छे. आय हेट पोलीस डिपार्टमेंट. त्या डिपार्टमेंटपासून मी एक दोन कोस दूर ठेवतो स्वत:ला.” मग जरा थांबून अहुजाच्या मनातील शंकेचे त्यानं निरसन केले, “हे पाथरी गाव आहे ना? तेथे माझा मित्र काम करतो राजू.”

"अरे असं सांगा, माहीत आहे मला राजूभाई. मुलाकात हो गयी हमारी. उस वक्त टी. आय. एस. एस. कडून ह्या क्षेत्राचा सर्व्हे करायला काही विद्यार्थी आले होते, त्यात धीस यंग चॅप वॉज देअर. त्यानंतर चांगली नोकरी करायची सोडून हा तरुण सरळ आदिवासींत येऊन राहिला. तुम्ही त्याचे मित्र आहात का? या, आत घरात या. जरा कॉफी घ्या. मग तुम्हाला काही माहिती हवी असेल तर तीही देतो."

अहुजा घराच्या आतल्या बाजूला वळला. सोफ्याकडे इशारा करत त्यांना बसायला सांगून अहूजा एका प्रशस्त खुर्चीत विसावला. मग राकेशकडे वळत म्हणाला, "काय आहे, तेथे आमच्या सालोमनभाईची जमीन होती. ते जेव्हा इस्त्रायलला गेले तेव्हा ती विकायचा त्यांचा विचार होता. ते काम त्यांनी माझ्याकडेच सोपवलं होतं. पण दोन तीन वर्षे तेथे काढल्यावर त्यांनी भारतातच परतायचा निर्णय घेतला आणि मग त्यांचा ती जमीन विकण्याचा इरादाही बदलला. एक पत्र पाठवून त्यांनी मला ह्या जमिनीबाबत मी काहीही करू नये असं कळवलं आणि माझा त्यांचा संबंधच तुटला. मग पुढे तेथे ही दगडाची खाण सुरु केली त्यांनी कुणाशी तरी पार्टनरशिपमध्ये. ती बंदही पडली. आता तेथे काही तरी भूताखेताचे प्रकार होतात म्हणे, तेव्हा तो एक पोलीस इन्स्पेक्टर आहे दिघे. त्यानं उगाचच सतावलं मला दोन तीन वेळा

येऊन. मी त्याला सांगितलं समजावून, अरे बाबा त्या खाणीच्या मालकाला मी कित्येक वर्षात पाहिलेलंही नाही. माझ्याकडे कशाला येतोस तू. तरी चौकशा करायचा नसत्या."

"पण ती जमीन पारशाची आहे असं म्हणत होते तेथले गाववाले" राकेश म्हणाला.

"अहो, त्यांच्या दृष्टीने पारशी काय आणि ज्यू काय किंवा गुजराती बनिया काय?"

राकेशने हळूच बाजूला बसलेल्या क्षमाचा हात दाबून तिला गप राहण्याचा इशारा केला."सालोमनभाई ज्यू होते म्हणून इस्त्रायलला गेले होते का?"

"आता काय सांगायचं. मी त्यांना म्हटलं होतं, काका, आता तुमचं एवढं वय झालंय, तुम्हाला ना मुल ना बाळ. कुणीतरी दुरची भाची. कुठे आता ह्या वयात चालले आपलं घरदार, आपला देश सोडून परदेशात. पण म्हाताऱ्याचा एकच धोशा, आता ज्यूंना फादरलॅन्ड मिळाली म्हणून. आला म्हातारा परत इंडियात. अहो तिथे इंडियातल्या आणि आशियातल्या ज्यूजना विचारतो कोण? तेथे राज्य अमेरिकन आणि युरोपियन ज्यूंचेच."

"अजून जिवंत आहेत का ते?" राकेशने विचारलं.

“आहे का मेला म्हातारा काय माहीत? अहो वीस वर्षे त्याचे सगळे ह्या भागातले प्रॉपर्टीचे व्यवहार मी बघितले आणि म्हातारा परत आला, कुणाबरोबर तरी पार्टनरशिप करून खडी सेंटर सुरु केलं अन् तरी पत्ताही लागू दिला नाही मला.”

मग राकेशने तो विषय वाढविला नाही. ते जेव्हा बाहेर पडले, तेव्हा क्षमाने दोन आठवड्यात संपर्क साधून काही जागा बघण्याकरता येण्याचे आश्वासन दिले होते. लोणावळ्यातून बाहेर पडायला त्यांना संध्याकाळचे चार वाजत आले होते. कार बाहेर पडल्यावर क्षमाने राकेशला विचारले, “मिस्टर धनंजय, आता पुढचा कार्यक्रम काय?”

“धनंजय?” काही क्षण राकेश गोंधळला, मग हसंत म्हणाला, “पण धनंजयांचा मदतनीस छोटू होता, छोटी नव्हती. पण ठीक जमान्याप्रमाणे काही बदल व्हायलाच हवेत. आता कार्यक्रम असा की आपण परत एकदा पाथरीला जाणार आहोत. आणि वनाभाऊंची ती डोगंरावरील जमीन पाह्यला जाणार आहोत.”

“ए, हे काय काढलंस मध्येच. आपल्याला उद्या निघायचंय हं. संजीवकडे लवकर पोचलो तर जेवायला जायच्या आधी जरा फ्रेशतरी होता येईल मला.”

“तुला कपडे बदलून शाईन व्हायचं असेल. आपण जरी पाथरीला गेलो ना तरी तुला ती संधी मिळेल. डोन्ट वरी. पण कदाचित आपल्याला एखादा दिवस संजीवकडचा मुक्काम वाढवावा लागेल असं वाटतंय मला.”

“माझी फिरकी घेतोयस का? तुला काय वाटलं मी खुष होईन संजीवकडचा मुक्काम वाढला म्हणून?”

“तु खुष होशील का नाही मला माहीत नाही. पण मी तुझी फिरकी घेत नाहाये क्षमा. ती होलोग्राफीक इमेज तेथे कोण प्रॉजेक्ट करतो आणि त्यामागे काय हेतू आहे, ह्याचा शोध घेतल्याशिवाय आपल्याला चैन पडणार नाही हे मला माहीत आहे.”

“आपल्याला चैन पडणार नाही? तू केवळ तुझ्याबद्दल बोल राकेश. मला कशामुळे चैन पडेल हे तू ठरवायची काही गरज नाही.” ती फणकाऱ्याने म्हणाली.

राकेश काही क्षण तिच्या चेहऱ्याकडे रोखून पाहात राहिला, मग म्हणाला, “आय ॲम सॉरी. आय शूड नॉट टेक यु फॉर ग्रॅन्टेड. पण असं करता येईल. तुला जर त्या शेतात, त्या खाणीवर जायची इच्छा नसेल तर तू मला राजूकडे सोडून दे आणि तू जीप घेऊन संजीवकडे जा. राजू मला सोडून देईल पाइंजीच्या ढाब्यावर. ओके?”

क्षमा त्याच्याकडे वळली, जाणिवपूर्वक त्याच्या दंडाला बोटाने स्पर्श करीत म्हणाली, “रागावलास?”

“छे गं. रागवायचं काय त्यात? इटस् क्वाईट ऑल राईट. मला वाटलं होतं, त्या सालोमनच्या पाहुण्यांना जरा जवळून पाहता आलं तर कदाचित आपली त्या जखीणीचीही परत भेट होईल. पाहिजे तर तू असं कर, त्या पुलाशीच मला सोडून तू पुढे जा. मग रात्री आपण ठरवूया उद्या केव्हा निघायचे ते.”

“तुला काय वाटलं राकेश, यु कॅन गेट रीड ऑफ मी व्हेनएव्हर यू विश?”ती त्याच्याकडे वळत उच्च स्वरात म्हणाली. तिचा चेहरा चांगलाच लालेलाल झाला होत, “मी तुझ्याबरोबर येणार आहे. त्या भूताचा कर्ताकरविता धनी कोण आहे हे मलाही जाणून घ्यायचंय.”

राकेश एकदम हसतच सुटला. कसंबसं हसू आवरत म्हणाला, “आ.. दॅटस् लाईक अ रिअल लिबरेटेड वुमन.”मग क्षमाही त्याच्या हसण्यात सामील झाली.

ते जेंव्हा पाथरीकडे जाणाऱ्या एक्प्रेस हायवेवरील ओव्हर ब्रीजजवळ पोचले तेव्हा सहाच वाजत होते, पण आसमंतात अंधारून आले होते. अनपेक्षित अवेळी आलेल्या ढगांनी आकाश व्यापलेले होते. ते दोघे गाडीतून खाली उतरले. आकाशाकडे

पाहात राकेश म्हणाला, “हे ढग पाऊस पाडणारे तर नाहीत, पण त्यामुळे सूर्य लवकर क्षितिजाआड लुप्त झालाय. आपल्याला पाथरीपर्यंत जायला निदान तीस चाळीस मिनिटं तरी लागतील. आता ह्या अंधारात आपल्याला वनाभाऊचे शेत पाह्यचे आहे, हे म्हणणे कुणालाही पटणार नाही. म्हणजे मग राजूला बरंच काही सांगावं लागेल. काय करूया?”

“बघूया. ब्रिजतरी क्रॉस करूया, मग एखादा रस्ता दिसला जाताना त्या दिशेला तर जाऊया सरळ तिकडेच. मला वाटतं, खडीचं ते यंत्र ठेवलेला रॅम्प आहे ना, त्याच्याजवळच्या त्या खोल्यांतच ते लोक राहात असावेत.”

“ठीक आहे. आता इथपर्यंत आलो आहोत तर जरा पुढे तरी जाऊन येऊ या. अहूजाकडे आपला जास्तच वेळ गेला.” राकेश तक्रारीच्या सूरात म्हणाला.

“अरे, रिटायर्ड माणूस तो. बऱ्याच दिवसांनी कुणाशीतरी गप्पा मारायची संधी मिळाली त्याला. सोडायचीच तयारी नव्हती त्याची. मलाही अशा माणसांची दया येते रे”

“तसा तूझा स्वभाव दयाळूच म्हणा. कुणाला दुखावणं तुला जमत नाही. कुणाला नकार देणं जीवावर येते. पण त्यामुळे कुणाला स्पष्ट होकार देणंही कठीण होतं ना?”

तो काय म्हणतोय हे क्षमाच्या लक्षात आलं होतं, पण तिनं त्याकडे दुर्लक्ष करीत म्हटलं, “ती बघ, डाव्या बाजूला एक पाऊलवाट दिसतेय बघ. हीच पाऊलवाट पुढे टेकडीला वळसा घालून पाथरीकडे ही जात असणार. मला वाटतं आपण ह्याच वाटेनं आलो त्यादिवशी. इकडूनच परतलो होतो आपण.”

ते पाऊलवाटेनं चालू लागले. काही अंतरावर खरोखरच पाऊलवाटेचा एक फाटा उजव्या बाजूला वळून टेकडीच्या पलिकडच्या बाजूला जाताना दिसला. ते डाव्या बाजूच्या वाटेनं चालू लागले. ही पाऊलवाट टेकडीच्या कुशीत शिरली होती आणि परत तिच्यापासून दूर होत खाली चालली होती. ते खाली उतरायला लागले आणि दाटणारा अंधार झपाट्याने दाट होत गेला. भोवताली झुडपांची दाटीही वाढली होती. पायाखालची जमीन दिसत नव्हती.

अंधारात काही पावलं गेल्यावर ती म्हणाली, “मला तर वाटतंय की आपण खरोखरच वाट चुकणार आहोत ह्या अंधारात.” आणि पुढे सरकून तिनं त्याचा हात हातांत घेतला.

“वाट चुकण्याचं सोड, पण ठेच लागून कुठल्यातरी खड्यात कोसळलो नाही म्हणजे मिळवली. तू जरी अंधाराला घाबरत असशील तरी एवढी चिकटून नको चालूस. जरा दुरूनच चल.

म्हणजे दोघंही एकाच वेळी खड्यात कोसळणार नाही.” त्याचं बोलणं ऐकून तिला हसूच आलं.

“हसना मत”तो खेकसल्यासारखा गुरगुरला आणि ती गप झाली. ते दोघं चाचपडत पाऊलवाटेनें पुढे सरकत राहिले.

“आता जरी येथल्या लोकांनी आपल्याला पाहिलं तरी आपण वाट चुकून इकडे आलोत ह्यावर त्यांचा निश्चितच विश्वास बसेल.”तो म्हणाला.

ती त्याला काहीतरी उत्तर देणार होती पण त्याचवेळी कुणीतरी बोलत असल्याचा अस्पष्ट आवाज ऐकून दोघंही एकाएकी थबकले. तिच्या हाताच्या वाढलेल्या पकडीने तिनेही तो आवाज ऐकला आहे हे त्याच्या लक्षात आलं. कित्येक क्षण ते स्तब्ध उभे राहिले, भोवतलच्या हालचालींचा, आवाजांचा कानोसा घेत. बराच वेळ ते दोघे जागीच खिळल्यासारखे उभे राहिले. पण काही वेळातच राकेशची खात्री झाली, हा आवाज रॅम्पच्या बाजूने येतोय आणि बोलणारे कुठेतरी थांबलेले होते, एकाच जागी थबकून बोलत आहेत. निदान बोलत बोलत ते लोक त्यांच्या दिशेने येत नव्हते हे तरी निश्चित होते. राकेशने क्षमाला हातानेच इशारा करून आवाजाच्या दिशेने हळूहळू पुढे सरकायला सुरुवात केली. हळूहळू त्यांच्या नजरेसमोर उभी राहिलेली, पलिकडील एक्प्रेस हायवेच्या

दिव्यांच्या उजेडाच्या पार्श्वभूमीवरील त्या रॅम्पची छायाकृती विस्तारत होती. ते अत्यंत सावधपणे आणि सावकाश पुढे सरकत होते. कारण हायवेवरून रॅम्पची ही बाजू त्यांना कधीच बघता आली नव्हती. त्यामुळे ह्या बाजूला, जमीनीवर खड्डेखुड्डे असण्याची, चर खोदला असण्याची, काहीतरी बांधकाम असण्याची शक्यता होती. एकच बाब जरा लाभदायक झाली होती, की एक्स्प्रेस हायवेच्या जवळ आल्यामुळे आकाशातील परावर्तीत प्रकाशामुळे त्या अंधारातही त्यांना वाटेतील वस्तु दिसत होत्या. रोडवरून धावणाऱ्या वहानांची संख्या संध्याकाळची वेळ असल्याने बरीच वाढलेली असावी, कारण वहानांचा आवाज चांगलाच वाढलेला होता. त्यामुळे त्यांच्या हालचालीचा आवाजही ह्या आवाजात क्लेमोफ्लॅग होईल असं राकेशला वाटत होतं. रॅम्पच्या जवळ पोचल्यावर राकेशच्या लक्षात आलं की, एकाबाजूला वरवर जाणारी एक सलग मजबूत दगडी भिंतच त्याच्यासमोर उभी होती. बहुधा येथे असलेल्या नैसर्गिक टेकडीच्या आधारानेच हा रॅम्प उभा केला गेला असावा. रॅम्पच्या भिंतीजवळ पोचल्यावर भिंतीला पाठ टेकून ते दोघे काही काळ निश्चल उभे राहिले. ते ज्या रस्त्याने आले होते ते क्षेत्र आणि समोरील जागोजागी उध्वस्त केलेली टेकडी राकेशने नीट न्याहाळली. पण समोर सर्व निस्तब्ध, निश्चल होते. नीट कानोसा

घेतल्यावर त्याच्या लक्षात आलं बोलण्याचा आवाज आतल्या आणि रॅम्पच्या उजव्या उंच बाजूच्या दिशेने येत होता. सावधपणे त्याने भिंतीला कान लावून कानोसा घेत पुढे सरकायला सुरुवात केली. आपल्या हाव्या हाताने त्यानं क्षमाचा हात हलकेच धरून ठेवला होता. बोलणारे दोघंच असावेत, आणि ते दोघंही इंग्लिशमध्ये बोलत असले तरी, त्यांची उच्चारण पद्धती वेगवेगळी होती. त्यातील एक भारतीय असावा असं जाणवत होतं. अगदी हळूहळू अत्यंत सावधानतेने दोघं पुढे सरकत राहिले. काही काही पावलं चालल्यावर जेव्हा आतील दोघांचं बोलणं अगदी स्पष्ट ऐकू येऊ लागले तेव्हा ते दोघंही थांबले.

“याकोव्ह, आय विल हॅव टू रिपोर्ट टू द नेट, आय ॲम सॉरी बट दिज न्यू प्रॉब्लेम्स आर द रिझल्ट ऑफ द मेस यू कॉज्ड बाय् युवर होलोग्राफीक घोस्टस.”

“यु कान्ट ब्लेम मी. मुळातच माझ्यासारख्या शास्त्रज्ञाची ह्या प्रॉजेक्टकरता पोस्टींग करणं हेच चूक होतं. माझ्यासारखा टॅलेन्टेड सायन्टीस्ट दुसऱ्याच्या प्रयोगांवर रखवाली करण्यात वेळ आणि शक्ती घालवतो हे आपल्या देशाचंच नुकसान आहे. मी त्या

चुकीची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केलाय ह्या ॲप्लाईड होलोग्राफीक्सच्या नव्या उपयोगातून.''

''पण त्यामुळे लोकांचे आणि पोलीसांचेही आपल्याकडे लक्ष वेधले गेले आहे, हे तरी तुला मान्य आहे की नाही? आता पंचायत अशी आहे की, ही तुझी भूतं एकाएकी गायब झाली तर आपल्यावरील संशय अधिकच वाढण्याची शक्यता आहे.''

''संशय अधिकच वाढण्याची शक्यता म्हणजे काय? आपल्याबद्दल आधीच संशय आहे असं कधी तू काही बोललेला नाहीयेस. हे सर्व तू आज बोलतोयसं. त्यावेळी तुच म्हणाला होतास, की हे अंधश्रद्ध इंडियन्स ह्या स्पॉटला नजर उचलून बघायलाही घाबरतील. आणि आता आपला निर्णय झालाय ना हळूहळू ह्या भूतांना त्या स्पॉटपासून दूर नेत हा प्रकार बंदच करायचा.''

''बरोबर आहे आणि तेच मी नेटला कळवणार आहे.''

''प्लीज माय फ्रेंड. आपण पाहिजे तर हा भूताचा प्रकार ताबडतोब थांबवूया. उद्याच मी सर्व प्रोजेक्शन कॅमेरे क़ाढून घेतो. पण हे नेटला कळवले नाहीस तर बरं होईल. मला इंडियन इ-बॉम्बजच्या प्रयोगांवर लक्ष ठेवण्याचे काम आवडत नाही हे खरं आहे. पण त्यामुळे मला येथे अप्लाईड होलोग्राफीवर मोकळेपणी

प्रयोग करता येतात, व्यक्ती म्हणून संशोधन करता येते, मला रिकॉल केले तर हे सर्व मध्येच थांबेल. ह्यात माझं वैयक्तिक आणि देशाचंही नुकसान आहे मित्रा. प्लीज. थिंक ओव्हर इट. निदान काहीवेळ तरी थांब.'' याकोव्हचा आवाज आता काकुळतीला आवाज आता चांगलाच तीव्र झाला होता, आणि स्पष्ट ऐकू येत होता.

मग कुणीतरी उभं राहिल्याचा, खुर्ची सरकवल्याचा, आणि टेबलावर ग्लास आदळल्याचा आवाज ऐकू आला.''ओके. उद्याच्या उद्या ती भूतावळ नाहिशी झाली पाहिजे. लेट अस मुव्ह नाऊ. तू आपली ट्रान्समिटर इक्विपमेंट चेक करून घे. अजून ४० मिनिटं आहेत आपल्याला मला रिपोर्टचा काही भाग वगळावा लागेल. आय शॅल हॅव टू मेक हरी नाऊ.''

''माझा एक स्वतंत्र्य टेपीकल रिपोर्टही पाठवावा लागेल तुला आज.''

''याकोव्ह, हा तुझा मेसेज खरोखरच महत्त्वाचा आहे का?''

''महत्त्वाचा म्हणजे? एक महत्त्वाचं यश मिळवलंय मी काल दुपारी. तू विसरलेला दिसतोयस. परत एकदा त्यांनी इ-बॉम्ब इग्नाईट केला होता, पण आपल्या सेन्सॉर्सनी आधीच दखल घेतल्याने, बरोबर त्याच दिशेने आपण डिरेक्टेड बीम सोडून त्यांच्या वेव्हची दिशाच बदलण्यात यशस्वी झालो. खरं तर आपलं यश

सेलेब्रेट करण्याची वेळ आहे ही. आणि तू माझ्याबद्दल तक्रार करायला निघाला आहेस.”

“ओके.. ओके. तुझ्या त्या कामाबद्दल माझी काहीच तक्रार नाही याकोव्ह. तुझा रिपोर्ट तयार करून दे. तो रिपोर्ट पाठवला की, आपण खास बाटली फोडून आपण सेलिब्रेट करूया. हॅपी?” मग दोघांच्या जोरजोरात हसण्याचा आवाज ऐकू आला.

इंडियन उच्चाराच्या माणसाचे बोलणं थांबले. खुर्च्या सरकवण्याचा आवाज ऐकू आल्याबरोबरच राकेशने भितींला चिकडूनच मागे सरकायला सुरुवात केली होती. पुढच्या बाजूचा कुठला तरी दरवाजा उघडला गेला असावा. कारण रॅम्पच्या टोकाला जमिनीवर प्रकाशाची एक शलाका चमकून गेली. राकेशने मोजून तेरा पावले मागे टाकली आणि त्याने रॅम्पपासून टेकडीच्या दिशेने जायला सुरुवात केली. शक्यतोवर पावले न वाजवता, पण, जमेल तेवढ्या वेगाने ते टेकडीकडे निघाले, मध्येच एक बिंदुला आपल्या पायाखाली पाऊलवाट आल्याचे त्याला जाणवले, मग त्यानं आपली गती अधिकच वाढवली. पाऊलवाट वर चढत गेली आणि काही क्षणातच तिने उजवीकडे वळण घेतले. ते जेव्हा रस्त्यावर पोचले आणि क्षमाने जेव्हा दीर्घ निश्वास सोडला तेव्हा

तिच्या लक्षात आलं, नकळत तिने आपला श्वास बराच वेळापासून रोखून धरला होता.

ओव्हर ब्रिजकडे जाणाऱ्या रस्त्यावरून त्यांची कार जेव्हा हायवेवरील मुख्य रस्त्याला लागली तेव्हा तिने मोबाईलवर संजीवशी संपर्क साधला, ‘‘सॉरी संजीव. जरा उशीर झालाय. पण आम्ही वीस एक मिनिटांत पाइजींच्या ढाब्यावर पोचू शकतो. सांग, तेथे येऊ की, तुझ्या घरी?’’

‘‘उशीर झालाय हे खरं आहे. पण तुम्ही येथेच आला तर बरं होईल क्षमा. म्हणजे तुमच्या कारमध्येही आपले काही मित्र सामावले जाऊ शकतील.’’

‘‘ओके. मग तर चांगलेच. मलाही जरा फ्रेश होता येईल, कपडे बदलता येतील. सी यू देन. बाय् संजीव.’’

मोबाईल पर्समध्ये टाकून ती त्याच्याकडे वळली. राकेशच्या दंडाला स्पर्श करीत म्हणाली, ‘‘तुझा अंदाज शंभर टक्के खरा ठरलाय असं दिसतंय. याकोव्ह आता त्या होलोग्राफीक प्रतिमांचे प्रोजेक्शन बंद करेल म्हणजे ही भूतं नाहीशीच झाली म्हण की. आपण उद्या येथून निघू शकतो. लागेल तर फोन करून इन्स्पेक्टर दिघ्यांना कळव तू आपल्या मंत्राने भूताना कायमचेच पळवल्याबद्दल.’’

राकेश ताबडतोब काही प्रतिसाद दिला नाही. मग गंभीर आवाजात म्हणला, “याकोव्ह इ-बॉब्जवर चाललेल्या संशोधनविषयी काय बोलत होता ते ऐकलेस ना? मला वाटतं, संजीव जे प्रयोग करत आहे त्याच संबंधात तो बोलत होता. मला शंका आहे क्षमा, नकळत आपण एका इंटरनॅशनल स्पाईंग रिंगपाशी पोचलेलो आहोत. आता पुढची पावले कशी टाकायची ह्याचा नीट विचार केला पाहिजे. मला वाटतं, मी आता गेल्या-बरोबर संधी मिळाली तर थोडसं संजीवबरोबर बोलून घेतो, आणि आपल्याला त्याच्या सहकाऱ्यांबरोबर आणि अधिकाऱ्यांबरोबर बोलायची संधी द्यावी अशी विनंती करूया. हे सगळं प्रकरण योग्य ऍथॉरिटीच्या हाती सोपवलं की मग पुढे जायला मोकळे होऊ असं मला वाटतं. संजीव आपल्यावर म्हणजे माझ्यावर किती प्रमाणात विश्वास टाकतो ते बघायला पाहिजे. म्हणजे त्यानं ह्या नाजूक बाबतीत माझ्यावर विश्वास टाकला नाही तर त्यात त्याची चूक नसेल हे खरं आहे. पण त्यानं काही करायचं नाकारलं तर मला त्याच्या सुपरिअर्सना अपील करावं लागेल. पण मग.. “

बराच वेळ राकेश काहीच बोलला नाही. क्षमाही आपल्याच विचारात राहिली. मग त्याच्याकडे सरकत त्याला चिकटून बसत ती म्हणाली, “राकेश, माझी खात्री आहे, संजीवचा तुझ्यावर

विश्वास आहे आणि ह्यापुढे योग्य दिशेनं जाण्याकरता तो आपल्याला निश्चितच योग्य सल्ला देईल.”

“मलाही तसा विश्वास आहे क्षमा.” मग तो जरासा हसत म्हणाला, “आणि अखेर संजीव कुणाचा दोस्त आहे. क्षमाची निवड चूकीची असूच कशी शकेल?”

क्षमाही हसली, मग त्याच्या दंडाला बोटांचा स्पर्श करीत म्हणाली, “संजीव माझा चांगला घनीष्ट मित्र आहे. पण मी त्याची निवड नाही केलेली अद्यापपावेतो.”

स्टिइरींग व्हीलवरील आपली नजर बाजूला करून राकेशने आपल्या दंडांवर रोवलेल्या क्षमाच्या बोटांकडे रोखून पाहिले, आणि त्यानं कारची गती वाढवली. अगदी मंद आवाजात तो शीळ घालत होता, शीळेवर गाण्याची धून म्हणत होता, मै जिंदगीका साथ निभाता चला गया, हर फिकरको धूवेंमे उडाता...

रात्री झोपायला मध्यरात्र होऊन गेली होती. तरीही राकेशला पहाटेच जाग आली असावी. कारण क्षमा जागी होऊन खाली आली तेव्हा तो चहाचा मोठा मग्गा समोर घेऊन बाहेरच्या व्हरांड्यातील प्रशस्त खुर्चीवर बसला होता. त्याच्या दोन्ही बाजूला

तशाच दोन खुर्च्या होत्या. त्यातील एका खुर्चीकडे इशारा करीत तो म्हणाला, "बैस, चहा येईलच काही क्षणात."

खुर्चीवर बसत ती म्हणाली, " प्राथमिक बैठकीची तयारी करून ठेवलेली दिसतेय तू?"

"हं, तसं म्हणायला हरकत नाही. संध्याकाळी तुझं फ्रेश होणं चाललं होतं, तेव्हा माझं संजीवशी बोलणं झालं थोडं. मी अगदी थोडक्यात आपण काय ऐकलं ते त्याला सांगितलं. तेव्हाच त्यानं त्याच्या सुपीरिअर्सशी बोलण्याची पहाटेच वेळ मागून घेतली. त्यांनी काल तो इ-बॉम्ब इग्नाईट करण्याचा प्रयत्न केला आणि तो फसला ही बातमी मी त्याला सांगितल्यावर तर त्याला खात्री झाली असणार. तेथून तो परतला की तो आपल्याला इथे काय चाललंय ह्याचं ब्रिफींग करेल. मग मला वाटतं, आपल्याला त्याच्या बॉसकडे जावं लागेल."

चहाचे दोन घोट घेऊन श्रमा म्हणाली, "पण काल पार्टी छानच झाली नाही? काही वेळा मला वाटतं राकेश, हे मिलिटरीवाल्यांना पिणं कसं एन्जॉय करायचं हे चांगलं माहित असतं. इतका वेळ आपण बसलो होतो, पण अगदी चवीचवीने सावकाश पीत होते सर्व."

“आपण असं म्हणूया क्षमा की काल आलेले संजीवचे सर्व मित्र चांगले मिलिटरीवाले होते. त्यातून प्रकाशची मैत्रिणही आली होती, म्हणजे तुम्ही दोन स्त्रिया होतात. म्हणजे स्त्रिया सोबत असताना किती प्रमाणात प्यायचं हे मिलिटरीवाल्यांना चांगलं समजत असाही त्याचा अर्थ होतो.”

“माझ्या विधानाला तू सरळ कधी दुजोरा दिलायसं का? काहीवेळा तुझं हे शिष्ट बोलणं खरोखर वैताग आणतं.”ती संतापून म्हणाली.

तो काही क्षण तिच्या तापलेल्या चेहऱ्याकडे पाहात राहिला, मग म्हणाला, “तू रागवलीस की सुंदर दिसत्येस हे सत्य असलं तरी तसं काहीतरी ना. सि. फडकेच्या हिरोप्रमाणे म्हणून मी तुझा राग भलतीच कडे डायव्हर्ट करणार नाही. होत काय क्षमा, अनेक वेळा आपण जे सहज बोलतो ना ते छुप्या अर्थाने लोडेड असतं. मग मला ते स्पष्ट केल्याशिवाय राहावत नाही. आता बघ, तू जे विधान केलेस, त्यात सर्व मिलिटरीवाले जणू सारख्याच स्वभावाचे असतात, हे एक गृहित होतं आणि ह्या चार लोकांवरून तू एक सार्वत्रिकरण केलं होतंस, आणि हा प्रकार डेंजरस असतो. आम्ही पुरुष सर्व स्त्रीयांबाबत असेच बोलतो, आपण कनिष्ट जातींबद्दल अशीच बेछूट विधानं करत असतो, ज्यांनी एकही मुस्लीम जवळून

पाहिलेला नाही, किंवा एखादाच मुस्लीम त्याच्या माहितीचा असतो, त्याच्या आधारावर सर्रास सर्व मुसलमान असेच असतात असे ठामपणे सांगत असतो. मी सर्वांचेच असं बेजबाबदार बोलणं सुधारण्याचा प्रयत्न करत नाही क्षमा. पण ज्यांना मी माझे जवळचे आपले समजतो, ज्यांना बुद्धी आहे असं मला माहिती आहे त्यांच्या बोलण्यावर मात्र टिप्पणी केल्याशिवाय राहवत नाही."

क्षमा काही क्षण त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहात राहिली, जणू काय ती प्रथमच त्याचा चेहरा पाहात होती. मग पुढे वाकून त्याच्या दंडावर आपली बोटे रोवत ती म्हणाली, "राकेश, आयदर यु आर रिअल क्लेव्हर, ऑर यू आर अ रिअल ऑनेस्ट पर्सन." आणि ताबडतोब त्याच्या दंडावरून काढलेला आपल्या हाताचा पंजा त्याच्या चेहऱ्यासमोर फैलावत ती म्हणाली, "चूप. चूप. ह्यावर परत तुझी काही मल्लीनाथी नकोय."

त्याची काही प्रतिक्रिया होण्याच्या आतच दाराकडून संजीवचा आवाज आला, "ही वोन्ट बी बोथ ॲट द सेम टाईम क्षमा, ऑनेस्ट ॲंड क्लेव्हर"

संजीव हंसत हंसत पुढे आला, आणि खुर्चीवर बसत आतमध्ये पाहात ओरडला, "अब मेरे लिये चाय नही लाना यार. डायरेक्ट नाश्ताही लाव, वीस पच्चीस मिनिटोके बाद."

काही क्षणानंतर संजीवने सरळ विषयालाच हात घातला. "राकेश, आज सकाळीच मी आमच्या बॉसला भेटायला गेलो होतो. तेथे गेल्यावर माझ्या लक्षात आलं की, आमच्या बॉसबरोबर रेजिमेंटचा सेक्युरिटीचा अधिकारी तर होताच, पण मिलिटरी इटेलिजन्सचा एक वरिष्ठ अधिकारीही हजर होता. मला फार डिटेल्स माहीत नाहीत. आणि मला माहीत होण्याची शक्यताही नाही. पण तुम्ही नकळत मधाच्या पोळयातच काठी खुपसलीय असं दिसतंय. मी आता अगदी फ्रॅंकली बोलणार आहे. राकेश, परवा मी तुझ्याशी काहीसा मॅनरलेसली वागलो, सॉरी चॅप. पण खरोखरच माझ्या मनात तुझ्या विषयी किंन्तु निर्माण झाला होता आणि तुझा खुलासा प्रामाणिक होता तरी, मलाही क्षमासारखीच शंका वाटत होती, की हा प्रामाणिकपणा आहे की हुशारी?"

तो क्षणभर थांबला आणि राकेश मोकळेपणी हसू लागला. मग हसू आवरत त्यानं हातानेच संजीवला पुढे बोलण्याचा इशारा केला..

"तुझा अंदाज बरोबर होता. आम्ही येथे गेल्या काही वर्षापासून इ-बॉम्बच्या चाचण्या घेत आहोत. क्षमा, हे इ-बॉम्ब काय प्रकरण आहे अगदी थोडक्यात सांगतो. इलेक्ट्रीक कंरटमुळे एक इलेक्ट्रीक मॅग्नेटीक फिल्ड निर्माण होत असतें. जितका

विद्युतप्रवाह हाय पॉवरचा असेल, हे फिल्ड अधिक ताकदीचे, विस्ताराचे असते. ह्या विद्युत फिल्डमध्ये जर स्फोट मालिका घडवून आणली तर ह्या इलेक्ट्रो मॅग्नेटीक फिल्डतून अशा इलेक्ट्रो मॅग्नेटीक लाटाच प्रसारीत होतात की ज्या प्रचंड वेगाने प्रवास करतात, आणि ह्या लाटांच्या तडाख्यात आलेली सर्व इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक साधने शॉर्ट होऊन कुचकामी होतात. अगदी घरातील बल्ब पासून इलेक्ट्रीसिटी बोर्डाच्या पॉवर स्टेशनपर्यंत आणि फोनपासून टीव्ही सेंटरपर्यन्त. थोडक्यात काही स्ट्रे अपघात सोडले तर प्राणहत्त्या न होता, सर्व सामाजिक व्यवहार बंद पाडण्याची ताकद ह्या बॉम्बमध्ये असते. इथे संशोधन दोन दिशांनी होतंय. एकतर ह्या लाटांची शक्ती सुनामी लाटेसारखी प्रचंड करणे आणि तिला विशिष्ट दिशेनं, विशिष्ट टारगेटवर पाठवणे आणि बचावासाठी शत्रूकडून येणाऱ्या इएम लाटेचा परिणाम कमी करण्यासाठी अशा लाटांच्या निर्मितीस्थानाशीच त्यांच्या निर्मिती प्रक्रियेला खीळ घालणे. मी जास्त टेकनिकल डिटेल्समध्ये जात नाही, कदाचित आपल्या ऑफिशियल मिटींगमध्ये जास्त खोलात चर्चा होईल. आता पुढचा मुद्दा हा तुम्ही काल जे काय ऐकलं त्याच्याशी संबंधित आहे. गेल्या काही महिन्यांपासून आमच्या लक्षात आलंय की, आमच्या ह्या प्रयोगांमध्ये कुणीतरी ढवळाढवळ करतंय. आम्ही विशिष्ट दिशेनं पाठवलेली इ. एम.

लाटांच्या बीमला, शलाकेला दुसऱ्या इ एम. बीमने धक्का देऊन तिला दिशाभ्रष्ट केले जाते. प्रथम आम्हाला आमच्या यंत्रणेमध्येच काही दोष आहेत असं वाटलं. त्या दृष्टीने आम्ही शोध घेतला, प्रयोग केले. पण तरीही हे गूढ तसेच राहिले आणि मग आमच्या यंत्रणेतच काही दोष आहे का? ह्या दृष्टिने मुळातून ही यंत्रणा तपासून पाहिली गेली. कालांतराने म्हणजे नुकतेच चार एक महिन्याआधी लक्षात आलं की, केवळ येथेच हा असा अनुभव येत आहे. इतर ठिकाणी ह्या यंत्रणेत काही दोष आढळला नाही. मग इथे ह्या परिसरात ह्या किरणशलाकेची दिशा बदलू शकतील अशा काही प्रक्रिया वा यंत्रणा आहेत का ह्याचा शोध सुरू केला.''

बाबर्जी नाश्त्याच्या प्लेटस् घेऊन आला म्हणून संजीव मध्येच थांबला. राकेश मनाशी विचार करत होता. असा लाटा-प्रवाह निर्माण करणाऱ्या यंत्रणेलाच अडथळा करण्याच्या तंत्राचा उपयोग अखेर मर्यादीतच होणार. कारण असं काही होतंय हे लक्षात यायला वेळ लागणार नाही. आणि मग त्यावर उपाययोजनाही केली जाऊ शकेल. परंतु निर्मिती प्रक्रियेत ढवळाढवळ न करता टारगेटवरून तिला ढळवणे म्हणजे रायफलमधून गोळी उडवणाऱ्या नेमबाजाच्या रायफलला समजणार नाही अशा प्रकारे धक्का देण्यासारखंच आहे. आपला नेम का चुकतोय हे त्याच्या लक्षात येणं सहजशक्य होणार नाही अशा स्थितीत. पण मुख्य धोका आहे

ही गोळी भलत्याच ठिकाणी हीट होण्याची. आणि मुळात एवढ्या प्रचंड शक्तीच्या बीम तयार करणाऱ्या यंत्रणेचा शोध घेणे फार अवघड नसणार. निसर्गामध्ये अशा ताकदीच्या किरण शलाका क्वचितच निर्माण होत असणार.

"हां, राकेश. शुरू हो जाये. आपल्याला नास्ता करून अर्ध्या तासात निघावं लागेल."

राकेशने टेबलावर बघितले, बाबर्जी तिघांसमोर डिशेस ठेवून आत गेला होता. राकेशने पहिला घास घेतला मग संजीवकडे पहात तो म्हणाला, "पण ह्याचबरोबर दिशा बदल झालेल्या किरण शलाकेमुळे काही अपघातही झाले असणार?"

संजीव राकेशकडे पाहून कौतुकमिश्र हसू हसत म्हणाला, "बिलकूल सही. पहिला अपघात मजेदारच झाला. पुणे मुंबई रोडवरील तळेगाव फाट्याकडून नासिक रस्त्याकडे जाणाऱ्या लागोपाठ जाणाऱ्या विशिष्ट क्षेत्रातील वीस एक वाहानांची इंजीन्स एकाएकी बंद पडली. गाड्या जागीच उभ्या झाल्या. बरं ही सर्व वहानं एकाच प्रकारची नव्हती. काही बसेस, काही ट्रक्स तर काही कार्सही होत्या. हे प्रकरण कदाचित कुणाच्या लक्षातही आलं नसतं, कारण ही वीस वहानं निदान दहा मैलाच्या अंतरात विखुरलेली होती. पण कार्स मालकांनी विमा कंपनीकडे नुकसान भरपाई क्लेम

केली. त्या दहा मैलात तीन वेगवेगळ्या कार्सचं इंजीन फेल. कार्स वेल मेन्टेन्ड होत्या. विमा कंपनीच्या कुणातरी हुशार इंजिनियरला शंका आली त्यानं झालेली हकिकत डिफेन्सला कळवली. पण सुदैवाने तेवढ्यावरच भागले. येथे जवळच टाटाचा विद्युत प्रॉजेक्ट आहे, जवळच आय. टी. सिटी आहे. काहीही होऊ शकलं असतं, होऊ शकेल. नशिबाने आतापर्यंत तसं काही घडलेलं नाही. कसा आणि कुठे शोध घ्यावा हे समजत नव्हतं. आता असं दिसतं की तुम्ही हवा असलेला ब्रेक मिळवून दिलाय. पण आपण त्याविषयावर नंतर बोलूया.'' आतून गरमागरम पराठे घेऊन येणाऱ्या बाबर्जीच्या दिशेने कानोसा घेत संजीव म्हणाला.

संजीव खुषीत होता हे स्पष्टच दिसत होतं. त्यांने मग आदल्या दिवशीच्या पार्टीविषयी चर्चा सुरू केली. ''क्षमा, तो सरदारजी, तुझ्यावर फारच खुष दिसतोय. आत्तापर्यंत आमची कधी अशी बडदास्त ठेवली गेली नव्हती.''

''खरं आहे''त्याच्या सूरात सूर मिळवित राकेश म्हणाला, ''संजीवभय्या, आपण मागच्या वेळी गेलो तेव्हाही अशी मेहमानगी नव्हती झाली. क्षमा, सरदारजी इतका खूष आहे तुझ्यावर. जपून हं''

संजीव जोरजोरात हसत सुटला. क्षमानेही किंचित साथ दिली त्यांच्या हसण्याला. मग राकेशकडे वळून ती म्हणाली, ''स्वत:ला

पुरोगामी विचारांचे म्हणवणारे, स्त्री पुरुष समानतेच्या गप्पा मारणाऱ्या पुरुषांचे अंतरंग काही वेगळे नसते. वरचा चमकता रंग थोडासा खरवडला की, आत तोच काळा रंग.''

संजीवचं हसणं विरलं, त्याच्या भुवया उंचावल्या गेल्या. मग त्याचं राकेशकडे लक्ष गेलं, खांदे उडवत तो म्हणाला, '' राकेश, बंदुककी नोक तुम्हारे तरफ है. मै तो भाई खुदको कभी पुरोगामी कहलवाता नही, ना मै स्त्री पुरुष समानताका मतलब समझता हूं.''

राकेशने संजीवच्या बोलण्यावर अनुमतीदर्शक डोकं हलवलं, मग शेवटचा घास घेऊन उठण्याची तयारी करत म्हणाला, ''शायद क्षमा सच कह रही है.'' त्याचा आवाज गंभीर होता.

ठीक पावणेदहाला संजीवच्या बंगल्यासमोर पुढे मागे मिलिटरी पोलीसांच्या गाड्या असलेल्या दोन कार्स येऊन उभ्या झाल्या. कार्सकडे बघत संजीव राकेशला म्हणाला, ''यु आर बिइर्ग ट्रिटेड ऍज अ व्हेरी व्हेरी इंपॉर्टंट पर्सन राकेश. मध्यंतरी महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी येथे ऑफिशियल व्हिजीट दिली होती, त्यांना देखील केवळ व्हिआयपी ट्रिटमेंट् देण्यात आली होती.''

त्यांच्या गाड्या जेव्हा मिटींग अव्हेन्यूशी पोचल्या तेव्हा तेथे असलेला मिलीटरी पोलीसांचा ताफा आणि अधिकाऱ्यांची संख्या

पाहून राकेशवर जरा प्रेशरच आलं. त्यानं संजीवला जरा बाजूला घेऊन विचारले, "येथे काहीतरी जोरदारच होणार असं दिसतंय."

कॅप्टन संजीव म्हणाला, "मला सुद्धा एवढी कल्पना नव्हती. पण ही आजुबाजूची हायर ऑफिसर्सची गर्दी अनपेक्षितच आहे. एच. क्यू. वरून, आणि इ-बॉम्बवर जेथे जेथे संशोधन, प्रयोग चालले होते, तेथील अधिकारी येथे आलेले दिसताहेत. बहुधा एकूणच ह्या सर्व प्रॉजेक्टचं ऍनालिसिस होणार असं दिसतंय. आणि अजून ऑफिशियल बातमी कळलेली नाही मला. पण पहाटेच दिल्लीवरून आलेल्या अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली आहे. याकोव्ह आणि त्याचा जोडीदाराला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून बरीच माहिती मिळालेली आहे. त्या पार्श्वभूमीवर काय काय इन्फॉर्मेशन लिक झालीय, इतर ठिकाणीही कुणी स्पाइर्ग करत होतं का? ह्याची माहिती मिळविण्यात येईल. त्याकरताच मला वाटतं एवढे अधिकारी हजर आहेत. पण मला वाटत नाही, तुला ह्यात इन्व्हॉल्व्ह करतील. तशी गरजही नाहीये."

संजीवचा अंदाज अगदी बरोबर होता. दहाला चालू झालेली मिटींग वीस मिनिटात ब्रेक देण्यात आला. एरिया कमांडरने सर्वांचं कॉन्फरन्ससाठी स्वागत केलं. सर्व दिवस कशाप्रकारे पुढचं काम

चालेल ह्याची त्यानं माहिती दिली. त्यानंतर कमांडरसाहेब राकेश आणि क्षमा ह्यांच्याकडे निर्देश करून म्हणाले की, “आज आपल्या ह्या कॉन्फरन्सच्या इनॅग्यूरेशनच्या कार्यक्रमाला निमंत्रित केलेल्या खास आंमत्रितांची आपल्याला ओळख करून देतो. काल रात्री आपल्या येथे चाललेल्या इ-बॉम्ब अभ्यासाची माहिती मिळवण्यासाठी स्पाइर्ग करणाऱ्या रिंगला रंगेहाथ पकडण्यात आलं आहे. पकडलेल्या दोघांची ए. एच. क्यू. ला तपासणी चालू आहे. त्यावर यथावकाश कारवाई होईलच. परंतु ही स्पाय रिंग शोधण्यात अत्यंत महत्त्वाची कामगिरी ह्या दोन सिव्हिलियन्स व्यक्तींनी केली आहे. त्यांना त्याबाबतीत मार्गदर्शन करण्याचे अत्यंत नाजूक काम कॅप्टन संजीव शर्मांनी जबाबदारीने केले आहे. ह्या यशाबद्दल मी त्याचा खास निर्देश येथे करतो. ह्यानंतर प्रत्यक्ष कॉन्फरन्सला सुरुवात होण्यापूर्वी मी ह्या कॉन्फरन्सला आलेल्या सर्वांनी ह्या सिव्हिलीयन्स पाहुण्यांबरोबर चहापानाच्या कार्यक्रमात सामील व्हावं. येथून आपण सर्व ऑफिसर्स मेसच्या हॉलमध्ये जाणार आहोत.”

सर्व अधिकारी हॉलकडे जात असताना एरीया कमांडरने दोघांना आपल्याबरोबर ऑफिसर मेसमध्ये जेवण घेण्याकरता संध्याकाळचे आमंत्रण दिले होते. पण राकेशने ते आमंत्रण दुपारी आपल्याला निघायला पाहिजे असं सांगून नम्रतापूर्वक नाकारले.

हॉलमध्ये चहापानाबरोबर उंची वाईन्स सर्वांना सर्व्ह करण्यात आली होती.

आपल्या हातातील ग्लास उंचावून कमांडर साहेबांनी आपला ग्लास फेंदारलेल्या रंगवलेल्या लालकाळ्या मिशांजवळ नेऊन परत बाजूला घेऊन वर नेला, आणि ते म्हणाले, "मी आज फार खुष आहे. गेल्या काही महिन्यांपासून आम्हाला त्रस्त करणारी, आणि आमच्या युनिटची वर्षानुवर्षाची इज्जत खतरेमे डालनेवाली समस्याका हल राकेशसाबने.."क्षणभर कमाडंरसाहेब अडखळले, मग अधिकच नाट्यमय ढंगात त्यांनी वाक्य पुरं केलं, "और मिस क्षमा मॅडमने निकाला है. ये न्यूज बाहर कहीं तो आयेगी नही, ना ही हम इन दोनोको पब्लीकली सन्मानित कर सकते है, लेकिन इस्त्रायल जैसे हमारे दोस्त देशने यहाके हमारे नेटिव्ह ज्यूजका इस्तेमाल करके स्पाइंग करनेकी ये जो जुर्रत की है, बहुतही घिनौनी और शर्मनाक बात है. वेस्टर्न ख्रिश्चियन जगत जीन लोगोंको सदियोंसे खदेडते आया है, उनसे हमारे पूर्वजोने मानवतापुर्ण व्यवहार किया था, उनको अपने देशमे सहारा दिया था, उसका खयाल इन लोगोंने करना चाहिये था.

खैर, मै यहॉ इस खुषीके मौकेपर एक और एलान करना चाहता हॅू जिससे इन मेहमानोकोभी खुशी होगी ऐसा विश्वास मुझे है। इस

बारेमे बाकायदा ऑफिशियल अनाउन्समेंट तो हो जायेगी, और सेरीमनीभी होगी लेकिन मै अपने मेहमानोकी उपस्थितीमे कहना चाहता हूं की मै कॅप्टन संजीवका प्रमोशन रेकमंड कर रहा हूँ कॉन्ग्रॅच्युलेशन्स, लेफ्टनंट कर्नल संजीव." एरिया कमांडरपासून बराच दूर टेबलाशी असलेल्या आपल्या खुर्चीपाशी उभा असलेला संजीव रुबाबात चालत कमांडरसाहेबांशी पोचला होता. एक शार्प सॅल्यूट करून त्यानं कमांडरसाहेबांना अभिवादन केले होते. संजीवच्या सॅल्यूटला प्रतिसॅल्यूट करून, त्याच्याशी हस्तांदोलन करून, राकेश आणि क्षमा ह्यांच्या दिशेने एक उडता सॅल्यूट देऊन कमांडरसाहेब झपाट्याने बाहेर गेले त्यांच्याबरोबर इतर काही उच्च अधिकारीही बाहेर पडले आणि तेथे हजर असलेल्या इतर अधिकाऱ्यांनी, संजीवच्या सहकाऱ्यांनी लेफ्टनंट कर्नल संजीवला घेरा घातला होता.

त्या घोळक्यापासून जरा दूर असलेल्या राकेशच्या जवळ जात क्षमा त्याच्या दंडावर आपली बोटे रोवत म्हणाली, "चला, डिटेक्टीव्ह राकेश, आपल्या पुढच्या कामगिरीवर आपल्याला निघायला हवंय"

राकेश हसत तिच्याबरोबर बाहेरच्या दिशेनं वळताना म्हणाला, "ही फारच लुटूपुटीची लढाई झाली. निदान त्या

याकोव्हच्या पाठीत एक जोरदार गुद्दा मारण्याची तरी संधी मला मिळायला हवी होती. आणि तुलाही संधी द्यायला हवी होती, त्याला चिमटा काढण्याची.”

क्षमाला इतकं हसू आलं की, राकेशचा हात सोडून ती पळत बाहेर गेली, मनमुराद हसण्यासाठी.

समाप्त




दिनानाथ मनोहर

यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित पुस्तके

कृपया कवरवर एकदाच क्लिक/टॅप करा. पुस्तक उघडेल.






**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**
**दिनानाथ मनोहर यांचे हे चवथे पुस्तक.**

दिनानाथ मनोहर हे मराठी साहित्यातील एक सुप्रसिद्ध नाव. १९७५ साली त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली त्याआधीपासून ते लिहीत आहेत. पाच दशके. त्यांची अनेक पुस्तके विविध भारदस्त प्रकाशनगृहांतर्फ़े प्रकाशित झाली आहेत. नवीन लेखकांना ते मार्गदर्शन करतात. तसेच सातपुड्यातील आदिवासी भागात त्यांचे कार्य गेली पन्नासेक वर्षे सुरू आहे. त्यांच्या पुस्तकांना विविध प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु तरूण वाचकांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने ते काही पुस्तके ई साहित्यकडे प्रकाशनासाठी देतात.

दिनानाथ मनोहर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू

शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।